
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. २८५
१९६०
REFBK-0011424
REFBK-0011424




[ …स्कृतिक परिचय ]

REFBK-0011424

लेखक
पं. महादेवशास्त्री जोशी

अनुक्रम २७६६१ विः
क्रमांक २८५ नों: दि:
११४२४

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :
सौ. सुधा जोशी
ज्ञानराज प्रकाशनाकरितां
४२१ शनिवार पेठ, पुणें २.

* * *

चित्रकार
सुधाकर खासगीवाले

* * *

ठसे
कलाभुवन, पुणें.

* * *

प्रकाशनतिथि
विजयादशमी
शके १८८२
दि. ३०–९–६०

* * *

प्रथमावृत्ति

* * *

मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस,
४३०/३१ शनिवार पेठ, पुणें २.

# दोन शब्द

भारत परिचय पुस्तकमालेचें हें दुसरें पुस्तक. पहिल्या 'तमिळनाडु' या पुस्तकाच्या धर्तीवरच हेंहि पुस्तक लिहिलेलें आहे. याला स्वतंत्र प्रस्तावना लिहिणें नलगे. कारण या उपक्रमाबद्दल मला जें कांहीं प्रास्ताविक सांगायचें होतें, तें मीं 'तमिळनाडु' या पुस्तकांत सांगितलें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या लेखनांत मला अनेक ग्रंथकारांचें साहाय्य झालेलें आहे. त्या सर्वांचे, तसेंच मुद्रक, चित्रकार व ठसे बनविणार, यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.


पुणें<br>
विजयादशमी<br>
शके १८८२<br>
सन १९६०

—महादेवशास्त्री जोशी

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | भूमि आणि निसर्ग | १ |
| २. | इतिहासाचा मागोवा | ११ |
| ३. | साहित्य आणि साहित्यकार | २६ |
| ४. | शंकराचार्य | ६२ |
| ५. | केरळसंस्कृति | ८० |
| ६. | यात्रकळि—कथकळि | १०४ |
| ७. | सण—उत्सव | १२५ |


* * *


केरळ
मंगलोर
कन्यागड
कुर्ग
कसारा रोड
म्हैसूर
बेकाल
कुन्नूर
माहे
मलबार
निलगिरी
कालिकत
तिरुर
बेपूर
कोइंबतुर
पोनानी
त्रिचूर
पासर
कोचिन
कोट्टायम
अलेप्पी
मातावेरी
कुट्टालम
अंजुतेग
त्रिवेंद्रम्
कोलाचल
कन्याकुमारी
हिंदी महासागर

अनुक्रम .............. वि: ..............
नों: दि: ..............
११४२८



# भूमि आणि निसर्ग

‘ केरळमाहात्म्य ’ नांवाचा एक ग्रंथ आहे. त्या ग्रंथांत केरळ प्रदेश कसा उत्पन्न झाला, त्याविषयीं एक कथा आहे. ती कथा सहाव्या अवतार परशुराम, याच्याशीं संबंधित आहे. परशुरामाचा पिता जमदग्नि आणि माता रेणुका. जमदग्नि वनांत आश्रम उभारून आपला गृहस्थाश्रम चालवीत होता. त्या प्रदेशावर राज्य होतें, कार्तवीर्य सहस्रार्जुनाचें. त्या दोघांत कांहींतरी कुरापत निघाली आणि सहस्रार्जुनानें उन्मत्तपणें जमदग्नीचा वध केला. आपल्या पित्याचें मस्तक धडावेगळें झालेलें पाहून परशुराम क्रोधसंतप्त झाला. ज्ञान आणि तप यांच्या साधनेंत निमग्न असलेल्या आपल्या पित्याचा असा नाहक बळी पडलेला पाहून तो सूडालाच पेटला. त्यानें सहस्रार्जुनाचाच नव्हे; तर समस्त क्षत्रिय जातीचाच उच्छेद करण्याचा संकल्प सोडला. आपला परशु उभारून त्यानें क्षत्रियांवर जागोजागीं धाडी घातल्या. एकदा नव्हे, दोनदा नव्हे; तर एकवीस वेळां त्यानें क्षत्रियांचे कंद छेदले. त्या समरविजयांत आर्यावर्ताची समस्त भूमि त्याच्या सत्तेखालीं आली. पण त्याला त्या भूमीचा तिळमात्र लोभ नव्हता. त्याला राज्यहि करायचें नव्हतें. त्यामुळें त्यानें एक मोठा यज्ञ केला आणि त्या यज्ञांत ती स्वार्जित भूमि कश्यपाला दक्षिणा म्हणून देऊन टाकली.

पण कश्यप ऋषीचा दृष्टिकोण वेगळा होता. त्याला यापुढें आर्यावर्तांत परशुरामाचें वास्तव्य नको होतें. त्यामुळें दानोदक हातावर पडतांच त्यानें परशुरामाला सांगितलें.

“ यापुढें तूं माझ्या भूमींत क्षणभरहि राहूं नको. ”

परशुरामाला ती आज्ञा मानणें भाग पडलें. तो आर्यावर्त सोडून दक्षिणेंत उतरला. सह्याद्रीचा घाट ओलांडून गोकर्ण क्षेत्रापर्यंत त्यानें मजल मारली. त्याच्या काळीं गोकर्ण हीच दक्षिण भारताची सीमा होती. त्यापुढें सगळा निळ्या सागराचा विस्तार! त्यामुळें परशुरामाची यात्रा तिथेंच थांबली. त्यानें तिथें बसून वरुणाचें ध्यान केलें. वरुण प्रसन्न होऊन सागरांतून वर आला. त्यानें परशुरामाला विचारलें.

" महाभागा, तुला मजकडून काय हवें आहे ? " त्यावर परशुराम बोलला.

" पाशधारी वरुणा, मला भूमि हवी आहे. माझ्या सत्तेची, माझ्या अधिकाराची. "

" ठीक आहे. तुझ्या खांद्यावरचा परशु जितक्या दूरवर तुला फेकतां येईल, तितका फेक. तो जिथें पडेल तिथवर तुला भूमि मिळेल. "

भार्गवरामानें लगेच परशु उचलला. सारें बळ एकत्र करून तो दक्षिण दिशेस फेकला. तो आजच्या कन्याकुमारीला जाऊन पडला. दुसऱ्याच क्षणीं सागराच्या पोटांत प्रचंड क्षोभ माजला. एक गगनभेदी आवाज दणाणला. आणि पुढच्याच क्षणीं परशुराम डोळे उघडून पाहतो, तर गोकर्णापासून कन्याकुमारीपर्यंत एक चिंचोळी भूमीची पट्टी सागराच्या तळांतून वर आलेली....त्या साक्षात्कारानें परशुरामाचा आनंद गगनांत मावेना. त्याला हक्काची जमीन मिळाली होती. त्या भूमींतून त्याला कोणी ' ऊठ ' म्हणणार नव्हतें, कीं ' जा ' म्हणणार नव्हतें.

मग परशुरामानें ती भूमि नांदती, वसती करायचें ठरवलें. त्यासाठीं त्याला मनुष्यबळाची आवश्यकता होती. म्हणून त्यानें आर्यावर्तांतून कित्येक ब्राह्मण कुटुंबें त्या भूमींत आणलीं. त्यांना आचाराचे नियम घालून दिले आणि त्या नव्या भूमीवर दृढमूल केलें. त्यांच्या अनुषंगानें मग इतरहि अनेक जातीजमाती केरळांत आल्या. केरळाची भूमि लागवडीस आली. तो प्रदेश मानवसमुदायांनीं गजबजून गेला. आणि चिरंजीव परशुरामाचा आत्मा त्यामुळें संतोष पावला.

सह्याद्रि आणि पश्चिम सागर यांच्यामध्यें गोकर्णापासून तों कन्याकुमारी-पर्यंत लांबच लांब पसरलेला हा भूपट्टा म्हणजेच आजचा केरळ प्रदेश होय. याला प्राचीन काळीं नागलोक म्हणत असावे; कारण, नागपूजक लोकांची

संख्या त्या भागांत बरीच होती अन् आहे. कुंतीपुत्र अर्जुन आपल्या तीर्थयात्रेच्या प्रसंगांत नागलोकीं पोंचला होता. उलूपी नांवाची एक नागकन्या तिथें त्याला भेटली होती. तिच्या प्रेमाला भाळून त्यानें तिचें पाणिग्रहणहि केलें होतें. महाभारतांतली ही कथा संशोधकांच्या मतें केरळ प्रदेशांतच घडलेली आहे.

भार्गवरामानें निर्माण केलेली भूमि म्हणून या प्रदेशाला 'भार्गव क्षेत्र' असेंहि नांव मिळालें. तसें म्हटलें तर केरळाप्रमाणेंच त्याच्या उत्तरेची सगळी कोंकणपट्टीसुद्धा भार्गवभूमिच आहे. त्यामुळें केरळ म्हणजे कोंकणच असें म्हटलें, तर त्यांत चूक होणार नाहीं. सह्याद्रिखंड या ग्रंथानें माझ्या आधींच तसें म्हटलें आहे—

"केरलाश्च तुलंगाश्च तथा सौराष्ट्रवासिनः
कोंकणाः करहाटाश्च करनाटाश्च बर्बराः
इत्येते सप्त देशा वै कोंकणाः परिकीर्तिताः"

या श्लोकांत सात कोंकणें नमूद केलीं असून त्यांत केरळाचें नांव पहिलें आहे. सह्याद्रीच्या कुशींतलीं हीं सात कोंकणें समजावीं.

त्यानंतर मलैनाड्ड, चेरनाड्ड अशा नांवानींहि त्याचा उल्लेख होऊं लागला. याचें आणखी एक नांव चेरतल म्हणजे चेर वंशांतल्या राजांचें स्थान किंवा राज्य असें होतें. कालांतरानें त्यांतला 'त' लुप्त होऊन त्याचें 'चेरल' आणि पुढें 'केरल' बनलें अन् तेंच पुढच्या काळांत रूढ झालें. महाभारताच्या सभापर्वांत याच नांवानें त्याचा उल्लेख आहे.

"भयोत्सृष्टविभूषाणां तेन केरलयोषिताम्
अलकेषु चमूरेणुश्चूर्णप्रतिनिधीकृतः"

हा कालिदासानें रघुवंशांत लिहलेला एक श्लोक. यांतहि 'केरल' असाच शब्द आला आहे. रघुराजा दिग्विजय करीत केरळांत पोंचला, तेव्हां तिथल्या रमणी आपले दागदागिने टाकून पळत सुटल्या आणि रघूच्या सैन्यानें उठवलेली धूळ त्या स्त्रियांच्या भांगांत गुलालाप्रमाणें जाऊन बसली, असा त्या श्लोकाचा अर्थ आहे. मलैनाड्ड हें त्याचें द्राविड नांव आहे. मलै म्हणजे पर्वत अन् नाड्ड म्हणजे देश.

मलबार, कोच्चिन आणि त्रिवांकुर ( त्रावणकोर ) हे तीन विभाग मिळून केरळ प्रदेश बनतो. केरळाला दीडशें मैल लांबीचा समुद्रकिनारा मिळालेला आहे. हा सारा प्रदेश सुंदर आहे, दर्शनीय आहे. हिरव्या रंगानें त्याचें सौंदर्य वाढवलें आहे. ' श्रावण-भाद्रपद, वर्षाऋतु ' हें कोष्टक केरळाला लागू नाहीं. तिथें वर्षाचे आठ महिने पाऊस झिमझिमत असतो. त्यामुळें तृणपर्णें वाळत नाहींत, झाडें सुकत नाहींत अन् प्रवाह आटत नाहींत. आणि या हरित वर्णाच्या जोडीला केरळांतलीं घनदाट अरण्यें. पूर्व भागांत डोंगरांच्या रांगांची तटबंदी उभारलेली आणि त्यावरची ती निबिड वनराजी. केरळचा वनप्रदेश सागवाना साठीं प्रसिद्ध आहे. ' मलबार टीक ' म्हणून आपण जें इमारती लांकूड वापरतों, तें केरळाच्या जंगलांतूनच आलेलें असतें. ते उंच सडेसोट सागवान आणि त्यांच्या जोडीला शीशम्चे वृक्ष.आपण ज्याला शिसवी म्हणतों ते. शिसवीचें लांकूड टणकपणांत पोलादालाहि मागें सारतें. शिवाय, त्याचा तजेलदार काळा रंग. त्यामुळें या लांकडाला पाश्चात्य देशांत खूप मागणी आहे. त्याचें बनवलेलें खुर्च्या, टेबलें, कपाटें इत्यादि गृहोपयोगी सामान टिकाऊ असतें अन् सुंदर दिसतें. कालिकतच्या बंदरांतून या लांकडाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते.

केरळ आणि नारळ यांचें जणूं समीकरणच आहे. मुंबईला आपण ' पाणी नारियल ' खातों किंवा पितों ते केरळांतून बोटीचा प्रवास करून मुंबई बंदरांत उतरलेले असतात. केरळांत लोक आधीं वसले आणि मग त्यांनीं नारळीच्या बागा उठवल्या, असें म्हणायच्याऐवजीं नारळीचीं वनें आधींच निसर्गसिद्ध होतीं आणि मग त्यांच्या सावलींत माणसानें घरें बांधून वस्ती केली असें म्हणावेंसें वाटतें. कारण कुठेंहि पाहा; पार क्षितिजाच्या रेषे पर्यंत सर्वत्र माडच माड. सगळीकडे त्यांच्या लांब लांब पात्यांच्या चुडतांची हालचाल. हिरवीं चुडतें माडावर अन् त्यांच्या काळ्या सावल्या भुईवर. त्यांच्या फटींतून खालीं झिरपणारे उन्हाचे कवडसे. डोंगरावरसुद्धा माडांची लागवड आहेच. माड म्हणजे केरळचा कल्पवृक्षच म्हणायला हवा. तिथलें नारळाचें उत्पन्न फार मोठें आहे. त्याच्या जोडीला आंबे, फणस, काजूहि आहेत; पण त्यांची गणना दुय्यमांत. भात सर्वत्र पिकतें आणि त्याचें पीक वर्षांतून दुबार काढतात.

काळीं मिर्च्यें हें केरळाचें आणखी एक ऐतिहासिक वैशिष्टय. काळ्या, चरबट पानांच्या मिरवेली, नागवेलीसारख्या तिकडे झाडापेडांना सर्वांगीं वेढून

वर चढलेल्या दिसतील. हेमंत-शिशिरांत त्यांना येणारे ते लांबट मिऱ्यांचें घोस. प्रथम हिरवे चार अन् पिकल्यावर तांबूस गुलाबी. इतिहासकाळीं केरळ म्हणजे मिऱ्यांचा प्रदेश असेंच समजलें जाई. मिरीं म्हणजे वाटाण्या-एवढा गोल दाणा; पण अति तिखट. त्याचा हा तिखटपणा निराळ्या अर्थानेंहि केरळाला भोंवला आहे. किंबहुना केरळाच्या इतिहासाला त्यानेंच क्रांतिकारक वळण लावलें आहे. पण हें मिरींपुराण मला पुढें थोडेंबहुत सांगावें लागणार आहे. त्यासाठीं इथें हात आवरता घेतों.

काश्मीरप्रमाणेंच केरळाचें सौंदर्यहि ‘ जळीं-स्थळीं ’ पाहून घ्यावें. केर-ळावर आपोदेवतांचा प्रवाही अनुग्रह आहे. अनेक लहान-मोठ्या सरिता घाटांतून निघून केरळच्या भूमीवर खळाळतात. त्यांनीं आपला तटप्रांत फुलता फळता बनवला आहे. पण केरळांत जाणारा कोणताहि यात्रिक कौतुक करतो, स्तवनें गातो, तीं तिथल्या ‘ कायलां ’चीं. ‘ कायल ’ म्हणजे ‘ बॅक वाटर्स ’ म्हणजेच वळतें पाणी. केरळांतल्या नद्या मोठ्या विलक्षणच आहेत. त्या सरित्पतीला आत्मसमर्पण करतात हें खरें; पण त्याच वेळीं त्याचाहि जलरस आपल्या ओठांनीं ओढून माघारीं आपल्या पात्रांत आण-तात. ‘ पिबत्यसौ पाययते च सिंधूः ’ म्हणून कालिदासानें सागराच्या शृंगारी वृत्तीचें कौतुक केलें आहे, तें बहुधा केरळांतलें हें वळतें पाणी पाहूनच असावें. तो म्हणतो, कीं ‘ समुद्र इथें सरितांची अधरसुधा प्राशन करीत असतां त्याच वेळीं आपलेंहि अधरामृत सरितारमणींना प्यायला देतो. ’ या सर्वांचा अर्थ केरळांत समुद्राचें पाणी अनेक ठिकाणीं किनारा ओलांडून तिथल्या भू-भागांत घुसतें हा आहे. श्री. गंगाधर गाडगीळ यांनीं या संबंधीं एक सुंदर वाक्य लिहिलें आहे. ‘ बॅक वाटर्स ’ च्या रूपानें समुद्र मलबारांत आहे आणि मलबार समुद्रांत आहे. ’

हे वळत्या पाण्याचे प्रवाह एखाद्या रस्त्याप्रमाणें समुद्राला समांतर असे वाहतात. अधूनमधून लहान मोठीं सरोवरें अन् बेटें या जलमार्गांना भेटतात. होड्या अन् मचवे त्यांतून मालाची ने—आण करतात. माणसांनाहि हवें तर फिरवून आणतात. केरळच्या यात्रिकाला हा जलप्रवास मोठा सुखावह वाटतो. प्रवाहाच्या दुतर्फा इथेंहि माड आहेतच. हे माड प्रवाश्यांना सावली अन् जळवंतीला गांभीर्य देतात. मधून मधून छोटे छोटे लांकडी धक्के उभे

केलेले दिसतात. त्यांना बांधून पडलेल्या छोट्या मोठ्या काळ्या होड्या जळपृष्ठावर डहुळत राहातात. त्यांना दोन्हीं अंगीं धक्के देणाऱ्या जललहरी ‘ चुबुक् चुबुक् ’ आवाजानें श्रवणाला संतोष देतात. केरळांतलीं पोरेंटोरेंसुद्धा होड्या चालवण्यांत पटाईत आहेत. त्यांच्या त्या उघड्या नागड्या जलक्रीडेचा कोणालाहि हेवा वाटावा.

मच्छीमारीचा धंदा इथे चांगला तेजींत चालतो. सर्वांत मोठा उद्योग नारळाचा काथ्या अन् त्यापासून बनणाऱ्या अनेक वस्तु तयार करण्याचा. चहाचे अन् रबराचे मळेहि पुष्कळच आहेत. या मळ्यांनीं केरळाच्या डोंगरी विभागांत हजारों एकर जमीन व्यापलेली आहे. या शिवाय काजूचे कारखानेहि चालतात.

केरळभूमि सुपीक अन् समृद्ध खरी; पण ती आपल्या लेकरांचें दारिद्र्य मात्र दूर करूं शकली नाहीं. कारण भूमीच्या मानानें तिथें लोकवस्ती बेसुमार आहे. दर चौरस मैलाला दोन हजार माणसें, असें तिथल्या लोकवस्तीचें व्यस्त प्रमाण आहे. माणसें कष्ट खूप करतात, पण तरीहि त्यांच्या ‘ ताकास तूर ’ लागत नाहीं. या मनुष्यवस्तीचा एक विशेष आहे. आपण ज्यांना गांवें म्हणतों तशीं तीं केरळांत नाहींतच. घरामागून घर, वाडीमागून वाडी, असें सारखें लागतच गेलेलें असतें. त्यामुळें एक गांव कुठें संपलें अन् दुसरें कुठें सुरू झालें, तें कळतच नाही. जसे सगळीकडे माडच माड, तशीं सगळीकडे तांबड्या कौलांचीं घरेंच घरें ! जो तो आपल्या जमिनीच्या तुकड्यांत. प्रत्येकाच्या घराभोंवतीं कुंपण. प्रत्येक घराला विहीर. अन् त्या पाण्यावर परसांत लावलेला भाजीपाला.

केरळांतलीं माणसें वर्णानें ‘ मेघश्याम ’ असलीं तरी तमिळनाडच्या लोकांप्रमाणें ‘ कृष्ण ’ नाहींत. तिथें गोरा रंगहि अधूनमधून दिसतो. पण त्यांचें ‘ काळें गोरेंपण ’ कसेंहि फिकें पक्कें असलें तरी त्यांची स्वच्छता त्यांच्या वर्णाला कांति देणारी असते. केरळांतलीं माणसें स्वच्छ, त्यांचे कपडे स्वच्छ, घरें स्वच्छ, आवारें स्वच्छ, सारें कसें स्वच्छ अन् लख्ख !

त्यांना कपड्यांचाहि फारसा हव्यास नसतो. पुरुष चार-साडेचार हात लांबीची लुंगी नेसतात. लुंगीला ते ‘ मुण्डु ’ म्हणतात अन् वरच्या कुडत्याला ‘ तोर्तु ’ म्हणतात. तोर्तु नसेल तर उपरणेंवजा पंचा पांघरूनहि त्यांचें काम भागतें. एका काळीं बायकांप्रमाणें तिकडचे पुरुषहि आपले केस वाढवीत

असत. डोक्याचे केस कापणें पाप समजलें जाई. मग ते वाढवलेले केस कपाळा-वर आणून त्याचा नागफणीच्या आकाराचा बुचडा बांधीत. संशोधकांचा तर्क आहे, कीं हा केरळांतल्या नागपूजेचा प्रभाव असावा. आजमितीस ही प्रथा मोडली असली, तरी शेंडीला अजून अर्धचंद्र मिळालेला नाही अन् बुचडाहि अगदीच सुपारीएवढा झाला नाहीं. केरळी लोकांना रंगीत कपड्यांची हौस दिसत नाहीं. शुभ्र वस्त्रेंच ते विशेषत्वानें पसंत करतात. पुरुषांप्रमाणें बायकासुद्धा !

बायकाहि पुरुषांप्रमाणें ' मुण्टु 'च नेसतात अन् त्याच्याच एका पदराचा कासोटा कसतात. आणखी एक ' मुण्टु ' उत्तरीय म्हणून ओढला, कीं झाली त्यांची वेषभूषा. पुराण्या काळीं तर केरळच्या नारी कमरेच्या वर ' अभिजात ' पणेंच राहत असत. त्यांना कांहीं लपवायचें किंवा छप-वायचें नव्हतेंच. पण आज-मितीस हें ' आभिजात्य ' त्यांनी काढून टाकलें आहे. त्या आतां लुंगीवर कुडतेंवजा चोळी वापरतात. अलीकडे साड्याहि अधूनमधून दिस-तात. तिकडच्या ललना विविध प्रकारची केशरचना करण्यांत मात्र तरबेज आहेत. तिथल्या बायकांचे केसहि मऊ, तुकतुकीत, लांब अन् विपुल असतात. त्यांचा अंबाडा कसा नारळा-एवढा भरघोस बनतो. या बाबतींत कुठल्याहि प्रांतांतल्या स्त्रियांनीं केरळी



टोपींत बसवलेली ताडपत्री छत्री

पुरंध्रींचा हेवा करावा. निसर्गाची ही देणगी त्या जीव ओतून जोपासतात, हें विशेष ! रोज तेल-उटण्यांनीं केशमर्दन करतील, डोक्यावरून न्हातील, केस सुकवतील, विंचरतील, काळजीपूर्वक त्यांची विरचना करतील, त्यांवर वेणी किंवा गजरा माळतील अन् या कामीं खर्ची पडलेला वेळ सार्थकीं लागला असेंच समजतील. केरळी स्त्रीचा सगळा नखरा काय तो केशप्रसाधनांत असतो अन् दिसतो.

केरळांतली सगळीच राहाणी साधी अन् निसर्गाला अनुकूल अशी आहे. भात हें त्यांचें मुख्य अन्न. तीन्ही ठाव भात अन् वर थोडें सांबार किंवा ताक मिळालें कीं, त्यांचा आत्मा खूष! निजायला एक चटई पुरेशी असते. त्यांना वेड आहे तें फक्त छत्रीचें, प्रत्येकाच्या हातांत लहान वा मोठी छत्री असायलाच हवी. एक वेळ केरळी माणूस अनवाणी बाहेर पडेल; पण छत्री काखेला मारल्यावांचून पाय बाहेर काढायचा नाहीं. इकडे कापडी छत्र्या तर सर्रास आहेतच; शिवाय ते लोक बांबूचा दांडा लावून ताडपत्री छत्र्याहि तयार करतात. ताडपत्री छत्र्या विशेषेंकरून नम्पूतिरि ब्राह्मणांच्या बायका वापरतात. उन्हासाठीं अन् त्याचबरोबर आपला मुखडा जनतेच्या दृष्टीपासून लपवण्यासाठीं त्यांना या छत्र्यांचा उपयोग होतो. अशा तीन चार बायका एकत्रपणें रस्त्यानें निघाल्या, कीं दूरच्या माणसाला ताडपत्र्यांची राहुटीच चालत येत असल्याचा भास होतो. छत्रीच्या या अतिरिक्त वापरामुळें बाहेरचे लोक केरळाला ‘ छत्र्यांचा देश ’ असें कुतूहलानें संबोधतात.

त्रिवेंद्रम् ही केरळाची राजधानी. पूर्वीच्या त्रावणकोर संस्थानाचीहि हीच राजधानी होती. खरें नांव ‘ तिरु अनंतपुरम्.’ त्याचा अर्थ श्री अनंतपुरम् असा आहे. अनंत म्हणजे पद्मनाभस्वामी. त्याच्याच नांवानें तें नगर वसलें अन् तोच तिथला राजा झाला. पूर्वींचे अधिपति या अनंताचे प्रतिनिधि म्हणून त्या संस्थानचा कारभार पाहात. त्यापूर्वी तें ‘ अनंतवन ’ होतें. वन म्हणजे खरोखरीचें दाट जंगलच.

बिल्वमंगल नांवाचा एक साधु श्रीविष्णूच्या अनुग्रहासाठीं एका ठिकाणीं तप करीत बसला होता. कांहीं काळानें तिथें एक मुलगा नित्यनेमानें येऊं लागला. मुलगा मोठा व्रात्य होता. तो अनेक प्रकारें बालचेष्टा करून बिल्व-मंगलाच्या साधनेंत विघ्न आणी. त्याचें चित्त स्थिरच होऊं देत नसे. असें

बरेच दिवस चाललें. एक दिवस त्या साधूला त्याचा राग आला अन् त्यानें त्या मुलाला दूर ढकलून दिलें. त्यावर तो मुलगा म्हणाला.

"ठीक आहे, बुवाजी. मी परत येणार नाहीं आतां. तुम्हालाच माझा शोध करीत अनंतवनांत भटकावं लागेल."

तो मुलगा अदृश्य झाला अन् मग त्या बुवाच्या डोक्यांत प्रकाश पडला. 'हा मुलगा म्हणजे बालकृष्ण तर नसेल!' विचारांतीं त्याची तशी खात्री झाली. तो उठला. त्यानें जंगलाची वाट धरली. पण बराच शोध करूनहि मुलगा कांहीं सांपडला नाहीं. सांपडली ती एक शेषशायी अनंताची मूर्ती. साधूला तोच अनुग्रह वाटला. त्यानें तिथेंच त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. तिथेंच पुढें आजचें मंदिर निर्माण झालें. वन होतें तें पुर बनलें, माणसांनीं गजबजलें.

पद्मनाभस्वामीचें हें मंदिर आजमितीस त्रिवेंद्रमच्या कोटांत दिसतें.



पद्मनाभ स्वामी

महाराजांचा राजवाडाहि तिथेंच आहे. मंदिर काळ्या दगडाचें आहे. तिथें अनंताची स्वारी शेषशय्येवर पहुडलेली आहे. शेषशायीची एवढी विशाल मूर्ति अन्यत्र नाहीं. तिचें समग्र दर्शन घ्यायचें, तर तें तीन दरवाज्यांतून घ्यावें लागतें. एका द्वारांतून देवाचें श्रीमुख पाहायचें. दुसऱ्या द्वारांतून ब्रह्मदेवाचें जन्म स्थान म्हणजे त्याचें नाभिकमल पाहायचें. अन् तिसऱ्या द्वारांत जाऊन चरणांचें दर्शन करायचें. ही मूर्ति बारा हजार शाळिग्राम आंत ठेऊन 'कट्ट शर्करा' योगानें बनवली आहे, असें सांगतात.

केरळांतल्या एका प्राचीन ‘ पाट्टु गीतांत ’ या पद्मनाभस्वामीकडे पुढील-प्रमाणें वरयाचना केलेली आहे—

“ तरतळन्तानळन्ना पिळन्ता पोन्नम्
तनकचेन्तार, वरुन्तामल वाणन् तन्ने
करमारिन्ता पोरुत्तावनन्मारुढे
करळरिन्ता पुरुने ! मुरारी, कणा !
ओरुवरन्ता परन्तामभे नी कनिन्तुर-
कचायी पिणिप्पौवम् नीन्तावण्णम्
चिरतरम् ताळ पणिन्तेनय्यो
ताँकेन्नेत्तिरुवनन्तपुरम् तङ्कुमानन्तने ”

‘ हे मुरारे, तूं तीन पावलांनीं भूमि मापलीस. हिरण्यकशिपूची छाती विदारलीस. बाणासुराचे हात लीलया तोडलेस. युद्धप्रसंगीं दानवांना जर्जर केलेंस. हे परमधामा, हे शेषशायि, तूं मला असा वर दे, कीं ज्यायोगें मी भवसागरांत गटंगळ्या न खातां लीलेनें त्यांतून तरून जाईन. हे तिरुअनंत-पुरम्‌च्या आनंदस्वरूपा, मी बहुत काळापासून तुझ्या चरणीं माथा नमवीत आलों आहें ! ’



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................



# इतिहासाचा मागोवा

केरळाचाहि प्राचीन इतिहास धूसरच आहे. पण ज्याला आपण ऐतिहासिक काळ म्हणतों, त्याच्याहि मागें शेंकडों वर्षें केरळ ही मानववस्तीची भूमि होती आणि त्या मानवांच्या व्यवहारांतून, समवायांतून आणि संघर्षांतून त्या भूमीचा इतिहास घडत होता. तमिळनाडप्रमाणें ही केरळची नवभूमिहि द्राविडांचीच होती. तिथला बहुसंख्य समाज द्रविड आणि नागवंशी जाती जमातींचाच होता. पुढें आणखी एक वर्ग तिथें दाखल झाला, तो म्हणजे ब्राह्मणवर्ग. परशुरामाच्या प्रेरणेनें आर्यावर्तांतून त्यानें दक्षिणेंत एवढी मजल मारली होती. या ब्राह्मणांचे आचार-विचार तिकडच्या लोकांपेक्षा अर्थात्‌च निराळे होते. उत्तरेकडून वैदिक विचारधारा आणि आर्य शिष्टसंकेत घेऊन ते आले होते. त्यांना तिथल्या मूलनिवासी लोकांत चटकन्‌ मिसळतां आलें नाहीं. त्यांना तशी इच्छाहि नव्हती. आपलें वेगळेपण कायम टिकवून ठेवण्याचा त्यांनीं बराच काळ प्रयत्न केला. आजहि त्यांच्यामध्यें तसा थोडासा अलगपणा दिसतोच. पण त्यांना सर्वस्वी निराळें राहातां आलें नाहीं. तसें करणें त्यांना अनेक कारणांसाठीं योग्य व इष्टहि वाटलें नसेल. त्यांनीं हळूहळू आपल्या आचारांत परिवर्तन करून मूळच्या लोकांशीं स्वतःला मिळतें-जुळतें करून घेतलें.

आर्य ब्राह्मणांचा केरळांत पाय पडण्यापूर्वीं केरळी जनता असभ्य आणि असंस्कृत होती असें मात्र समजायचें कारण नाहीं. पण तरीहि त्यांच्यांत जातिभेद निर्माण झाला नव्हता. वर्णभेदहि नव्हता. नागसमाज हा तिथला प्रमुख वर्ग होता. सगळ्या देशाच्या संरक्षणाची जिम्मेदारी त्यानें आपल्या

शिरावर घेतली होती. इतर सगळे 'कारु नारु' त्याच्या आश्रयाखालीं सुखानें आपला योगाक्षेम चालवीत होते. युद्धविद्येचें शिक्षण सर्वांना सक्तीचें होतें. लढाई, उत्सव आणि मंगलकार्य या सर्व प्रसंगीं तिथला मानवसमाज समान अधिकारानें खांद्याला खांदा भिडवून काम करीत होता. एका पंक्तीला जेवत होता, एका तालानें नाचत होता अन् एका सुरानें गात होता. अस्पृश्यता तर त्यांना शिवलीहि नव्हती. प्राचीन केरळांतलें राजशासन गणतंत्रपद्धतीचें होतें. जनता आपले प्रतिनिधि कारभार चालवण्यासाठीं निवडून देत होती, त्यांची एक समिति बनत होती आणि ती आपल्या आदिम कायद्याप्रमाणें राज्य चालवीत होती.

अर्थात् हीं राज्येंहि छोटीं छोटींच होतीं. पंचक्रोशीचा प्रदेश म्हणजे एक राज्य एवढाच त्यांचा चिमुकला आकार होता. पण गणतंत्र पद्धतीनें चालणारीं हीं राज्यें कालांतरानें हळूहळू मोडत चाललीं आणि त्या ठिकाणीं विस्तीर्ण प्रदेशावरच्या एकमुखी राजसत्तेचा उदय झाला. एखाद्या गणराज्यांत कोणीतरी बलदंड पुरुष निर्माण व्हावा, त्याला सत्तेची हांव सुटावी, त्यानें बाहुबलाच्या जोरावर आसपासचीं लहान लहान राज्यें जिंकून घ्यावीं आणि मग त्या सर्व प्रदेशाचा राजा म्हणून स्वतःला मूर्धाभिषेक करून घ्यावा, अशा प्रकारें तिथें एकतंत्री राज्यसत्ता अस्तित्वांत आली.

पुढें असा एक काळ आला कीं, साऱ्या द्रविड देशाची चोल, पांड्य आणि चेर अशा तीन राज्यांत विभागणी झाली. त्यांत चेर राजे समस्त केरळाचे अधिपति बनले. प्रल्हादाचा पुत्र बलि म्हणजेच महाबलि हा या चेर वंशाचा आदिपुरुष समजला जातो. तिकडच्या लोकांची तशी धारणा आहे. त्याची राजधानी 'तृक्कारूरकरा' या नांवाची असून ती आजच्या एर्णाकुलम्‌पासून पन्नास कोसांवर आहे.

याच वंशांत पुढें 'चेरन्' नांवाचा एक प्रतापी सम्राट् निर्माण झाला. त्याच्या प्रतापानें केरळांतलीं लहानमोठीं राज्यें एकछत्री साम्राज्याच्या रूपांत संघटित झालीं. गोकर्णापासून कन्याकुमारीपर्यंतचा प्रदेश, कुडक नीलगिरी म्हैसूरराज्याचा दक्षिण भाग आणि कोइंबतोर नि सेलम जिल्ह्याचा पश्चिम भाग एवढा सगळा दक्षिण भूप्रदेश, चेरन्‌च्या साम्राज्यांत समाविष्ट झाला. मग थोड्याच दिवसांत चेरन्‌ला कळून आलें कीं, तृक्कारूरकरासारख्या राज्याच्या

एका टोंकाला असलेल्या राजधानींतून एवढ्या मोठ्या साम्राज्याचा शकट हांकणें दुरापास्त आहे. म्हणून त्यानें आपली राजधानी तिथून उठवून 'तिरुवंचिकुलम्' या ठिकाणीं आणली.

त्या राज्यांतलें कोडंगलूर बंदर हें साम्राज्याच्या समृद्धीचें केंद्रस्थान होतें. त्या बंदरांतून दूरदूरच्या देशांशीं केरळाचा व्यापार चालत होता. धनलक्ष्मी त्याच बंदरांतून देशांत अवतरत होती. अर्थात् त्या बंदराचें संरक्षण करणें ही महत्त्वाची बाब होती. त्यासाठीं सम्राट् चेरन्नें एक राजकुमार 'सुभा' म्हणून तिथें पाठवला. तो तिथें जाऊन राहिला खरा; पण साम्राज्याशीं मात्र एकनिष्ठ राहिला नाहीं. त्यानें हळूहळू त्या प्रदेशावर आपली सत्ता जमवली आणि त्या भागांत आपलें स्वतंत्र राज्य निर्माण करून तो साम्राज्यांतून फुटून निघाला.

आर्यावर्तांतले ब्राह्मण घाट उतरून केरळांत आले आणि तिथें स्थायिक झाले, हें नुकतेंच सांगितलें. परशुरामानें आणले ते ब्राह्मण मर्यादित होते. पण ही आवक तेवढ्यावरच थांबली नाहीं. पुढें बराच कालपर्यंत उत्तरेचे ब्राह्मण गटगटानें केरळांत येतच राहिले. त्यांची संख्या बरीच वाढली. त्यांच्या आगमनानें केरळांत एका नव्या युगाला प्रारंभ झाला. हे ब्राह्मण बुद्धिमान् तर होतेच, शिवाय सत्तालोलुपहि होते. पण केरळांतल्या स्थानिक लोकांनी पुष्कळ वर्षेंपर्यंत तिथल्या राजकारणांत या नव्या पाहुण्यांना बोट शिरकवूं दिलें नाहीं. परके अन् उपरे या दृष्टीनेंच केरळांतली जनता या ब्राह्मण वर्गाकडे पहात होती.

पण हे ब्राह्मणहि मुत्सद्देगिरीला पारखे नव्हते. त्यांनीं चंचुप्रवेश तर केला होताच. आतां मुसलप्रवेश कसा करायचा, हा विचार त्यांनीं सुरू केला. त्यांनीं पहिली खूणगांठ मनाशीं बांधली ती ही, कीं 'या प्रदेशांत आपलीं मुळें खोलवर रुजवायचीं, तर आपल्याला स्थानिक लोकांपासून अलग राहून चालणार नाहीं. आपल्याला या लोकांशीं रक्ताचा संबंध निर्माण केला पाहिजे आणि त्या द्वारें आपली महत्त्वाकांक्षा साधली पाहिजे.' आणखीहि एक अडचण होती. हे ब्राह्मण एकंदर तिथल्या लोकसंख्येच्या मानानें अल्प होते. त्यांच्यांत मुलीहि कमी होत्या. आपल्या समाजांतल्या तरुणांचे विवाह बाहेरच्या म्हणजे आर्यावर्तांतल्या मुली आणून करणें, ही गोष्ट त्यांना कष्टसाध्य किंबहुना अशक्यप्राय होती.

म्हणून मग त्या ब्राह्मणांनीं स्थानिक जातींतल्या मुलींशींच विवाहसंबंध स्थापित करायचें ठरवलें. तोंपावेतों ब्राह्मणांची जातिश्रेष्ठता तिथल्या अन्य जातीजमातींनीं मान्य केली होती. म्हणून मग या ब्राह्मणांनीं अनुलोम विवाहाचा मार्ग पत्करला. ते तिथल्या नाग ( नायर ) लोकांच्या मुलीशीं संबधम् करूं लागले. अशा विवाहांपासून उत्पन्न झालेल्या संततीला त्यांनीं आपल्या खालोखाल श्रेष्ठत्व दिलें. या त्यांच्या कृत्यानें त्या प्रदेशांत जातिभेद आणि वर्गभेद यांचें बीज पेरलें गेलें. त्यामुळें केरळांतली प्राचीन समान संस्कृति हळूहळू नष्ट होऊन उच्चनीच भावाला अवसर मिळाला. विषमता पैदा व्हायलाहि उशीर लागला नाहीं. विषमता निर्माण झाली कीं, स्पर्धाहि न बोलावतांच तिथे हजर होते.

अशा प्रकारें केरळांत नव्या जाती आणि नव्या स्पर्धा निर्माण करून या ब्राह्मणांनीं आपलें अर्धें काम साधलें. आपली सत्ताकांक्षा रुजवण्यासाठीं त्यांनीं तिथली जमीन भुसभुशीत करून घेतली. ते केवळ पोथ्यापुस्तकांतच रमून राहिले नाहींत. त्यांनीं शस्त्रविद्येचाहि अभ्यास सुरू केला. तिथले ब्राह्मणयुवक केवळ वाचिवीर न राहतां शस्त्रवीरहि बनूं लागले. निरनिराळ्या राज्यांत राजसत्तेचे सल्लागार आणि प्रसंगीं संरक्षक अशा उभयविध नात्यांनीं त्यांनीं राज्ययंत्रणेंत प्रवेश मिळविला. आपल्या शक्ति-युक्तींच्या जोरावर त्यांनीं हळूहळू सर्वत्र अधिकाराचीं स्थानें प्राप्त करून घेतलीं.

या ब्राह्मणांनीं केरळांत वेगवेगळ्या ठिकाणीं आपले बारा संघ निर्माण केले. प्रत्येक संघानें शस्त्रास्त्रें गोळा केलीं. ' इदं ब्राह्ममिदं क्षात्रम् ' अशा उभयविध स्वरूपांत ते सज्ज होऊन उभे राहिले. त्या काळीं केरळाची राजसत्ता नागलोकांच्या हातीं होती. तेच राजे होते आणि सेनादळहि त्यांचेंच होतें. ब्राह्मणांनीं प्रथम आपल्या शक्तीचा पुरता अदमास घेतला अन् मग त्यांच्याशीं युद्ध पुकारलें. केरळांतल्या कांहीं नवीन जाती सोयरीकसंबंधानें या ब्राह्मणांना जवळच्या झालेल्या होत्याच. त्यांनीं या कामीं ब्राह्मणांचेंच अनुयायित्व पत्करलें. चौफेर रणधुमाळी सुरू झाली. हें आक्रमण नागवर्गाला जबरदस्त ठरलें. त्यांची कुठेंच सरशी होईना. त्यांना ब्राह्मणांचें वर्चस्व मानणें भाग पडलें. शेवटीं उभयपक्षीं तह होऊन ही अंतर्गत यादवी थांबली. पण त्या तहांत ब्राह्मणांच्या सर्व अटी नागांना मान्य कराव्या

लागल्या. त्यांनीं समस्त केरळ चार विभागांमध्यें विभक्त केला. प्रत्येक विभागाचा रक्षापुरुष म्हणून ब्राह्मणच निवडला जावा, अशी व्यवस्था झाली. निवडून दिलेल्या या रक्षापुरुषानें तीन वर्षें आपल्या विभागाचा राज्यकारभार चालवावा आणि नंतर निवृत्त होऊन पदाधिकार सोडावा, असेंहि ठरलें.

या विभागांना ' कडकम् ' असें म्हणत. छेल्लून, पैय्यन्नूर, पेरंपूर आणि चेङ्ङन्नियूर अशीं चार कडकम् निर्माण झालीं. नागांना त्यांच्या सत्तास्थानावरून अगदींच हुसकून लावणें ठीक नव्हे, हें ब्राह्मणांनीं दूर दृष्टीनें हेरलें होतें. त्याकामासाठीं ' कडकम् 'चा रक्षापुरुष ब्राह्मण, तर त्याचा मंत्री कुणीतरी नागपुरुष अशी योजना त्यांनीं बनवली. मात्र या नागप्रधानाच्या हातीं निर्णायक अशा कोणतीहि सत्ता राहणार नाहीं, अशी त्याच वेळीं त्यांनी व्यवस्था करून ठेवली.

रक्षापुरुषाचे सल्लागार म्हणून चारी कडकम्मध्यें देशप्रमुखांच्या चार सभा त्यांनीं निर्माण केल्या. पहिली धर्मसभा, दुसरी भरणसभा, तिसरी व्यापारसभा आणि चौथी कृषिउद्योग-सभा. या चारी सभांतले सभासद लोकांनीं निवडून द्यायचे असत. अशा प्रकारें राजसत्ता आणि लोकसत्ता या दोहोंचा मिलाफ करून त्यांनीं एक अभिनव शासनपद्धति केरळांत निर्माण केली. प्रथम प्रथम जे रक्षापुरुष निवडले गेले, ते न्यायी होते, बुद्धिमान् होते, कर्तबगार होते आणि आत्मस्वार्थापेक्षां देशहिताला प्राधान्य देणारेहि होते. त्यांच्या कारकीर्दींत कांहीं काळ केरळ देश शांत आणि समृद्ध असें जीवन जगला. त्या काळांत व्यापार वाढला, उद्योग वाढला आणि देश सर्व अंगांनीं संपन्न झाला.

पण रक्षापुरुषांच्या अंतःकरणांतली देशहिताची भावना कालांतरानें लुप्त झाली. तिच्या जागीं स्वार्थानें आपलें ठाण मांडलें. तीन वर्षांसाठीं रक्षापुरुष म्हणून निवडून येणारी व्यक्ति प्रजेला पिळून केवळ आपला खजिना कसा भरून घेतां येईल, तीन वर्षांच्या मुदतींत आपल्या पुढच्या सात पिढ्यांचें कोटकल्याण कसें करतां येईल, याचाच विचार करूं लागली. कित्येक लोभी रक्षापुरुष तर आपली मुदत भरल्यानंतरहि अधिकारत्याग करीनासे झाले. आपल्या कडकम्मध्यें कायमचें आपलेंच राज्य व्हावें, असा दुष्ट लोभ त्यांच्या हृदयांत घर करून राहिला. प्रजेनें निवडून दिलेल्या जनप्रमुखांना हें सहन होणें शक्य नव्हतें. त्यामुळें जनतेचे प्रतिनिधि आणि हे रक्षापुरुष यांच्यांत संघर्षाची

आग भडकली. रक्षापुरुषांना त्यांनीच पोसलेल्या सैन्याचें पाठबळ होतें; तर जनप्रमुखांच्या मागें केरळाच्या समस्त जनतेची शक्ति उभी होती. दोन्ही पक्ष वेगवेगळ्या कारणांनीं तुल्यबल होते. या उभय पक्षांनीं केरळाच्या हरित सुंदर भूमीला रक्तरंजित कुरुक्षेत्र बनवलें. आज एका पक्षाचा जय तर उद्या दुसऱ्या पक्षाचा. जयापजयाचीं पारडीं सारखीं खालींवर होऊं लागलीं. त्यांत सगळा देश होरपळून निघाला. शेवटीं जनतेची शक्ति क्षीण झाली, संपुष्टांत आली. रक्षापुरुषांना विजय मिळाला खरा; पण तेहि राज्य करायला समर्थ राहिले नाहीत. सरतेशेवटीं दोन्ही पक्षांना या निर्णयावर यावें लागलें, कीं 'न तुला न मला; घाल कुत्र्याला.' ज्यावेळीं उभयपक्षांचा एकमेकांवरचा विश्वास उडतो, त्यावेळीं नेमका तिथें तिसऱ्याचा शिरकाव होतो. केरळांतहि तसेंच झालें. दोन्ही पक्षांना मग असें ठरवावें लागलें, कीं कोण्यातरी समर्थ अशा तिऱ्हाईत पुरुषानें राजसत्ता हातीं घ्यावी आणि देशाची विस्कटलेली घडी पुन्हा ठीक बसवावी.

या विचाराला अनुसरून तमिळनाडमधल्या केयपुरमूच्या राजाला निमंत्रण दिलें गेलें. 'उदयब्राणवर्मा' असें त्याचें नांव होतें. त्यानें आपलें राज्य धाकट्या भावाला दिलें आणि तो केरळांत आला. लोकांनीं त्याला केरळचा रक्षापुरुष म्हणून सिंहासनावर अधिष्ठित केलें. जनतेकडून त्याला केवळ स्वामित्वच मिळालें नाहीं, तर त्या बरोबरच 'पेरुमाळ' म्हणजे 'महान् शासक' अशी पदवीहि मिळाली. भावी काळांत केरळ देशावर ज्या पेरुमाळांनीं सत्ता गाजवली, ते सगळे या मूळ पेरुमाळाचेच वंशज होत.

ही घटना सनपूर्व ११३ या वर्षीं घडली. पेरुमाळ मोठा मुत्सद्दी होता. तिथल्या ब्राह्मणांचें बौद्धिक आणि लढाऊ असें उभयविध सामर्थ्य त्यानें अजमावलें होतें. म्हणूनच त्या लोकांना राजसत्तेपासून अलग करायचें नाहीं, असें त्यानें ठरवलें. त्यानें आपल्या साम्राज्याचे चार शासनविभाग केले आणि प्रत्येकावर सामंत म्हणून चार ब्राह्मणच नियुक्त केले. या सामंतांना त्यानें 'तलियातिरि' अशी उपाधि दिली. केरळभूमि अशा प्रकारें ब्राह्मण आणि क्षत्रिय अशा दोन्ही वर्णांकडून शासित होऊं लागली. लोक तिला 'ब्रह्मक्षत्र भूमि' असें म्हणूं लागले.

पेरुमाळांनीं इसवी सनाच्या ९ व्या शतकापर्यंत केरळावर अप्रतिहत राज्य केलें. हा सुमारें आठशें-नऊशें वर्षांचा काळ केरळाचें सुवर्णयुग ठरला. या कालांत त्या देशाची सर्व प्रकारें भरभराट झाली. परदेशांशीं नाविक व्यापार वाढला. शेती समृद्ध झाली. निरनिराळे व्यवसाय उत्कर्ष पावले. प्रजेला सुख लाभलें. समाज व्यवस्था सुरळीत चालली. साहित्य आणि संगीत या दोन्ही कला ऊर्जितावस्थेस आल्या. राजसत्ताहि आपल्या न्यायनीतीच्या मार्गावर राहिली.

भास्कर रविवर्मा हा या पेरुमाळ वंशांतलाच एक सम्राट्! यानें आपल्या कारकीर्दींत केरळांत एक नवा राजकीय उत्सव सुरू केला. 'महामखम्' किंवा 'मामांकम्' असें त्याचें नांव होतें. आजमितीसहि हा उत्सव धार्मिक स्वरूपांत दर बारा वर्षांनीं कुंभकोणम् या तमिळनाडमधल्या क्षेत्रांत चालू आहेच. पण प्रारंभीं भास्कर रविवर्म्यानें तिरुनावाय हें केरळांतलें एक गांव त्यासाठीं नेमस्त केलें होतें. प्रजेकडून आणि सामंत सरदारांकडून राजनिष्ठेचें जाहीर-पणें प्रदर्शन करविणें, हा त्या उत्सवाचा उद्देश होता. या उत्सवांत केरळाचा रक्षापुरुष,एका उच्च वेदीवर उभा राही आणि मग सामंत, सरदार, मंडलेश्वर असे कनिष्ठ राज्याधिकारी या केरळाधिपतीला नजराणे समर्पून त्याची कृपा याचीत. हा दरबारी उत्सव पाहण्यासाठीं हजारों लोक तिथें जमत. ह्या प्रसंगीं विद्वत्सभा होत आणि कलावंतांची नाट्यनृत्येंहि रंगत. केरळाधिपती-कडून या सर्वांना मुक्तहस्तानें बिदागी मिळे.

भास्कर रविवर्मा हा दुष्यंत, भरत, पृथु, रघु, या नृपावळींत शोभणार राजर्षि होता. आद्य शंकराचार्य याच्याच सत्ताकाळांत जन्माला आले अन् अखिल भारताचे धर्मसम्राट् बनले. भास्कर रविवर्म्याची शंकराचार्यांवर निस्सीम भक्ति होती. तो स्वतः संस्कृत आणि तामिळ भाषेचा पंडित होता. शंकराचार्यांच्या निर्याणानंतर पांच वर्षांनीं त्यानें समस्त केरळाची एक धर्मसभा 'कोल्लम्' नांवाच्या शहरांत बोलावली. या परिषदेला केरळांतले शास्त्री, पंडित आणि महाजन उपस्थित होते. परिषदेंत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यांत आले. केरळीय जनतेनें आपला आचार आणि व्यवहार शंकराचार्यांच्या वेदान्तमताला अनुसरून चालवावा हा मुख्य ठराव होता. त्या ठरावाला

अनुरूप असे अनेक नवे नियम त्या परिषदेनें बनवले. ही परिषद इ. स. ८२५ या सालीं भरली. भास्कर रविवर्म्यानें या परिषदेची स्मृति कायम राहावी म्हणून केरळांत एक नवी वर्षगणना ( किंवा शक ) सुरू केली. ज्या तिथीस ती परिषद भरली, त्या तिथीसच या वर्षाचा ' पाडवा ' होतो. कोल्लम् शहरांत ही परिषद भरली म्हणून त्या शकाचें नांवहि ' कोल्लम् वर्ष ' असेंच ठेवलें गेलें. इ. स. ८२५ हें या शकाचें प्रारंभ वर्ष मानण्यांत आलें.

या परिषदेनंतर दोनच वर्षांनीं भास्कर रविवर्म्याचें देहावसान झालें. त्याच्या मृत्यूनें केरळाच्या भाग्यरवीलाहि अस्तमती कळा लागली. हळूहळू केरळाला जातिभेदाची कीड लागली. फुटीर भावना बळावत चालली. ' नाना मतांचा गलबला ' उठला. सातांसमुद्रांपलीकडचे यहुदी अन् खिस्ती त्या काळापर्यंत केरळांत आपलें बस्तान जमवून बसले होते. मागाहून मुसलमानहि आले. हीन यातींचे समाज हें या परधर्मीयांचें कुरण बनलें. वरिष्ठ जातींकडून अपमानित अन् बहिष्कृत होणारे कनिष्ठ जातींचे लोक परधर्मीयांच्या गोटांत जाऊं लागले. वरिष्ठ वर्गानें या गोष्टीकडे सोयिस्करपणें डोळेझांक केली होती. समाजाला पोखरणाऱ्या या परदेशी अन् परधर्मी भुंग्यांच्या या पोखरणीबद्दल त्यांना खंत नव्हती, खेद नव्हता. ' मला काय त्याचें ' ही वृत्ति वरिष्ठ वर्गांत बळावली होती. एका काळचा केरळाचा शासक असलेला नागसमाज अधः-पाताच्या घसरगुंडीला लागला होता. त्यामुळें चहूंबाजूंनीं केरळाच्या वैभवाचा ऱ्हास होऊं लागला होता.

पेरुमाळ राजे दीन, दुबळे झाले, ते अशा विषम परिस्थितींत. केरळाच्या या भिन्न भिन्न अवस्थेंत पेरुमाळांनंतर केरळाचा रक्षापुरुष म्हणून वेल्लुवा-नाडच्या वेल्लुवाकोनामीची निवड झाली. पुढें शंभर वर्षें तें स्थान त्या वंशाकडे कसेंबसें टिकून राहिलें. त्या अवधींत केरळाच्या आधिपत्यासाठीं निरनिराळ्या महत्त्वाकांक्षी राजांची आपसांत स्पर्धा चाललीच होती. संघर्ष सुरूच होते. या संघर्षांतून सामूतिरि किंवा झामोरिन हा राजा वर आला. महामखमूच्या उत्सवांत वेल्लुवाकोनामीला खालीं ओढून तो त्या ठिकाणीं अध्यक्ष म्हणून उभा राहिला. सकळ सामंतांचे मुजरे त्यानें घेतले, नजराणे त्यानें स्वीकारले. आणि मग जाहीर केलें, कीं ' आजपासून केरळाचा स्वामी अन् या उत्सवाचा अध्यक्ष तो मी ! '

वेल्लुवाकोनामी पराभूत झाला खरा; पण वरमला मात्र नाही. त्यानें म्हटलें, ‘ बच्चमजी, ठीक आहे. पुढच्या उत्सवाच्या वेळीं घेतों तुझा समाचार ! ’ आणि मग तो त्याच एका प्रयत्नाला लागला. त्यानें शंभर निवडक भले तगडे नायरवीर गोळा केले. त्यांना त्यानें ‘ चावेर ’ असें नांव दिलें. चावेर म्हणजे मरणाला मारून पुढें जाणारे वीर. ‘ मेलों तरी माघार घेणार नाहीं ’ हीच त्यांची शपथ ! वेल्लुवाकोनामीनें त्यांची संघटना बांधली. त्यांना उत्तम-प्रकारें युद्धशिक्षण दिलें. उत्तम शस्त्रास्त्रेंहि त्यांच्या हातीं दिलीं. गेल्या युद्धांत स्टालिननें रशियनांना मंत्र दिला होता. ‘ जर्मनांचा द्वेष करा, अगदीं काळजां-तून द्वेष करा. ’ तोच मंत्र वेल्लुवाकोनामीनें या चावेरांना दिला. ‘ झामोरिनचा कडाडून द्वेष करा ! ’ आणि पुढच्या उत्सवाच्या ऐन दिवशीं त्यानें या चावेरांना झामोरिनवर लोटलें. पण झामोरिन सावध होता. त्याचें सेनादलहि खूप मोठें होतें. या शंभर चावेरांची चटणी उडवायला त्याला उशीर लागला नाही.

पण हें एवढ्यावरच थांबलें नाहीं. दरवर्षी चावेरांचें नवें पथक तयार व्हायचें, दरवर्षी त्यानें झामोरिनवर धाड घालायची अन् त्या रणप्रसंगांत मरणानेंच उत्तीर्ण व्हायचें. दरवर्षी तो उत्सवहि व्हायचा अन् त्याचें अवभृथ-स्नान रक्ताच्या धारांखालीं व्हायचें. पण तरीहि ही चावेरांची परंपरा खंडित झाली नाहीं. पुढें पुढें तर एकचक्रा नगरींतल्या बकासुराच्या पाळीप्रमाणें घरटी एक पुरुष ‘ चावेरां ’ त भरती होण्यासाठीं दिला गेला पाहिजे, असें लोकांनींच आपसांत ठरवून टाकलें. अशाच एका पाळीच्या प्रसंगीं चेण्डुनी हा सोळा वर्षांचा नवयुवक चावेरांत भरती होण्यासाठीं पुढें आला अन् त्यानें ख्याति केली. ‘ मामांकम् पाट्टु ’ या मलयाळी काव्यांत त्याचा तो रोमहर्षक प्रसंग वर्णिला गेला आहे. ती कथा खरोखर श्रवणीय आहे—

चावेरांत भरती होण्याची पाळी त्या वर्षी ज्या एका कुटुंबावर आली, त्या कुटुंबांत एकच मुलगा होता. वय वर्षें सोळा. लहानपणींच त्याचा बाप वीरगतीला गेला होता. पतीच्या मागून त्याच्या आईनें आपल्या वंशाचा दिवा म्हणून त्याचा प्रतिपाळ केला होता. तोच तिचें जीवनसर्वस्व होता.

एक दिवस तो बाहेरून घरीं येतो, तर त्याची आई म्लानमुखानें बसलेली. चेण्डुनीला कळेना, कीं आपल्या आईला एकाएकीं काय झालें ! चेण्डुनीनें जेव्हां हट्टच घेतला तेव्हां ती नाइलाजास्तव बोलली.

" माझ्या लाडक्या, महामखम् उत्सव जवळ आला आहे अन् चावेरांत भरती होण्याची पाळी चालू वर्षी आपल्या घरावर आली आहे."

" मग त्यांत तुला एवढं खट्टू होण्याचं काय कारण ?"

" आपल्या घरांत कोणी मोठा पुरुष नाहीं, याचं दुःख होतं."

" मी आहें कीं ! मला तूं लहान समजतेस ?"

" लहान नाहींतर काय ? ओठ पिळला, तर अजून दूध निघेल त्यांतून."

" विश्वामित्राच्या यज्ञाचं रक्षण करायला गेलेला राम किती वर्षांचा होता आई ? तो तर दशरथासारखा समर्थ बाप जिवंत असूनहि स्वतः पुढें झाला. माझे तर वडील हयात नाहींत. त्यामुळें रामाहूनहि ती जबाबदारी माझ्यावर अधिक येते, असं नाहीं तुला वाटत ?"

" तें खरं रे !....पण तुझ्यासारख्या पोराला चावेर हो म्हणायचा धीर होत नाहीं. शब्द कुठें तरी अडखळतात. वाटतं, कीं जिथून परत येणं नाहीं, अशा त्या मोहिमेवर तुझ्यासारखा कोवळ्या पोराला धाडायचं म्हणजे— "

" आई, तें सारं मला माहीत आहे. पण मला माझ्या घराण्याची वीर-परंपरा पुढें चालवलीच पाहिजे. अन्यथा माझं जिणं कलंकित होईल. भूमीला तें भारभूत ठरेल !"

पोटच्या गोळ्याचे ते तेजस्वी बोल त्या मातेच्या हृदयांत ठिणगीसारखे पडले, पेटले. मुलाच्या वीरवृत्तीनें ती अंतरीं सुखावली खरी; पण तो सुखाचा घडा दुःखाच्याच पाण्यानें भरलेला होता. चेण्डुनी चावेर झाल्यानें ती वीर-माता ठरणार होती. पण त्याच वेळीं तिचें निसंतानहि होणार होतें. पहिली गोष्ट तिला हवी होती आणि दुसरी अर्थात्च नको होती. पण तिच्या अंतरांतला हा संभ्रम चेण्डुनीनेंच दूर केला. सरळ आपल्या शस्त्रागारांत जाऊन त्यानें एक लखलखीत खड्ग उचलून घेतलें अन् आईला नमस्कार करून म्हटलें. ' आई, येतों मी !'

चावेरांचें तें दल बाहेर पडून ' तिरुमन्धानकुन्नु ' देवालयाच्या पश्चिम-द्वारावर आलें. पद्धत अशी होती, कीं तिथें पुथ्थुमन्नम्माच्या हातून भाताचा गोळा घेऊन चावेरांनीं पुढें जायचें. त्याप्रमाणें एकेक चावेर भाताचा गोळा घेऊन बाजूला होऊं लागला. आपली पाळी येतांच चेण्डुनीहि हात पसरून

पुढें गेला. पुथ्थुमन्नम्मानें एकवार त्याच्याकडे पाहिलें आणि तिचा हात एकदम मागें गेला. चेण्डुनीनें तिला विचारलें.

"कां ? हात मागं कां घेतलास ?"

त्यावर ती कनवाळू म्हातारी म्हणाली.

"पोरा, तुझ्या हातावर भाताचा गोळा ठेवायला जीव नाहीं धजत. किती कोवळं वय तुझं !"

"आईसुद्धा असंच म्हणत होती; पण तिनं मला परवानगी दिली."

"आईला तुझ्या काळीजच नसेल. तूं खरंच अजून लहान आहेस. चावेरांचा पराक्रम तुला नाहीं झेपायचा."

पुथ्थुमन्नम्माचे हे शब्द चेण्डुनीला अपमानास्पद वाटले. त्याच्या हृदयांतल्या चैतन्याच्या निखाऱ्यावर तिनें जणुं फुंकरच घातला होता. तो तीव्र शब्दांत तिला बोलला.

"माझ्या पराक्रमाबद्दल तुला शंका वाटते का ?.... पाहा तर मग !"

असें म्हणून चेण्डुनीनें अशी एक प्रचंड उडी मारली, कीं जन्मतांक्षणीं सूर्यबिंब कवळायला झेपावलेल्या बलभीम मारुतीचीच आठवण व्हावी. त्या एकाच उडीनें सगळे चावेरहि स्तिमित झाले. त्यांना वाटलें, कीं 'मूर्ति लहान; पण कीर्ति थोर !' हा मानव नसून अतिमानव आहे.

"माई, आतां तरी मला भाताचा गोळा देशील का ?"

त्याच्या या प्रश्नाला ती म्हातारी निरुत्तर झाली. त्या नवयुवकाविषयीं तिच्या अंतरांत अंजनेचें वात्सल्य उतरलें. डबडबलेल्या डोळ्यांनींच तिनें त्याच्या हातावर भाताचा गोळा ठेवला.

चावेरांनीं चेण्डुनीलाच मग आपला पुढारी निवडलें. त्याला पुढें घालून आपल्या राजाचा जयघोष करीत ते सगळे चावेर महामखमूच्या उत्सवस्थानाकडे निघाले. उत्सव थाटांत चालू होता. झामोरिन अध्यक्षस्थानावर आरूढ झाला होता. सामंत-सरदारांचे मुजरे अन् नजराणे स्वीकारण्यासाठीं सिद्ध झाला होता.

एवढ्यांत बाहेर रणघोषणा उठली. चावेरांचें पथक मंडपांत घुसलें. झामोरिनच्या सैनिकांनीं महाद्वारांतच त्यांना अडवलें. तलवारीला तलवार

भिडली. उत्सव-मंडप हा रणमंडप झाला. उभयपक्षीं कापाकापी सुरू झाली. पुष्कळ सैनिक कामास आले.

चेण्डुनी समोरचा प्रतिकार कापून तीरासारखा पुढें घुसला. त्यानें व्यास-पीठावर वाघासारखी झेप टाकली. दुसऱ्याच क्षणाला त्यानें झामोरिनवर असा जबरदस्त खड्गप्रहार केला, कीं झामोरिनला तो प्राणांतकच ठरावा ! पण झामोरिन सावध होता. बगल देऊन त्यानें तो वार चुकवला. चेण्डुनीनें दुसरा वार केला तो मात्र त्याच्या मुकुटावरच खणाणला. जिवावरचें मुकुटावर निभावलें. एवढ्यांत त्याचे शरीररक्षक चहूं बाजूंनीं चेण्डुनीवर तुटून पडले. पुन्हा दुसरा एक अभिमन्यु चक्रव्यूहांत सांपडला. मागून पुढून त्याच्या कोंवळ्या शरीरांत भाले घुसले. त्याच्या देहाची चाळण झाली. आणि त्यांत-त्याच एका कोणत्यातरी छिद्रांतून चेण्डुनीचा प्राणपक्षी पसार झाला. तो बाल-वीर विजेसारखा चमकला आणि एकाएकीं लुप्त झाला. तो वीरमरणानें मेला आणि उज्ज्वल कीर्तीनें चिरंजीवपणें जगला !

चेण्डुनीची ही कथा केरळाच्या लढाऊ परंपरेला साजेशीच आहे. ही कथा म्हणजे काल्पनिक काव्य नसून ती एक ऐतिहासिक घटना आहे. केवळ आपल्या राजाच्या इभ्रतीसाठीं वर्षानुवर्षें शेकडों नायरवीरांनीं आपल्या प्राणांची आहुति राजीखुशीनें देत राहावें, ही केरळाच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासांतहि एक आगळीच घटना म्हणावी लागेल. चेण्डुनी हा त्या सर्वांचा मुकुटमणि ठरतो आणि म्हणूनच केरळांतल्या लोकगीतांचा तो एक आदर-णीय नायक ठरला आहे.

ज्या झामोरिनविरुद्ध हे सगळे चावेर लढले, त्या राजवंशाचा संबंध पुढें सोळाव्या शतकांतल्या पोर्तुगीजांपर्यंत येऊन पोंचला आहे. पण तिथपर्यंत पोंचण्यापूर्वीं इतिहासाचा सुटलेला धागा पुनश्च हातीं घेऊन खूप मागें गेलें पाहिजे.

केरळाचा चीनशीं आणि पाश्चात्य देशांशीं प्राचीन काळापासून संबंध आलेला आहे. फिनिशिया, इजिप्त, खाल्डिया, ग्रीस, रोम, या देशांशीं केरळानें समुद्रमार्गें आपले व्यापारी संबंध प्रस्थापित केले होते. त्यांतहि रोमशीं दळणवळण विशेष होतें. कोडंगलूर हें केरळांतलें त्या काळचें जगप्रसिद्ध बंदर. रोमनांनीं तिथें आपल्या वखारी उघडल्या होत्या. त्या बंदराचें संरक्षण करण्या-

साठीं रोमन सैन्याच्या दोन तुकड्या तिथें सदैव सज्ज असत. आपल्या सम्राटाचें म्हणजे ऑगस्टसचें त्यांनीं तिथें एक मंदिरहि उभारलें होतें. आजहि केरळाच्या मातीखालीं रोमन नाणीं सांपडतात, त्यावरून या गोष्टीची साक्ष पटते.

केरळांत ज्यू लोकांची थोडीबहुत वस्ती आहे. हे सनपूर्व पांचव्या, सहाव्या शतकांत कधींतरी केरळांत उतरले आणि वसले. या सर्वांचा केरळांत मुक्काम ठोकण्याचा एकमेव उद्देश, म्हणजे व्यापार. व्यापाराचे मुख्य जिन्नस म्हणजे मसाले आणि काळीं मिऱ्यें. या जिनसांची पाश्चात्यांना अत्यंत गरज होती. मिऱ्यावांचून त्यांचे भोज्य पदार्थ चवदार होत नव्हते आणि लोकांची ती गरज भागवून स्वतः गब्बर होण्यासाठीं कित्येक पाश्चात्य व्यापारी मंडळ्यांनीं कंबर कसली होती.

मध्ययुगांत अरब व्यापारीहि या क्षेत्रांत उतरले. त्यांनीं पाश्चांत्यावर मात करण्यासाठीं खुष्कीच्या मार्गाची कोंडी केली अन् मलबारमधल्या सर्व व्यापाराच्या नाड्या आपल्या हातांत घेतल्या. तिथल्या सिरियन खिश्चनांनीं अरबांना त्या कामीं मदत केली. १४९८ सालीं पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को-डि-गामा हा कोचिनच्या बंदरांत उतरला. असें सांगतात, कीं त्याला भारताला येण्याचा जलमार्ग ठाऊक नव्हता. आफ्रिकेच्या किनाऱ्यावर त्याला कांहीं मलबारांतले खिस्ती खलाशी भेटले आणि त्यांनींच त्याला तो मार्ग दाखवून दिला. म्हणजे इथेंहि कुऱ्हाडीचा दांडाच गोतास काळ ठरला आहे.

१५०२ सालांत पोर्तुगीजांना कोचिन शहरांत राहायला राजाज्ञा मिळाली. १५०३ सालीं आफोंस द आल्बुकेर्क तिथें दाखल झाला. लगेच त्यानें तिथें एक किल्ला बांधला आणि त्याच्या सुरक्षित आसऱ्यानें आजूबाजूला आपलीं व्यापारी ठाणीं बसवलीं. केरळांतल्या अंतर्गत संघर्षांचा त्यानें व्यवस्थित फायदा घेतला. कोच्चिनच्या राजाचें अन् झामोरिनचें अहिनकुलवत् वैर होतें. झामोरिनच्या मनांत समस्त केरळाचें एकाधिपत्य मिळवण्याचीं स्वप्नें खेळत होतीं. कोच्चिनचा राजा त्यामुळेंच त्याच्या डोळ्यांत खुपत होता. पण त्याच्याशीं झालेल्या लढाईत पोर्तुगीजांनीं कोच्चिनचा पक्ष घेतला आणि त्यामुळें झामोरिनचीं तीं स्वप्नें भंगून गेलीं.

१५३० मध्यें फ्रान्सिस झेवियरचे गोरे पाय केरळाच्या भूमीला लागले. झेवियर म्हणजे कडवा कॅथॉलिक. सूक्तासूक्त, सुष्टदुष्ट, सगळ्या मार्गांनीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणें हें त्याचें ध्येय होतें. त्यामुळें त्यानें केरळांत बाटवाबाटवीचें घनघोर सत्रच सुरू केलें. धाकदपटशा, छळ, अत्याचार या सर्व मार्गांनीं तो केरळांतलीं कोकरें येशूच्या कळपांत ओढूं लागला. जें क्रौर्य, जें भीषण तांडव पुढें त्यानें गोमंतकांत केलें, तेंच त्या आधीं केरळांत केलें.

पोर्तुगीजांच्या बरोबरच डच व्यापारीहि केरळाच्या व्यापारावर चरत होते. तशांत डचांना एक दुर्बुद्धि आठवली. आपल्या मालाला भाव वधारून मिळावा, म्हणून त्यांनीं मिऱ्यांची कृत्रिम टंचाई निर्माण केली. तिची झळ तावडतोब इंग्लंडला बाधली. तोंवर इंग्रजांनीं भारतांतल्या व्यापारासाठीं आपलीं तारवें समुद्रांत लोटलीं नव्हतीं. पण डचांच्या या अतिरेकी स्वार्थामुळें ते तावडतोब जागे झाले. 'ईस्ट इंडिया कंपनी' नांवाची एक व्यापारी संस्था स्थापन करून भारतीय व्यापारासाठीं त्यानीं आपलें पहिलें जहाज हांकारलें. १६३४ सालीं या कंपनीनें कोच्चिनमध्यें आपलें व्यापारी ठाणें उभें केलें.

इंग्रजांचा पाय भारताच्या भूमीवर पडला त्याला मूळ कारण म्हणजे हीं काळीं मिऱ्यें! अर्थात् त्यांच्या जोडीला इतर मसाल्याचे पदार्थहि होतेच. ते तागडी घेऊन आले अन् एकेक भाग काबीज करीत सरते शेवटीं दीडशें वर्षें भारताचे सार्वभौम सम्राट् होऊन बसले. भारताच्या इतिहासाला हें गोरें वळण लावलें तें या काळ्या मिऱ्यांनीं, असें म्हटलें, तर तें वावगें होणार नाहीं.

पोर्तुगीज अन् डच यांचेंहि आपसांत वैमनस्य होतेंच. पोर्तुगीजांचा व्यापारी उत्कर्ष डचांच्या मनांत डांचत होता. ते योग्य संधीची वाट पाहात राहिले होते. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धांत त्यांनीं बळ बांधलें अन् केरळाच्या भूमीवरून पोर्तुगीजांना हुसकलें. केरळांतला व्यापार त्यामुळें डचांच्या हातीं आला. पण १८ व्या शतकांत या डचांनाहि केरळांतून आपला गाशा गुंडाळावा लागला. त्यांना पिटाळून लावण्याचें हें काम मार्तंडवर्मा या राजानें केलें. तेवढेंच करून तो राहिला नाहीं. त्यानें नवीं बंदरें निर्माण केलीं अन् नवीं नगरेंहि वसवलीं.

पण त्यालाहि १८ व्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत म्हैसूरच्या हैदर अल्लीकडून पराभव खावा लागला. संपूर्ण मलबारच हैदरअल्लीच्या कबजांत

गेला. टिपू सुलतान हा त्याचा 'सुपुत्र' पक्का हिंदुधर्मांचा द्वेष्टा. त्यानें केरळी प्रजेला ' दे माय धरणी ठाय ' करून सोडलें. त्यानें अनेक लोकांना सक्तीनें बाटवलें. देवळें मोडलीं. मठ भ्रष्टवले. बायकांवर बलात्कार केले. सर्वप्रकारें अत्याचारांची सीमा गांठली. अखेर लोक खवळले. दबलेल्या राजसत्ताहि खवळल्या. टिपूविरुद्ध केरळांत मोठें बंड उठलें. इंग्रज यावेळीं टिपूच्या विरुद्ध अन् लोकांच्या बाजूनें उभे ठाकले. टिपूला प्रथम एक दोन विजय मिळाले खरे; पण अखेर श्रीरंगपट्टणच्या लढाईत त्याचा अंत झाला.

इंग्रज हळू हळू हातपाय पसरीत होतेच. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं केरळाची भूमि त्यांच्या अंकित झाली. इंग्रजी राजवटीचे अखिल भारतावर जे बरे-वाईट परिणाम झाले, तेच केरळावरहि झाले. ' केरळ संस्कृति ' हें प्रकरण लिहितांना मी त्यांचा आवश्यक तेवढा प्रपंच करीन.





# साहित्य आणि साहित्यकार

केरळांत जी भाषा बोलली जाते तिला ‘मलयाळम्’ असें म्हणतात. कासरगोडपासून त्रिवेन्द्रम्‌पर्यंतचा भूभाग, दक्षिण कर्नाटकाचा थोडासा अंश, त्रिवांकुर (त्रावणकोर) प्रदेशाचा बराचसा भाग, नीलगिरीचा परिसर, तसेंच मलबार आणि कोच्चिन, एवढ्या भूभागावर मलयाळम्‌चें साम्राज्य आहे. मलयाळम्‌चे वर्णोच्चार तमिळप्रमाणेंच आहेत. मृदु आणि कठोर वर्णांची अदलाबदल करणें हें तमिळचें वैशिष्ट्य तिनेंहि अंगीकारलें आहे. उदाहरणार्थ- ‘नम्पूतिरि’ बद्दल ‘नम्बूदिरि’ ‘नम्पि’ बद्दल ‘नम्बि’ इत्यादि. मागचा स्वर ऱ्हस्व अन् पुढचा ऱ्हस्व किंवा दीर्घ यांच्या मधल्या व्यंजनाचें द्वित्व होतें. उदाहरणार्थ ‘शास्त्र+कळि=शास्त्रक्कळि’, ‘कृषि + पाट्टु = कृषिप्पाट्टु’ इत्यादि. नव्या मलयाळम्‌मध्यें क्रियापदाचे स्त्री-पुरुषवाचक वेगळे प्रत्यय नाहींत. या बाबतींत मराठी, हिंदीपेक्षां संस्कृतकडे तिचा ओढा आहे. संस्कृतांत ‘मी जातो’ किंवा ‘मी जातें’ यासाठीं ‘गच्छामि’ हें एकच क्रियापदाचें रूप पुरतें. मलयाळम्‌मध्येंहि जाण्याबद्दल स्त्री-पुरुष दोघेहि ‘पोकुन्नु’ हें एकच क्रियापदाचें रूप वापरतील. त्या भाषेनें अशा प्रकारें स्त्री-पुरुषांना समानत्व बहाल केलें आहे.

त्याचप्रमाणें मलयाळम्‌मध्यें नागरी वर्णमालेहून कांहीं अक्षरें अधिक आहेत. स्वरमालेंत ‘ए’ आणि ‘ओ’ यांचीं ऱ्हस्व रूपें आहेत, तसेंच ड, र, ष, हीं व्यंजनें दुहेरी आहेत. त्यांचा उच्चार नागरी वर्णमालेंतल्या या व्यंजनां-हून भिन्न आहे. ट आणि न या वर्णांबद्दलहि तसेंच. यांपैकीं कांहींचे उच्चार अधिक मृदु किंवा अधिक कठोर होतात.

मलयाळम्‌च्या कुळगोत्रासंबंधीं बरेच मतभेद आहेत. मलयाळम् ही तामिळ भाषेची कन्या, भगिनी, संस्कृतोद्‌भव आणि स्वतंत्र, एवढे प्रकार त्या मत-भेदांत पडतात. तमिळवाले तिला आपल्या घरची माहेरवाशीण ठरवण्याबाबत साक्षीपुरावे पुढें आणतात; तर केरळवाल्यांना तिचा स्वतंत्र उगम शोधून काढायचा असतो. मलयाळम् ही स्वतंत्रपणें जन्मली आणि तमिळ अन् संस्कृत या भाषांशीं गोडीगुलाबी करून, पण आपलें स्वातंत्र्य न गमावतां वाढली, विकसली, हें केरळीयांना सिद्ध करायचें असतें.

मात्र 'लीलातिलक' नांवाच्या प्राचीन केरळीय ग्रंथांत मलयाळम्‌चें द्राविड म्हणजे तमिळगोत्र त्या ग्रंथकारानें मान्य केलें आहे. पण ती थेट संस्कृत भाषेपासून उगम पावली आहे, असें कोवुण्णि नांवाचा एक केरळी पंडित म्हणतो—

" संस्कृतहिमगिरिगलिता
द्राविडवाणी कलिंगजामिलिता
केरलभाषा गंगा विहरतु
मे हृत्सरस्वतीसंगा "

याचा अर्थ असा—संस्कृतरूपी हिमाचलांतून उगम पावलेली आणि आपल्या प्रवासांत तमिळभाषेशीं संगम पावलेली केरळभाषारूपी गंगा माझ्या हृदयांतल्या सरस्वतीसह सदा विहार करो.

तिसरें मत डॉक्टर गुंडर्ट या पादरी महाशयांचें. मलयाळम्‌चा इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न त्यांनीं केला, हा त्यांचा अधिकार. ते म्हणतात, कीं मलयाळम् ही तमिळची धाकटी बहीण आहे. जर मलयाळम् ही तमिळ-कन्या नसेल, जर ती संस्कृतोद्‌भवहि नसेल, तर तिचें प्राचीन स्वतंत्र रूप कसें होतें हें दाखवून देण्याची जबाबदारी अर्थात्‌च मलयाळम्‌च्या स्वतंत्र उत्पत्तीच्या पुरस्कर्त्यांवर येऊन पडते.

पण ती जबाबदारी स्वीकारायला मुद्देमालासह एक गृहस्थ पुढें आले आहेत. त्यांचें नांव आहे चेलनाट अच्युत मेनोन. त्यांनीं खूप परिश्रम करून केरळांतलीं प्राचीन आणि परंपराप्राप्त अशीं पुष्कळ लोकगीतें गोळा केलीं

आहेत. त्यांनीं त्यांचें प्रकाशनहि केलें आहे. त्या संग्रहाचें नांव आहे 'वटकन् पाट्टुकल्.' श्री. मेनोन हे त्या गीतांची विविध प्रकारें छाननी करून अनुमान काढतात, कीं 'कमींत कमी एक हजार वर्षांपूर्वींचीं हीं गीतें असून त्या गीतांची भाषा हेंच मलयाळम्चें प्राग्रूप आहे. कारण, त्या गीतांत संस्कृत अथवा तमिळ शब्दांशीं साम्य असलेला एकहि शब्द आढळत नाहीं. इतक्या दूरच्या त्या भूतकाळांतहि तिची काव्यशक्ति सरळ, मधुर अन् प्रवाही दिसते. एक हजार वर्षांपूर्वींच ती आपले बालवयांतले बोबडे बोल टाकून पोक्त्या-सवरत्या बाईची भाषा बोलूं लागली आहे. तिला आपल्या हृदयांतले सूक्ष्म भाव व्यक्त करण्याचें सामर्थ्य आलें आहे. म्हणजेच तिचा उगम त्याहून खोल भूतकाळाच्या गुहेंत जातो.' हीं सर्व मतें विचारून, विवंचून श्रीमती रत्नमयीदेवी दीक्षित यांनीं मलयाळम्विषयीं पुढील निष्कर्ष सांगितला आहे—

मलयाळम्चा उगम स्वतंत्र आहे. तिला आपल्या मार्गक्रमणांत तमिळ भाषा भेटली, तशीच गीर्वाणभाषाहि भेटली. मलयाळम्नें दोघींशींहि सलगी करून आपलें घर समृद्ध केलें. त्या प्रकरणीं आपलें रंग-रूपहि तिनें बदललें. चेरराजांच्या सत्ताकालांत तिच्यावर तमिळचा प्रभाव पडला. पेरुमाळांच्या शासनकाळांत आर्य ब्रह्मणांच्या पंक्तींत वाढायला येतांना ती संस्कृतचा पीतांबर नेसली. हे दोन्ही प्रवाह आपल्या पात्रांत सामावून घेऊन ती वाढली, भरली. मात्र तिचें पहिलें परिवर्तन संस्कृत का तमिळ, का दोन्ही बरोबर, हें सांगतां येणें कठिण आहे. कारण केरळ देशाचाच जिथें अद्यापि साधनसंपन्न असा इतिहास लिहिला गेला नाहीं, तिथें भाषेचा इतिहास कुठला? आणि इतिहास नाहीं म्हणजे निर्णयाच्या बाबतींत मूग गिळून बसणेंच भाग.

पण तें कांहीं असलें, तरी मलयाळम्चें प्राचीन साहित्य सगळें लोकगीतात्मकच आहे. ज्ञानेश्वरासारखा काव्यसृष्टीचा ईश्वर निर्माण होऊन त्याच्या तेजानें झळाळून निघायला तिला सोळाव्या शतकापर्यंत तपश्चर्या करावी लागली. तोंवर ती लोकगीतें आणि सटरफटर काव्यें यांवरच खुटुखुटु निर्वाह करीत होती. केरळाच्या या लोकगीतांना 'पाट्टु' असें नांव आहे. तोट्टम् पाट्टु, पुल्लुवन पाट्टु, मावारतम् पाट्टु, निडलकूत्तु पाट्टु इत्यादि. पाट्टु याचा अर्थच गीत असा आहे. दैवतगीतें, चरितगीतें, वीरगाथा, हीं सगळीं पाट्टु काव्यांतच मोडतात.

हीं गीतें चहूंकडून जमवून त्यांचा संग्रह करण्याचें कार्य केरळांत अलीकडेच सुरू झालें आहे. पण आतां ही काव्यसंपदा अल्पांशानेंच हातीं लागते. त्यांतलीं बरींचशीं गीतें कालौघांत नष्ट झालीं आहेत. या गीतांत 'भद्रकाली पाट्टु' या सदरांत येणारीं गीतें सर्वांत प्राचीन वाटतात. भद्रकाली ही केरळी जनतेची प्राचीन कालापासूनची उपास्य देवता आहे. तिच्या पूजे-अर्चेत हीं गीतें गायलीं जातात. हीं गाण्याचें काम कुरुत्तनमार नांवाच्या एका नायर जातीकडे असतें. तीं फक्त ऐकायचीं. त्यांना लेखणी लावणें म्हणजे 'शांतं पापम्!' हीं गीतें करुणरसात्मक असल्यामुळें ऐकतांना हृदयस्पर्शी वाटतात. त्यांतल्या कारुण्याचा एक नमुना सांगतों. त्यांत एका अश्राप नायर-कन्येची कर्मकथा भावगंभीर होऊन उमटली आहे—

उत्तर केरळांतल्या एका कुटुंबांत सात भावांच्या नंतर एक बहीण जन्माला आली. आईबापांनीं तिचें नांव माक्कम् ठेवलें. ती जितकी रूपवती तितकीच गुणवतीहि होती. पण बिचारीला दैव मात्र अनुकूल नव्हतें. लहानपणींच तिचें लग्न झालें. पुढें आई-बाप निवर्तले. नवराहि अल्पायुषी ठरला. माक्कम् माघारी आली आणि भावांच्या घरीं राहूं लागली. भावांची तिच्यावर खूप माया होती. पण भावजया मात्र तिला पाण्यांत पाहूं लागल्या. तिला घालून पाडून बोलणें आणि आपल्या नवऱ्याजवळ तिच्या चुगल्या करणें, हें जणूं त्यांनीं व्रतच घेतलें. त्यांना कसेंहि करून माक्कमूला घरांतून बाहेर काढायचें होतें. ती उघड्यावर पडल्यानेंच त्यांचा आत्मा शांत होणार होता.

ती संधि त्यांनीं एक दिवस साधली. माक्कम् घरांत एकटीच होती. एवढ्यांत गांवचा तेली तेल घेऊन अंगणांत आला. घरांत दुसरें कोणीच नसल्यामुळें माक्कमूला त्या तेल्याशीं बोलावें लागलें. तीं दोघें बोलत असतांना तिची एक भावजय तिथें उपटली. तिला वाटलें कीं, 'बरी सांपडली नणंद!' तिनें ती गोष्ट आपल्या जावांना सांगितली. सगळ्या जावांनीं मिळून ठरवलें, कीं 'माक्कमूचा त्या तेल्याशीं अनैतिक संबंध आहे.' त्यानीं मग ती गोष्ट पुरुषांच्या कानांत ओतली. मग मात्र ते भाऊ तिच्यावर उलटले. कारण तिच्या त्या दुष्कृत्यानें तें सारें घराणेंच कलंकित होणार होतें. भावांनीं तिचे वाभाडे काढले. सातवा भाऊ तेवढा तिच्या पाठीशीं उभा राहिला. पण माक्कमूला तो भलता आळ सहन झाला नाहीं. तिनें परसांतली विहीर जवळ

केली. ती प्राणत्याग करून सगळ्याच छळवादांतून मुक्त झाली. पण माक्कम्‌ची ती आत्महत्या त्या कुटुंबाला शापरूप ठरली. पाठोपाठ त्यांच्या घराला आग लागली. त्या आगींत घरासह सारीं माणसेंहि जळून भस्म झालीं. त्या लाक्षागृहांत जगलें तें एक जोडपें. माक्कम्‌ला सहानुभूति दाखवणारा धाकटा भाऊ अन् त्याची बायको !

माक्कम् मेली; पण आपल्या अश्राप मरणानें आणि शुद्ध सत्त्वानें ती देवता बनली. आजहि केरळांत सत्यनिष्ठा आणि निर्दोषता या गुणांसाठीं ती आदर्शरूप ठरली आहे.

मलयाळम् लोकगीतांचा दुसरा गट म्हणजे 'पुल्लुवनपाट्टु.' हीं देवाधर्माचीं गीतें आहेत. हीं गीतें गाणारी पुल्लुवन नांवाची एक जात आहे. हे लोक आजहि गांवोगांवीं हिंडून वीणेच्या साथीवर हीं गीतें गातात अन् आपला योगक्षेम चालवतात. 'निडलकूत्तुपाट्टु' हीं रणगीतें होत. युद्धांत शत्रूचा संहार होऊन आपल्या पक्षाला विजय मिळावा, या उद्देशानें प्राचीन काळीं हीं गीतें गायिलीं जात. या गीतांतले प्रसंग महाभारतांतून घेतलेले आहेत आणि त्यांत कपोलकल्पित असाहि बराच भाग घुसडून दिलेला आहे. कौरव-पांडवांची पुढील गोष्ट तुम्हांला महाभारतांत आढळणार नाहीं; पण केरळी जनतेनें ती तशी बनवली आहे—

कौरव–पांडव हे भाऊ भाऊ खरे; पण पांडवांच्या तेजापुढें कौरव निस्तेज पडूं लागले. कौरवांना पांडवांचा उत्कर्ष सहन झाला नाहीं. एक दिवस त्यांनीं एका मलवासीला म्हणजेच मांत्रिकाला बोलावून आणून त्याला हुकूम केला.

"तूं अभिचार प्रयोग करून पांडवांना मारून टाक."

मलवासी त्या पापकृत्याला कबूल होईना; पण कौरवांच्या धाकानें शेवटीं त्याला ती गोष्ट मान्य करावी लागली. त्यानें मूठ मारण्याचा प्रयोग केला आणि त्यामुळें पांडव बसल्याजागीं गतप्राण झाले. कौरवांनीं त्या मांत्रिकाला वस्त्र–भूषणें देऊन घरीं धाडलें. आपला नवरा नवऱ्यामुलासारखा नटून–सजून घरीं आलेला पाहून त्याच्या बायकोला संशय आला. तिनें त्या प्रकरणाचा भेद काढला. तीहि त्याच्या सवाई मांत्रिक होती. आपल्या

नवऱ्यानें पांडवांचा घात केला ही गोष्ट तिला सहन झाली नाहीं. ती धावत पळत पांडवांच्या घरीं गेली आणि तिनें आपल्या नवऱ्याचा अभिचारप्रयोग उलटा करून पांडवांना पुनश्च जिवंत केलें.

'निडलकूत्तुपाट्टु' या गीतांच्या कथा या अशा प्रकारच्या असतात.

'मार्गमूकळीपाट्टु' हीं तिथल्या ख्रिश्चन समाजाचीं गीतें आहेत. हींहि बरींच प्राचीन आहेत. या गीतांतून सेंट थॉमसच्या धर्मकार्याचें वर्णन आढळतें. केरळाची भूमि ही चरित्र-गीतांविषयीं प्रसिद्ध आहे. हीं चरित्रगीतें तिथल्या रणधुरंधरांचीं असतात. या गीतांचे कवि अज्ञात आहेत. ते हीनयातीचे असले तरी शिक्षित असावे, असें वाटतें.

केरळांतल्या या लोकगीतांत राग, ताल, लय आणि प्रवाह हे सारे गुण कमीजास्त प्रमाणांत आढळतात. या गीतांना साहित्यरसाचाहि ओला स्पर्श आहे. केरळाच्या प्राचीन संस्कृतीवर या गीतांमुळें कांहीं प्रकाश पडतो. या गीतांतला स्पष्टवक्तेपणाहि वाखाणण्याजोगा आहे. या गीतांतला अमात्य, सत्य आणि पथ्य बोलण्याच्या कामीं राजाला भीत नाहीं. नोकर धन्याला डरत नाहीं. आणि पत्नीहि पतीचा मुलाहिजा ठेवीत नाहीं. महाभारतांत 'विदुलापुत्र संवाद' नांवाचा एक प्रसंग आहे. त्या प्रसंगांत शत्रूला पाठ दाखवून पळून आलेल्या आपल्या पुत्राचा विदुला तीव्र शब्दांत धिक्कार करते. केरळांतहि अशा विदुला मातांचा अभाव नाहीं. तो वीरांचा देश आहे. तिथल्या स्त्रियांना वीरपत्नी आणि वीरमाता होण्याची लालसा आहे. एका पाट्टुगीतांत अशीच एक माता लढाईवर जाणाऱ्या आपल्या पोटच्या गोळ्याला बजावते—

"तूं समोरासमोर युद्ध करीत असतां घाव लागून मेलास, तर मी सोन्याच्या पालखींतून तुझं प्रेत मिरवीन. आणि जर पाठीवर वार खाऊन मेलास तर मात्र बेवारशी भणंगाप्रमाणें तुझं प्रेत खड्यांत ओढून घालायला लावीन. मी तुझी अंत्यक्रिया करणार नाही; इतकंच काय; पण तुझ्या नांवानं आंघोळ-सुद्धा करणार नाही!"

मलयाळम् भाषेतलीं हीं लोकगीतें विविधतेंत बेजोड आहेत आणि केरळाच्या प्राचीन इतिहासाला मोलाची साधन-सामग्री पुरविणारीं आहेत. या गीतांचा काल जो कोणता असेल तो असो! पण मलयाळम् भाषेचा तो

प्रारंभकाल मानायला हवा. मलयाळमूवर तमिळ भाषेचा प्रभाव पडला, तो काळ त्यानंतरचा होय. तसा तो प्रभाव अपरिहार्यपणें पडावा, असा एक काळ केरळांत आला होता. ' रामचरितम् ' हें अशा काळांतलें मलयाळम् काव्य होय. हें काव्य वाल्मिकीच्या युद्धकांडापुरतेंच मर्यादित आहे. याचा कवि कोण, त्याबद्दल अजून निश्चित मत नाहीं. कांहीं पंडितांच्या मतें या काव्याची रचना मलयाळम्चा संस्कृताशीं संपर्क येण्यापूर्वीं झालेली आहे. पण त्यांतलीं अंतर्गत प्रमाणें त्याच्याविरुद्ध पुरावा देतात. या काव्यांत अनेक संस्कृत शब्दांचीं विकृत रूपें आढळतात.

केरळांतल्या मंदिरांत ' पाठकम् ' सांगण्याची प्रथा प्राचीन कालापासून आहे. ' पाठकम् ' सांगणें म्हणजे आपल्याकडील पुराण सांगण्याचाच प्रकार. केवळ त्याच उद्देशानें मलयाळम्मध्यें रामायण, भारत, भागवत, इत्यादि प्रवचनोपयोगी ग्रंथ निर्माण झाले. या संस्कृत पद्यमय ग्रंथांचें मलयाळम् गद्यांत परिवर्तन केलेलें आहे. चाक्यार जातीचे लोक तिकडच्या देवळांतून हें पुराण सांगण्याचें, त्याचप्रमाणें आख्यानें गाऊन अभिनय करण्याचें काम करतात. पेरुमाळांच्या शासनकाळांत मलयाळम्चें पहिलें व्याकरण लिहिलें गेलें. ' लीलातिलकम् ' या नांवानें तें प्रसिद्ध आहे. ' तोळ-काप्पियम् ' हें जसें तामिळ भाषेचें पहिलें व्याकरण, तसेंच ' लीलातिलकम् ' हें मलयाळम्चें. पाणिनीच्या अष्टाध्यायीप्रमाणेंच तेंहि सूत्ररूपानेंच लिहिलेलें आहे. मात्र यांत व्याकरणाबरोबरच काव्यशास्त्राचीहि चर्चा आहे. याचा कर्ता कोण असेल तो असो; पण तो सहाव्या शतकांत कधींतरी होऊन गेला हें त्यांतल्या अंतर्गत प्रमाणांवरून कळतें. एवढेंच नाहीं, तर त्या ग्रंथांच्या रचनाकाळांत मलयाळमूवरचा द्राविड प्रभाव समाप्त होऊन संस्कृत प्रभावाला प्रारंभ झाला होता, हेंहि स्पष्टपणें दिसतें.

त्या काळांत संघासंघानीं उत्तरेचे विद्वान् आर्य ब्राह्मण केरळांत प्रविष्ट झाले आणि पुढें तिथें स्थायिकहि झाले. मलयाळमूवर संस्कृताचा प्रभाव पाडण्याचें काम याच लोकांनी केलें. त्याच काळांत मलयाळमूनें आपलें शुद्ध देशी रूप टाकून ' मणिप्रवाळ ' शैली स्वीकारली. केरळी साहित्यांतली ही एक गाजलेली विशिष्ट शैली आहे. ' भाषासंस्कृतयोगो मणिप्रवालः ' मूळ मलयाळम् भाषा म्हणजे मणि आणि संस्कृत भाषा म्हणजे प्रवाळ. या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम .................. दि: ...... ..........

दोहोंच्या संयोगानें बनते, तीच मणिप्रवाळ शैली होय. नंबोरिवितांच्या भाषेंत सांगायचें तर ही ‘ प्राकृतसंस्कृत मिश्रित कंथा ’ च असते. पूनम् नम्पूतिरीनें राजाला उद्देशून लिहिलेला पुढील एकच श्लोक पाहा; म्हणजे ‘ मणिप्रवाळ ’ पद्धतीची कल्पना येईल—

“ तारिल् तन्वी कटाक्षांचल मधुपकुलाराम रामाजनानम्
नीरिल्तार्‌बाणवैराकर निकरतमोमंडली चंडभानो
नेरेत्तात्तोरुनीयां तोट्कुरि कलयाय् केन्नुमेषां कुडिक्कुन्
नेरत्तिन्निप्पुरं विक्रम नृवर धरा हंत कल्पांततोये ”

‘ हे महालक्ष्मीच्या कटाक्षांचें लक्ष्य असलेल्या राजा, हे तरुणसुंदरींच्या कामदेवा ! हे शत्रुरूपी अंधार नष्ट करणाऱ्या चंड भास्करा ! ज्या भूमीचा तूं सौभाग्यतिलक ठरला आहेस, ती भूमि कल्पांतींच्या प्रळयांत स्नान करीपर्यंत तुला सोडून न जावो ! ’

पेरुमाळकालीन मलयाळम् साहित्यांत ‘ कण्णशन पाट्टुकल् ’ या संग्रहाचें स्थान सर्ववरिष्ठ मानलें जातें. मध्य तिरुवितांकुरच्या निरणम् देशांत कण्णशनपरम्पू नांवाचें एक स्थान आहे. तिथें ज्या ज्या कवींनीं जन्म घेतला, ते ते सर्व ‘ निरणम् कवि ’ या एकाच नांवानें प्रसिद्ध आहेत. या सर्वांचें काव्य विशिष्ट वृत्तांत निबद्ध आहे. त्यामुळें ‘ निरणम् वृत्त ’ हें नांव त्याला पडलें. या सर्व कवितेला ‘ कण्णशन पाट्टुकल् ’ असें म्हणतात. या ‘ कण्णशन् ’ कवींत ‘ राम पणिक्कर ’ या कवीनें रामायणाची रचना केलेली आहे. हा राम पणिक्कर निरणम् कवींतच नव्हे, तर मलयाळम्‌च्या तत्कालीन सर्व कवींत श्रेष्ठ गणला जातो. रामायणाशिवाय भारत, ब्रह्मांडपुराण, शिवरात्रिमाहात्म्य आणि भागवतदशम इत्यादि अनेक ग्रंथ त्यानें रचले आहेत. राम पणिक्करची प्रतिभा उन्मेषशीलनी आहे. पांडित्य स्वतःसिद्ध आहे. त्याच्या शब्दांमागून अर्थ कसा धावत जातो. मलयाळम् साहित्याच्या आकाशांत राम पणिक्कर हा अभिजिताच्या ताऱ्यासारखा तेजस्वी वाटतो.

तिथून थोडें पुढें गेल्यावर आणखी एक शांत, शीतल पण भास्वर असा तारा चमकतांना आढळतो. त्याचें नांव आहे ‘ चेरुश्शेरी. ’ हा नम्पूतिरि

ब्राह्मण होता. यानें 'कृष्णपाट्टु' किंवा कृष्णगाथा नांवाचा एक सुप्रसिद्ध काव्यग्रंथ लिहला आहे. त्याची ही कृष्णगाथा भागवताच्या दशमस्कंधाच्या आधारें प्रवाहित झाली आहे. आधार भागवताचा; पण मांडणी आणि शैली, कल्पना आणि भावना हीं त्या कवीचीं स्वतःचीं आहेत. रासक्रीडेच्या प्रसंगीं श्यामसुंदरानें जी मुरली वाजवली, त्या स्वराचें माहात्म्य सांगतांना तो म्हणतो.

"तो मुरलीरव ब्रह्मदेवाला सामगायनासारखा झाला. जीवन्मुक्तांना तो परम तत्त्वाचा स्वाद बनला. भक्तांना त्याची चवी 'मधुराहुनि मधुर' वाटली. फार काय सांगावें ! कृष्णाचें तें वेणुवादन वृक्षांचें दोहद संगीत ठरलें. तें कामदेवाचें उत्तेजन बनलें. तें अनेक आश्चर्यांचें 'वाहन' आणि सर्व लोकांच्यासाठीं 'मोहन' बनलें !"

या चेरुश्शेरीच्या बाबतींत आपल्याला कांहीं विशेषशी माहिती मिळत नाहीं. चेरुश्शेरी हें त्याच्या कुलाचें नांव किंवा आडनांवहि असेल. व्यक्तिगत नांव काय असावें हरि जाणे ! त्यानें आपल्या काव्याच्या प्रारंभीं एवढेंच लिहून ठेवलें आहे, कीं 'उदयवर्मा नामक राजाच्या आज्ञेनुसार मी ही भागवतकथा पद्यबद्ध करीत आहें.' त्यावरून या कवीचा काल तेवढा निश्चित करतां येतो. महाराष्ट्रांत जसा तुकोबा तसाच केरळांत हा चेरुश्शेरी लोकप्रिय आहे. त्याच्या 'कृष्णपाट्टु'मधलीं एकदोन पद्येंसुद्धा ज्याला मुखोद्गत नसतील, त्याचा सुसंस्कृतपणा केरळांत संशयास्पद ठरतो. त्याच्या कृष्णगाथेमध्यें प्राचीन मलयाळम् शब्द बरेच आहेत. त्यानें संस्कृत भाषेचा उपयोग केला आहे, पण तो स्वतंत्रपणें. मलयाळम् शब्दांना संस्कृत विभक्तींचे प्रत्यय जोडून त्यानें आपली भाषा धेडगुजरी बनवली नाहीं. मलयाळम् भाषेच्या शक्ति, तेजस्विता आणि प्रगल्भता या कृष्णगाथेंत सम्मीलित रूपानें उठून दिसतात. ही कृष्णगाथा ज्या एका विशेष वृत्तांत लिहिलेली आहे, त्या वृत्ताला केरळ रसिकांनीं 'मंजिरी' असें नांव दिलें आहे. हीं गीतें वेगवेगळ्या रागांत अन् तालांत नृत्याच्या वेळीं गायिलीं जातात.

संस्कृत भाषेनें केरळांत प्रवेश केला आणि त्यामुळें मलयाळम्‌चा सर्व अंगांनीं विकास घडून आला. केरळाची राजसत्ता नम्पूतिरी ब्राह्मणांच्या हातीं आली, तेव्हांपासून मलयाळम्‌वर संस्कृताचा प्रभाव पडूं लागला.

संस्कृत भाषेच्या संपर्कामुळें त्याच्या प्राचीन संस्कृतींत एक नवा अध्याय लिहिला गेला अन् मलयाळम्च्या अंगीं एक नवें सौंदर्य झळकलें. केरळांत संस्कृत आल्यामुळें मलयाळम्च्या वृक्षाला नाटक, चित्रकाव्य, महाकाव्य, संदेशकाव्य इत्यादि अनेक नव्या शाखा फुटल्या. शुद्ध संस्कृतांत तर ग्रंथ-रचना झालीच; शिवाय संस्कृतमिश्रित मलयाळम् या मणिप्रवाल शैलींतल्या कृतींनाहि बहर आला. प्रत्येक शाखा त्यामुळें मोहरली, बहरली. या कालाला मल्याळम् साहित्यांत ‘ मणिप्रवाल काल ’ असें नांव आहे. मणिप्रवाल शैली विशेषेंकरून दृश्य काव्य, चम्पू काव्य आणि नाटक या तीन प्रकारांत अभिव्यक्त झाली आहे.

### उण्णुनीलि संदेशम्

दृश्य काव्यांत संदेशकाव्यांचा वर्ग पहिला. ‘ तत्रापि च शकुन्तला ’ म्हण-तात, त्याप्रमाणें त्यांतहि ‘ उण्णुनीलि संदेशम् ’ या काव्याचें नांव पहिल्या प्रथम घेतात. केरळांत संस्कृत भाषेचें अध्ययन चौफेर वाढलें तसतसें संस्कृत महाकाव्यांचेंहि अध्ययन रसास्वादपूर्वक होऊं लागलें. कालिदासाच्या मेघ-दूतानें तर केरळीय कवींच्या हृदयाचा ठावच घेतला. मेघदूताचा प्रभाव केरळाइतका भारतांत अन्यत्र कुठेंहि पडलेला नाहीं. केरळी कवींनीं मेघ-दूताचें अनुकरण करणारीं संदेशकाव्यें विपुल संख्येनें निर्माण केलीं आहेत. या सर्वांत ‘ उण्णुनीलि संदेशम् ’ हें खंडकाव्य रसिकांना मान्य झालेलें आहे. मेघदूतांतल्या यक्षपत्नीचें स्थान अलका नगरी हें आहे, तर ‘ उण्णुनीलि-संदेशम् ’ मधल्या नायिकेचें स्थान ‘ वट्टंकुर ’ जवळचें उण्णुनीलि हें गांव आहे. कालिदासाच्या यक्षाला जसें नांव नाहीं, तसाच याहि काव्याचा नायक निनांवीच आहे. या काव्याची कथा घडते ती अशी—

“ नायक आपल्या रंगमहालांत प्रियपत्नीसह झोपलेला असतो. एवढ्यांत एक यक्षी आपल्या सिद्धिसामर्थ्यानें तिथें दाखल होते. तिला तो मानवी नायक आवडतो. चित्रलेखेनें उषेच्या प्रियकराला म्हणजेच अनिरुद्धाला जसें निद्रित अवस्थेंत मंचकासह पळवलें, त्याचप्रमाणें ही यक्षी नायकाला उचलून आकाश-मार्गानें जाऊं लागते. पुढें तिरुअनन्तपुरम्च्या डोक्यावरून जात असतां

नायक जागा होतो. आपलें अपहरण होत आहे, हें त्याला कळतें. तो नरसिंह मंत्राचा जप करतो. यक्षिणी त्या मंत्राला घाबरते. ती त्याला अधांतरींच सोडून अदृश्य होते. नायक वृक्षावरून फळ पडावें किंवा आकाशांतून गार पडावी, तसा खालीं न आदळतां आपल्या मंत्रशक्तीनें वायुलहरींवर तरंगत अलगद जमीनीला टेकतो. आपण कोणत्या नगरांत आलों हें त्याला कळत नाहीं. प्रियपत्नीच्या विरहानें अंतरीं जळत कढत तो त्या नगरांत भटकूं लागतो. त्याच स्थितींत एक दिवस तिथल्या राजाची भेट घेतो. राजाला आपली कर्मकथा सांगतो. राजा त्याला एक संदेशवाहक दूत मिळवून देतो. मग नायक त्या दूताला आपल्या गांवीं जाण्याचा मार्ग आणि गांवांत शिरल्यावर आपलें घर, यांचें विस्तारपूर्वक वर्णन करून सांगतो आणि तसें करतां करतांच ' उण्णुनीलिसंदेशम् ' हें खंडकाव्य बनून जातें.

## पूनम् नम्पूतिरि

त्याच काळांत दुसरा एक भाषाकवि आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानें पुढें आलेला दिसतो. त्याचें नांव आहे ' पूनम् नम्पूतिरि. ' मराठेशाहींत साडेतीन शहाणे होते तसे कालिकत येथें झामोरिनच्या दरबारांत साडेअठरा कवि होते. पूनम हा त्यांतला अर्धा कवि मानलेला आहे. बाकीचे कवि संस्कृत आणि देशी अशा दोन्ही भाषांत काव्यें रचित होते, म्हणून ते पूर्ण आणि पूनम् हा केवळ देशी भाषेचाच कवि असल्यामुळें तो अर्धा. पण आश्चर्याची गोष्ट ही, कीं बाकीच्या पूर्ण कवींचीं काव्यें आजमितीस विस्मृतीच्या गुहेंत धूळ खात पडलीं असून हा अर्धा कवि मात्र रसिकांच्या हृदयांत अमर होऊन राहिला आहे. कोणी एक कवि त्याच्याबद्दल म्हणतो—' बाकीचे कवि भाराभर काव्यें प्रसवोत; पण ज्याच्या वाग्वैजयंतीनें अंग पुलकित होईल, असा कवि म्हणजे पूनम् नम्पूतिरि हाच. '

हा पंधराव्या शतकांत कधींतरी जन्मला. त्याचे आईवडील कोण आणि कुठले, याचा पत्ता लागत नाहीं. त्याच्या आडनांवावरून एवढेंच कळतें, कीं तो ब्राह्मण होता. त्यानें बहुतेक सगळें चम्पूवाङ्मयच लिहिलें. चम्पू म्हणजे गद्यपद्यमिश्रित रचना. "गद्यपद्यात्मको ग्रन्थो चम्पूरित्यभिधीयते" ही त्याची व्याख्या. संस्कृतांतहि भारतचम्पू, रामायणचम्पू, विश्वगुणादर्शचम्पू, असे

अनेक चम्पू आहेतच. पण संस्कृत चम्पू आणि मलयाळम्‌मधले मणिप्रवाळ शैलींतले भाषाचम्पू यांत एक महत्त्वाचा भेद आहे. संस्कृत चम्पू हें श्रव्य काव्य आहे. केवळ वाचनानेंच त्यांतल्या रसाचा अनुभव घेऊं शकतो. पण मलयाळम् चम्पू हे दृश्य काव्याच्या सदरांत येतात. चाक्यारांच्या 'कूडियाट्टम्' या नृत्यनाट्यासाठीं उपयोगी पडावे म्हणून त्यांची रचना झालेली आहे. कुत्तु किंवा कूडियाट्टम् हें केरळांतल्या मंदिरांतून होणाऱ्या उत्सवाचें एक अनिवार्य अंग आहे. चाक्यार जातीचा पुरुष तें करून दाखवतो. चम्पू-काव्यांतले विविध प्रसंग तोच गातो आणि तोच त्यांचा अभिनयहि करतो. केरळी चम्पूंतलें गद्यसुद्धा कोणत्या तरी वृत्तांत असतें. रामायण चम्पूंतला हा पुढील नमुना पहा—

> “ हर हर शिव नाना नगरी
> तिलकमयोध्या नगरि विचारे
> बहुविधरत्नसमूहं कोण्डुम्
> जनपदमहिला चमयं कोण्डुम् ”

असें सांगतात, कीं मलयाळम्‌मध्यें चम्पूरचनेचा प्रारंभ पूनम् नम्पू-तिरीनेंच केला. सगळ्या चम्पूकारांचा तो कुलगुरु. त्याच्या ग्रंथाचे आठ अध्याय आहेत. त्याच्या जोडीचे आणखी दोघे चम्पूकार म्हणजे मडमंगलम् आणि नारायण भट्टतिरि. या दुसऱ्यानें सुमारें तीस चम्पू लिहिले आहेत.

केरळाला फार मोठी वीरपरंपरा लाभलेली आहे. तिथला नायर वर्ग जुनाट भूतकालापासून वीरवृत्तीसाठींच प्रसिद्ध आहे. त्यांच्या सणा-उत्सवां-तूनसुद्धा बल-शौर्याचींच प्रदर्शनें होत आलीं आहेत. अशा वीराग्रणींची प्रशंसा करणाऱ्या कितीतरी वीरगाथा केरळाच्या वातावरणांत घुमत आहेत. 'पटप्पाट्टु' या नांवानें तीं समरगीतें प्रसिद्ध आहेत. आज मितीस त्यांतलीं बरींचशीं गीतें लुप्त झालीं असलीं, तरी जीं अजून शाहिरांच्या जिव्हाग्रीं नाचण्याइतकीं हयात आहेत, तीं केरळी वीरांचें बाहु प्रस्फुरित करायला समर्थ आहेत. वीरमर्दांचे पोवाडे ऐकून एका काळीं मावळे वीरांच्या छातीचे बंद तटातट तुटत, त्याप्रमाणे इतिहासकाळीं केरळांत हीच कामगिरी या 'पट-प्पाट्टु'नीं बजावली आहे.

मलयाळम्‌चा दुसरा एक साहित्यनिधि नुकताच उपलब्ध झाला आहे. त्याचें नांव ‘ कीर्तन. ’ या कीर्तन गीतांत ‘ देवोदेवीं ’ ची स्तुति तर आहेच; शिवाय त्यांत भक्ति अन् वेदान्त यांचेंहि सुबोध शैलींत प्रतिपादन केलेलें आहे. पून्तानम् नम्पूतिरि हा अशा ‘ कीर्तन ’कारांतला मुकुटमणि होय. त्यानें प्रश्नोत्तररूपानें भक्ति-ज्ञानाचा जो प्रपंच केला आहे, तो म्हणजे एक प्रश्नोपनिषदच आहे—

“ मानवाला दुःख कां होतें ? ” प्रश्न
“ दुःख, जन्मा आलियानें होतें. ” उत्तर
“ जन्म कोणत्या कारणानें होतो ? ”
“ जन्म कर्मविपाकामुळें होतो ! ”
“ कर्माचें कारण कोणतें ? ”
“ अहंभाव ! ”
“ हा ‘ अहम् ’ कुठून उत्पन्न झाला ? ”
“ अज्ञानरूपी अविवेकांतून. ”

प्राचीन कालापासून आधुनिक कालापर्यंतच्या मलयाळम् साहित्यकृतींचें अध्ययन करणाऱ्या रसिकाच्या मनाला दोन कवि विशेष आकर्षित करतात. पहिल्याचें नांव कण्णशन पणिक्कर आणि दुसऱ्याचें चेरुश्शेरी. पणिक्करनें वाल्मीकि रामायणाच्या आधारावर मलयाळम् रामायण रचलें. हें रामायण मुळाबरहुकूम उतरलें आहे. पणिक्कर हा रामकवि तर चेरुश्शेरी हा कृष्ण-कवि. या दोघांनीं सर्वप्रथम केरळीय मानसांत राम–कृष्ण आणून उभे केले. रामाचे पराक्रम अन् कृष्णाच्या ‘ माखनलीला ’ केरळीय जनतेच्या हृदय-संपुटांत याच दोघांनीं आणून घातल्या. पण केरळीय संस्कृतीचा अंगप्रत्यंगांनीं विकास होण्यासाठीं आणि तिच्या जीवनांत अध्यात्ममूलक मानवतेचे प्रकाशकिरण प्रविष्ट होण्यासाठीं तिला अजूनहि कांहीं काळ मार्गप्रतीक्षा करणें आवश्यक होतें.

केरळीय साहित्याच्या इतिहासाचीं पानें उलटीत, थांबत, थबकत, आपण पंधराव्या शतकापर्यंत येऊन थडकलों आहों. काय होती तत्कालीन केरळाची दशा ? समग्र केरळाचें वातावरण त्या काळीं रणावेशानें तप्त झालें होतें.

जीवनांत तशीच साहित्यांतहि युद्धाची खुमखुमी स्पष्ट दिसत होती. बालकांच्या क्रीडेंतहि रणमर्दपणालाच प्राधान्य आलें होतें. 'तूं मोठा कीं मी मोठा' अशी सामंतांची एकमेकांत स्पर्धा चालली होती. ते या स्पर्धेपायीं प्रजेच्या प्राणांवर उदार झाले होते. जमीनदार कुळांवर अत्याचार करीत होते. श्रीमंतांच्या हवेल्या नवलाख दिव्यांनीं झळाळत होत्या, तर गरिबांच्या झोपड्या अंधारानें काळवंडल्या होत्या. नम्पूतिरि समाजानें चाणक्यनीतीचा अवलंब केला होता. एका बाजूनें सामंतांशीं अन् दुसऱ्या बाजूनें जमिनदारांशीं 'सोयरीक' जमवून ते प्रजेच्या टाळूवरचें लोणी खाऊं लागले होते. राज्याराज्यांत दुहीनें घर केलें होतें. तशांतच परकी अन् धर्मवेडे पोर्तुगीज त्या भूमींत आपलीं मुळें रुजवून बसले होते. केरळाच्या अंतर्गत यादवीचा फायदा घेऊन ते आपली तुंबडी भरूं लागले होते. जो दुसऱ्याला नाडील तो हुषार अन् जो दुसऱ्याचा केसानें गळा कापील, तो धोरणी ठरत होता. नीति जणूं विधवा बनून अंधाऱ्या कोपऱ्यांत तोंड लपवून बसलीं होती. माणुसकी खंगून मृत्युपंथाला लागली होती. केरळाला असा सर्व बाजूंनीं विषम काळ आला होता. केरळ मानसिक गुलामगिरींत सांपडला होता. संस्कृतीला पारखा झाला होता. जीवनांतलीं शाश्वत मूल्यें हरवून बसला होता. त्याला या अवनतींतून वर काढून सन्मार्गावर आरूढ करणारा कोणीतरी महाभाग त्या भूमींत अवतरायला हवा होता.

### महाकवि एडुताच्छन्

आणि सौभाग्य केरळी जनतेचें, कीं इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत तसा एक महापुरुष अवतरला. त्याचें संपूर्ण नांव आहे तुंचत्तु रामानुजन् एडुताच्छन्! सोळावें शतक हें अखिल जगांत तसेंच भारतांतसुद्धा नवजागरणाचें, सांस्कृतिक पुनरुत्थानाचें शतक मानलें गेलें आहे. भारतांत त्या सुमारास बंगालमध्यें चैतन्यदेवांनीं वैष्णव धर्माची ध्वजा फडकावली. राजस्थानांत मीराबाईनें 'भक्तिपंथ बहु सोपा' केला. महाराष्ट्रांत एकनाथ-तुकारामांनीं भागवत धर्माची इमारत उभी केली. उत्तर प्रदेशांतल्या अवध प्रांतांत तुलसीदासांचा रामाश्रित वैष्णव धर्म गाजला. तमिळनाडमध्यें कंबननें तेंच केलें. भारतांत सर्वत्र नैतिक मूल्यांवर आधारलेला, स्वार्थ, द्वेष, कलहादि

विकारांच्या माथां पाय देऊन उभा राहिलेला आणि मानवता हें महामूल्य प्रकाशित करणारा ‘ वैष्णव धर्म ’ टाळ-मृदंगांच्या गजरांत आणि पुराण-कीर्तनांच्या घोषांत दुमदुमूं लागला.

केरळभूमींत ही गुढी उभवली, ती एडुताच्छन् या महाकवीनें !

आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं हा महाकवि ब्राह्मण जातींतून आला नाहीं; तर नायर जातींतून आला आहे. याचा जन्म तृकण्डियूर या गांवीं झाला. त्याचें खरें चरित्र उपलब्ध नाहीं. आख्यायिका मात्र पुष्कळच आहेत. संत आणि कवि यांच्याविषयीं आख्यायिकांचें पीक कसें फोफावतें, तें आपण एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्या बाबतींत पाहिलें आहे. तीच गोष्ट एडुताच्छन्च्या बाबतींत केरळांत घडली आहे.

लहानपणीं त्यानें सांगोपांग शास्त्राध्ययन केल्याचें कळतें. दक्षिण भारतांतल्या सर्व तीर्थयात्राहि त्यानें केल्या होत्या. या प्रवासांत त्याला केरळचीच नव्हे, तर साऱ्या दक्षिण भारताची परिस्थिति ‘ प्रत्यक्ष ’ आकलन झाली. उभ्या भारताची यात्रा करून आणि देशांतली सामाजिक आणि राजकीय परिस्थिति उघड्या डोळ्यांनीं पाहून ज्या मनःस्थितींत समर्थ रामदास हे कृष्णातटाकीं परत आले, तीच मनोवस्था अनुभवीत एडुताच्छन् परत आपल्या गांवीं आला. त्यानें आपल्या गांवीं अध्यापनाचें कार्य सुरू केलें; पण त्याचें त्याहि गोष्टींत मन रमेना. आजूबाजूच्या परिस्थितीनें त्याच्या मनांत कालवाकालव सुरू केली. अधःपाताकडे दुगुण्या चालीनें धावणाऱ्या केरळी जनतेला स्वार्थ आणि विषयलंपटता यांच्या तावडींतून कोणत्या उपायानें सोडवावें, तिच्या अंतरांत उदात्त भावनांचा नंदादीप कशाप्रकारें उजळावा, समाजांतली दुही नष्ट करून तिला भक्तिप्रेमाच्या सूत्रांत कशाप्रकारें बांधावें, कोणता आदर्श या जनतेच्यापुढें उभा करावा, हीच विवंचना एडुताच्छन्च्या अंतरांत सुरू झाली.

आणि त्याला मर्यादापुरुषोत्तम श्री रामचंद्राचें स्मरण झालें. सगळें रामायणच त्याच्या कल्पनाचक्षूंपुढें उभें राहिलें. रामाचा पराक्रम, त्याचा सत्यवचनी बाणा, सीतेचें निर्धारी पातिव्रत्य, भरत-लक्ष्मणाचें बंधुप्रेम, सुग्रीवाचें

सौहार्द, हनुमंताची दास्यभक्ति, हे सारे गुणविशेष त्याच्या दृष्टीपुढें झळकूं लागले. मानवी जीवनाच्या ऐहिक आणि पारलौकिक उत्कर्षाला आवश्यक असे हे गुणविशेष होते. सुसंस्कृत जीवनाचीं तींच खरोखर मूल्यें होतीं.

हीं मूल्यें समाजांत निर्माण व्हावीं, त्यांना प्रतिष्ठा लाभावी आणि त्यांच्या आधारें मानवाची जीवननौका योग्य दिशेनें हांकारली जावी, यासाठीं एडुताच्छन्‌नें मलयाळम् भाषेंत रामायणाची रचना करायचें ठरवलें. त्यासाठी त्यानें अध्यात्म रामायणाला वाट पुशिली. अंतरांत भावभक्तीचा मंगल कलश भरून घेऊन आणि श्रद्धेची दीपज्योत पाजळून, त्यानें एका सुमुहूर्तावर रामायणाचा श्रीगणेशा केला. हें रामायण त्यानें पाट्टुशैलींत लिहिलें आहे. त्याच्या या विशिष्ट शैलीला 'किळिपाट्टु' असें नांव आहे. किळि म्हणजे पोपट आणि पाट्टु म्हणजे गीत कथा. पोपटाच्या मुखांतून कथा वदविण्याची ही शैली केरळांत एडुताच्छन्‌च्या आधींच लोकप्रिय होती. एडुताच्छन्‌नें तिचाच अंगीकार केला. तो पोपटाला आवाहन करून म्हणतो—

" प्रिय पांखरा ! ये ! माझ्याजवळ बैस. हें दूध अन् हा मध प्राशन कर. मी तुझ्यासाठीं मधुर अन् पक्व फळें आणलीं आहेत, तीं साखरेंत घोळून खा आणि मग संतुष्ट मनानें मला श्रीरामाची कथा सांग. "

एडुताच्छन्‌ची अनुवादपद्धति स्वतंत्र आहे. जिथें जिथें नीतिबोधाला अवसर मिळेल, त्या त्या प्रसंगांत तो आपल्या प्रतिभेसह रमला आहे. एडुताच्छन्‌ला लाभलेली काव्यसिद्धि खरोखर अद्‌भुत आहे. केरळी साहित्याला गति आणि श्रेष्ठता त्यानेंच मिळवून दिली. केरळी जीवनांत अध्यात्माचें पावित्र्य आणि प्राणिमात्राविषयींचें सौहार्द त्यानेंच आणलें. ऐहिक जीवनांतल्या अतिरिक्त भोगांचा तिरस्कार करून आत्मशुद्धीचा पंचम स्वर आळवीत त्याच्या हृदयसंपुटांतून उठलेली गानधारा केरळच्या नभोवितानांत तरंगूं लागली, तेव्हां लोक जणूं मंत्रमुग्ध झाले. इतका शांत, इतका गंभीर पण इतका प्रभावी शब्द केरळानें आजवर ऐकला नव्हता. त्याच्या श्रवणानें सारी जनता डोलून उठली. लोकांना वाटलें, कीं ही वाणी दिव्य आहे; हिला पकडून हृदयांत सांठवावें. त्यांना असेंहि वाटलें कीं, ही भावधारा पवित्र आणि तीर्थरूप आहे; हिच्याखालीं आत्मराजाला न्हाणून काढावें.

एङ्घुताच्छन्‌चा रामचंद्र एका विशिष्ट सीमेपर्यंतच मानव आहे. त्या सीमारेषेवर पाय ठेवतांक्षणींच तो दिव्य, भव्य होतो आणि देवांना तसाच दानवांनाहि आदर्शरूप बनतो. अयोध्येचें युवराजपद अचानक प्राप्त होण्याच्या ऐन प्रसंगीं चौदा वर्षांचा वनवास अचानक पुढें उभा ठाकला असतां हा आदर्शभूत राम कैकेयीकडे जाऊन तिला म्हणतो—

" आई ! तूं किती मायाळू आहेस ! भरत तुझा औरसपुत्र; पण त्याच्यापेक्षांहि तूं माझ्यावरच अधिक प्रेम दाखवलंस. तरुण वयांत राज्यकारभाराची केवढी जबाबदारी तूं भरताच्या शिरावर टाकलीस ! त्या मानानं तूं मला दिलेली कामगिरी अगदींच साधी, सोपी अन् सरळ आहे. मीं फक्त वनांत राहायचं एवढंच ! अन्य कशाचीहि चिंता करायची नाहीं. आई ! तुझे माझ्यावर कधींहि फिटणार नाहींत असे हे उपकार आहेत. तूं मुळींच चिंता करूं नको. राज्यरक्षणाचें सामर्थ्य भरताच्या मनगटांत आहे आणि राज्यत्याग करण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे. "

पण लक्ष्मणाला मात्र तो प्रकार सहन होत नाहीं. तो दशरथाला हवें तसें टाकून बोलतो. त्याला धमकी द्यायलाहि कमी करीत नाहीं—

" भ्रान्तचित्तं जडं वृद्धं वधूजितं
शान्तेतरं त्रपाहीनं शठप्रियं
बन्धिच्चुताततेयुं पित्रे स्तान्
परिपन्थिकळायुळ्ळवे ने युमोक्कवे
अन्तकन् वीटिटन्नयच्चभिषेक-
मोरत्तर मेन्नियें साधिच्चु कोळ्ळुवन् "

' भ्रांत, जड-मूढ, बाइलबुद्धीच्या, वृद्ध, निर्लज्ज, पित्याला आणि त्याच्या साथीदारांना मी पकडून कैदेंत टाकीन किंवा प्रसंगीं त्यांचा वधहि करीन. जें प्रसंगोचित तें तें करून मी ज्येष्ठ बंधूचा राज्याभिषेक घडवून आणीन. तेवढें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे. '

त्यावर सागराप्रमाणें गंभीर असलेला प्रभु रामचंद्र, खवळलेल्या लक्ष्मणाला शांत करतो—

" क्रोधमूलं मनस्तापमुण्टाइवरुं
क्रोधमूलं नृणां संसारबन्धनं
क्रोधमल्लो निजकर्मक्षयकरं
क्रोधं परित्यजिवक्वेणं वुधजनम् "

' क्रोधानें मनस्ताप होतो. क्रोध संसारबंधनांत घालतो. क्रोध हा कर्मांचा क्षय करणारा आहे. म्हणून बुद्धिमान् लोक क्रोधाचा त्याग करतात. '

एड्डुताच्छन्च्या या रामायणाला ' भाषा अध्यात्म रामायणम् ' असें नांव आहे. रामाणनानंतर त्यानें महाभारताचाहि अनुवाद केला. त्याच्या प्रतिभेचा उन्मेष आणि कथाकथनाची निपुणता हे दोन्ही गुण महाभारतांतहि सर्वत्र चमकले आहेत. या दोन्ही ग्रंथांना अपरिचित असलेला केरळी माणूस हुडकूनहि सांपडायचा नाहीं. उत्तरेंत जी प्रतिष्ठा तुलसीरामायणाची, तीच प्रतिष्ठा केरळांत एड्डुताच्छन्च्या रामायणाला लाभली आहे. घरोघरीं केरळांत त्याची पारायणें चालतात. एड्डुताच्छन्च्या पूर्वीं ' कण्णशन ' कवीचें रामायण केरळांत खूप लोकप्रिय होतें. पण एड्डुताच्छनचा सूर्य उगवला आणि कण्णशनचा चंद्र फिका पडला. जोंवर मलयालम् भाषा जिवंत राहील, तोंवर एड्डुताच्छन्हि अजरामर राहणार आहे !

तो जिथें जन्मला तें गांव अन् तें घर केरळी जनतेला तीर्थरूप ठरलें आहे. जुन्या काळीं सगळीकडे मुलाचा विद्यारंभ संस्कार धूळपाटीवर होत असे. त्या संस्कारासाठीं केरळांतले लोक एड्डुताच्छन्च्या आवारांतली माती आणीत. हेतु हा, कीं त्याच्या पदरजानें पुनीत झालेल्या त्या धूलिकणांच्या स्पर्शानें संस्कार्य मुलाच्या अंतरांत सद्विद्या आणि सद्बुद्धि यांचा उगम व्हावा. मोजक्या शब्दांत सांगायचें, तर एड्डुताच्छन् हें भक्तीचें परिपक्व फळ होतें. तें धर्मग्लानीचें मोचन होतें. तें धर्माधिष्ठित पौरुषाचें पुनरुज्जीवन होतें. आणि तें केरळाचें साक्षात् पुण्य होतें !

एड्डुताच्छन्चा सूर्य मावळल्यानंतर केरळीय साहित्याच्या अंतरिक्षांत जवळ जवळ अंधाराचेंच राज्य पसरलें. या काळांत कांहीं पुराणांचे अनुवाद निर्माण झाले. कांहीं वेदान्तविषयक ग्रंथहि रचले गेले. पण हें सर्व साहित्य रसिकांच्या निकषावर बावन्नकशी उतरलें नाहीं.

मलयालम् साहित्यांत आणखी एक काव्यप्रकार उल्लेखनीय ठरला आहे. त्याला ‘ आट्टकथा ’ असें म्हणतात. या सर्व छंदोबद्ध आणि गेय अशा पौराणिक कथा असून कथकाळि या नृत्याच्या अंगानें त्यांचा विकास झाला आहे. किंबहुना आट्टकथा हे कथकळीचेंच साहित्य आहे. बहुतेक आट्टकथा श्लोक आणि पदें अशा दोन प्रकारांत रचल्या गेल्या आहेत. जुन्यांत जुन्या आट्टकथा मणिप्रवाळ शैलींत आहेत. त्यांतल्या बहुतेक श्लोकांचें दंडक वृत्त असतें. हीं दण्डकें कथकाळि नृत्यांत विष्कंभकाचें काम करतात. कथकाळि नटांचें संभाषण पदांच्या द्वारें होत असतें. ‘ कृष्णनाट्टम् ’ हें या कथकाळि साहित्याचें प्रारंभिक रूप आहे. कृष्णकथेच्या काव्यावर सतत आठ रात्रीं कथकळीचे प्रयोग होत. कथकळीचें दुसरें रूप ‘ रामनाट्टम् ’ हें आहे. याची रचनाहि कथकळीच्या दृष्टीनेंच केली आहे. अशा अनेक आट्टकथा केरळांत प्रचलित आहेत. या आट्टकथांना मलयाळम् साहित्यांत महत्त्वपूर्ण करण्याचें मुख्य श्रेय ‘ कोट्टयम् तम्पुरान् ’ या कवीला आहे. यानें बऱ्याच आट्टकथा लिहिल्या आहेत.

आट्टकथांचा दुसरा एक निर्माता म्हणजे श्रीरामवर्मा हा होय. हा तिरुवितांकुर राज्याचा राजा होता. सन १७५८ मध्यें तो सिंहासनावर बसला. स्वतः कवि असल्यामुळें त्याच्याभोंवतीं गायक, वादक आणि नर्तक यांचें एक मंडळच बनलें होतें. त्याची कारकीर्द जाणकार कलावंतांना अक्षरशः सोन्याची ठरली. त्यानें अनेक कवींना तर प्रोत्साहन दिलेंच; शिवाय स्वतःहि अनेक आट्टकथांची रचना केली.

### कुंचन नम्पियार

याच कथकाळि आणि आट्टकथा यांच्या संबंधांत आणखी एक विक्रमपुरुष केरळाच्या रंगभूमीवर अवतरला. त्याचें नांव आहे कुंचन नम्पियार. हा एडुताच्छन्च्या नंतर केरळी साहित्याच्या नभांगणांत उगवलेला दुसरा तेजस्वी तारा. तुळ्ळल नांवाचा आट्टकथांच्या तोडीचा एक नवा काव्यप्रकार त्यानें जन्माला घातला आणि तो लोकप्रियहि केला. त्याच्यापूर्वींचें आट्टकथा साहित्य संस्कृतांत आणि मणिप्रवाळ शैलींत असल्यामुळें त्याचा रसास्वाद शिक्षित, अशिक्षित अशा अबालवृद्धांना घेतां येत नव्हता. शिवाय आट्ट-

कथांच्या आधारें चालणारीं कथकळि नृत्यनाट्यें हीं राजमहालांत, श्रीमंताच्या हवेल्यांत किंवा ‘ नम्पूतिरि ’ ब्राम्हणांच्या धर्ममठांतच होत असत. त्यामुळें बहुजन समाज या कलेच्या आनंदाला वंचितच राहिला होता. पण कुंचन नम्पियार अवतरला आणि हा सगळाच देखावा पालटला. त्यानें मुळीं आपली नवी कथकळि खुल्या मैदानांतच उभी केली.

त्रिल्वाद्रीच्या परिसरांत शुकपुर या गांवीं कुंचनचा जन्म झाला. हा नम्पूतिरी ब्राह्मणाचा पुत्र खरा; पण तो सवर्णीय स्त्रीपासून झालेला नव्हे, तर नङ्गियार जातीच्या पत्नीपासून झालेला. बाल्यकाळांत आणि तारुण्यांतहि त्यानें अनेक गुरूंकडून शास्त्रविद्या मिळवली. कवितेचा छंद त्याला लहानपणापासूनच होता. शास्त्राध्ययनानें आणि पूर्वसूरींच्या कलाकृतींच्या अभ्यासानें त्याच्या कवितेला खोली आणि रुंदी प्राप्त झाली. त्याच्याच देशाचा राजा देवनारायण याच्या दरबारांत तो बसूं लागला आणि थोड्याच काळांत राजकवि म्हणून मान्यताहि पावला. आयुष्याच्या मध्यकालांत तो तिरुविताङ्कुरला आला आणि तिथल्या चेम्पकशेरी राजाचा दरबारी कवि झाला. कुंचनविषयीं अनेक आख्यायिका केरळांत प्रचलित आहेत. त्यांतल्या कांहीं मनोरंजकहि आहेत—

एकदा चेम्पकशेरीच्या राज्यांत एक परस्थ पंडित प्राप्त झाला. तो देशोदेशींच्या पंडितांना वादांत जिंकून जयपत्रांचे भारे मिरवीत तिथवर पोंचला होता. त्यानें केरळीय पंडितांना वादाचें आव्हान दिलें. चेम्पकशेरीच्या विद्वत्सभेचा अध्यक्ष भट्टतिरि नांवाचा पंडित होता. अन् तोच कुंचनचा गुरुहि होता. भट्टतिरीला पाहुण्या पंडिताचें आव्हान स्वीकारणें भाग पडलें. दोघेहि समोरासमोर वादाला बसले. त्यांचे तर्कवितर्क सुरू झाले. खंडन-मंडनें लखलखूं लागलीं. कितीतरी दिवस तो वाद चालला; पण कोणीच जिंकीना आणि कोणीच हरेना. सरते शेवटीं राजा कंटाळला. त्यानें मग वादाच्या निर्णयाची एक निराळीच शक्कल काढली. तो त्या दिग्गज पंडितांना म्हणाला—

“ दोघानींहि उद्या सकाळीं मणिप्रवाळ शैलींत रचलेलें बारा सर्गांचें एक नवें महाकाव्य दरबारांत उपस्थित करावें. जो या कामीं यशस्वी ठरेल त्याचा विजय झाला, असं मी समजेन. ”

पाहुण्या पंडिताला कवित्वाचा गंधहि नव्हता. तो निव्वळ तर्ककर्कश होता. त्यामुळें आपला पराजय झाला हें गृहीत धरूनच तो आपल्या मुक्कामीं आला आणि स्वस्थ झोपला. पण भट्टतिरीला झोप लागेना. उद्या भरसभेंत आपला अपमान होणार आणि विजयाचा टिळा प्रतिस्पर्धी पंडिताच्या कपाळीं लागणार, या चिंतेनें त्याला ग्रासलें. एवढ्यांत कुंचनची स्वारी तिथें उगवली. त्यानें गुरूला विचारलें, कीं ' आज मुखावरची ज्ञानकळा मलूल कां ? ' भट्टतिरीनें कुंचनला आपल्यावरचें संकट निवेदिलें. त्यावर कुंचन नुसता हंसला. तो गुरूला एवढेंच म्हणाला,

" गुरुजी, बारा सर्गांचें काव्य मी एकटा स्वहस्तें लिहूं शकणार नाहीं. तेव्हां तुम्ही तुमचे अकरा विद्यार्थी आजची रात्र माझ्या ताब्यांत द्या आणि निश्चिंत झोपा. सकाळीं काय घडतें तें कळेल. "

कुंचन्नें त्या रात्रीं भट्टतिरीचे अकरा विद्यार्थी आपल्यासमोर हारीनें बसवले. प्रत्येकाला एकेका सर्गातील एकेक श्लोक रचून तो सांगूं लागला. बाराव्या सर्गाचें लेखन त्यानें स्वतःकडे घेतलें. त्यानें जणूं त्या रात्रीं काव्याचा कारखानाच उघडला. आपलें अष्टावधानीपण आणि शीघ्रकवित्व या दोन गुणांच्या जोरावर त्यानें एका रात्रींत तें बारा सर्गांचें महाकाव्य पुरें केलें आणि सूर्योदयाच्या वेळीं तें बाड गुरूच्या पुढें आणून ठेवलें. अर्थात् दुसऱ्या दिवशीं त्या स्पर्धेत भट्टतिरीचा जय झाला, हें सांगणें नकोच !

त्या काव्याचें नांव आहे, ' श्रीकृष्णचरित काव्यम्. ' मलयाळम् साहित्याची ही एक डौलदार अशी काव्यशाखा आहे. शीघ्र कवित्वामुळें त्यांत कांहीं दोष राहिले असले, तरी अद्यापि त्याच्या लोकप्रियतेंत उणेपणा आलेला नाहीं. कुंचन् नम्पियार जसा हजरजबाबी होता, तसाच स्पष्टवक्ताहि होता. भल्या-भल्यांची रळी उडवायलाहि तो कमी करीत नसे. त्याची जीभ म्हणजे जणूं उपहासाची सदा परजलेली तलवारच !

एकदा काय झालें; मार्तंडवर्मा या राजानें पद्मनाभस्वामीच्या मंदिरापुढें एक मोठा दीपस्तंभ बनवला. ज्या दिवशीं दीपज्योति प्रज्वालित करून त्याचें उद्घाटन झालें, त्या दिवशीं राजा आपल्या विद्वज्जनांसह देवदर्शनाला गेला. तो नखशिखान्त पाजळलेला दीपस्तंभ पाहून राजाला कृतार्थता वाटली.

त्यानें आपल्या परिवारांतल्या पंडित जनांना सांगितलें, कीं 'या दीपस्तंभावर प्रत्येकानें एकेक श्लोक रचावा.' त्यावर सगळे पंडित सरसावले. प्रत्येकानें एकेका श्लोकाची बहारदार रचना केली. त्यांत दीपस्तंभाइतकीच राजाचीहि प्रशंसा होती. स्तब्ध होता, मजा पहात होता, तो एकटा कुंचन्. राजानें त्याला विचारलें, 'काय कुंचन महाराज ! तुम्ही गप्पसे ?' कुंचन्नें राजाला एका श्लोकांतच उत्तर दिलें—

"दीपस्तम्भं महाश्चर्यं, नमुक्कुं किट्टणं पणम्
इत्यर्थ एषां श्लोकानाम् अल्लतोनु न विद्यते"

महाराज ! हा दीपस्तंभ महान् आश्चर्यकारक आहे, हें उपमा उत्प्रेक्षांनीं सांगणाऱ्या या सगळ्या पंडितांच्या श्लोकांचा तात्पर्यभूत अर्थ इतकाच, कीं 'आम्हाला कांहीं दक्षिणा मिळावी.' राजाला त्या छंदोबद्ध उत्तराचें कौतुक वाटलें. तो अगदीं मनापासून हसला. अर्थात् त्यानें कुंचनची विशेष रूपानें संभावना केली, हें सांगणें नकोच !

कुंचन नम्पियारच्या पराक्रमाची आणखी एक कथा अवश्य सांगायला हवी. मात्र तिचें हें स्थळ नव्हे. कथकळि नृत्याच्या वर्णनप्रसंगांत ती सांगू.

सतराव्या शतकाचा प्रारंभ हा मलयाळम् साहित्याच्या आधुनिक युगाचा उषःकाल आहे. या नव्या युगावर प्रभाव गाजवणारे महानुभाव कवि तीनः चेरुश्शेरी, एडुताच्छन आणि कुंचन नम्पियार. या तिघांचेंहि व्यक्तिमत्त्व वेगवेगळ्या मार्गांनीं प्रकट झाले असलें, तरी या तिघांतहि एका बाबतींत समानधर्मित्व होतें. भक्तीचा प्रचार, नीतीचा आणि पुण्यमार्गाचा उपदेश, पराक्रमाची प्रशंसा आणि संस्कृतीचें पुनरुज्जीवन याच गोष्टी या तिन्ही साहित्यसम्राटांना साधायच्या होत्या. याशिवाय मलयाळम् भाषेला संस्कृत भाषेच्या दास्यांतून मुक्त करणें, तिला स्वतःच्या शब्दांत बोलायला लावणें अन् तिचें सामर्थ्य वाढविणें, हें या तिन्ही कवींचें लक्ष्य होतें. या तिघांनीं मिळून मलयाळम् भाषेच्या प्रगतीचा राजमार्ग प्रशस्त करून दिला.

### रामपुरत्तु वारियर

आधुनिक युगाच्या साहित्यसंसारांत पुढें आपल्याला एक ठळक व्यक्ति आदळते ती म्हणजे 'रामपुरत्तु वारियर.' हा कवि अभिजात दरिद्री होता.

शिवाय त्याला एका रोगानेंहि पछाडलें होतें. आपला रोग बरा व्हावा अन् दुर्दशाहि संपावी म्हणून तो एका शिवक्षेत्रांत शिवाची आराधना करीत राहिला होता. पुढें एकदा तिरुविताङ्कुरचा राजा 'मार्तण्डवर्मा' त्या क्षेत्रांत शिवदर्शनाला आला. परत जाण्यासाठीं जेव्हां तो आपल्या नौकेंत चढला, तेव्हां वारियरनें किनाऱ्यावर उभें राहून त्याच्या प्रशंसेचे कांहीं श्लोक म्हटले. राजाला ते आवडले. तो वारियरला म्हणाला, 'नौकेंत चढा.' वारियरनें ती आज्ञा मानली. राजनौका तिरुअनंतपुरमूच्या मार्गाला लागली. राजाला सवड होती आणि एक कवि समोर बसला होता. अर्थात्, त्यानें वारियरला आज्ञा केली, कीं 'एखादी कथा सांगा.' वारियरनें 'आज्ञा महाराज' म्हटलें. कोणत्या दैवी प्रेरणेनें न कळे; पण त्याला सुदामदेवाची आठवण झाली. तो सुदाम्याचीच कथा शीघ्र कवित्वानें गाऊं लागला. राजनौका तिरुअनंतपुरमूच्या बंदराला लागली अन् त्याचवेळीं कवीची कथाहि संपली. राजानें कवीला आपल्या राज्यांत एक सामान्यशी जागा राहायला दिली आणि त्याच्याकडून जयदेवाच्या अष्टपद्यांचा मलयाळमूमध्यें अनुवाद करून घेतला. कांहीं काळ राजाच्या पदरीं राहिल्यावर वारियरनें स्वस्थानीं जाण्यासाठीं राजाचा निरोप मागितला. राजा म्हणाला, 'ठीक आहे. तुम्ही जायला हरकत नाहीं.' वारियरला वाटलें होतें, कीं निरोपाच्या वेळीं राजाचा हात सढळ होईल. आपल्याला भरघोस बिदागी मिळेल. पण राजानें त्याविषयीं कांहींच हालचाल केली नाहीं. वारियरलाहि तोंड वेंगाडण्याचा लाचारपणा करवला नाहीं. खरें म्हणजे सुदाम्याची जशी श्रीकृष्णानें परीक्षा घेतली, तशीच या आधुनिक भुकेकंगाल सुदाम्याची राजानें परीक्षा घेतली होती. राजापुढें हात न पसरून तो त्याच्या परीक्षेला शंभर टक्के उतरला होता. त्यामुळें पुढील घटनाहि सुदाम्याच्या कथे-प्रमाणेंच घडल्या.

वारियर बंदरावर जातो, तर त्याच्या जलयात्रेसाठीं तिथें राजशाही नौका सुसज्ज होती. जिथें जिथें नौकेनें मुक्काम केले, तिथें तिथें दरबारच्या नोकरांकडून त्याच्या गळ्यांत पुष्पहार पडत होते. घरीं जाऊन पाहतो, तर त्याच्यासाठीं राजानें उंच महाल उभा केला होता आणि कवीच्या अविच्छिन्न योगक्षेमासाठीं एका मोठ्या जमिनीचें बक्षीसपत्रहि तयार

करून ठेवलें होतें. तात्पर्य, राजानें या आधुनिक सुदाम्याचें दैन्य देशांतराला घालवलें होतें.

वारियरनें निर्मिलेल्या या काव्याचें नांव 'कुचेलवृत्तम् वञ्चिपाट्टु' असें आहे. 'वञ्चिपाट्टु' याचा अर्थ नौकागीत असा होतो. मलयाळम् भाषेंत अशा वञ्चिपाट्टु गीतांचें भाण्डार भरलेलें आहे. केरळ हा आपोदेवींनीं समृद्ध असा देश आहे. जमिनीवरच्या रहदारीइतकीच तिथें पाण्यांतलीहि रहदारी चालते. अनेक रसिक आणि उत्साही लोक तिथें जलविहाराला जातात. मलयाळम्‌मधलीं सगळीं वञ्चिपाट्टु गीतें अशा या जलविहारप्रसंगीं निर्माण झालेलीं आहेत. आधुनिक युगाच्या या उषःकालांत याहून अन्यहि पाट्टुपद्धतीची रचना पुष्कळच झालेली आहे. या काळांत मलयाळम् भाषा आत्मसामर्थ्यानें अन् मुक्तपणें संसार करूं लागली. तिनें केरळीय जनतेचीं अंतःकरणें विविध प्रकारांनीं आकृष्ट करून घेतलीं.

याच काळांत 'कीर्तन' नांवाचा एक काव्यप्रकारहि उदयाला आला. कीर्तन म्हणजे भगवान् श्रीकृष्ण, शिव, गणपति इत्यादि देवतांचीं स्तुतिस्तोत्रें होत. या स्तोत्रांतून सहजमनोज्ञ भाषेंत तत्त्वज्ञानाचा उपदेश केलेला आढळतो.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभीं केरळांत नवयुग निर्माण झालें. त्याच काळांत भारतांत ब्रिटिशांचें राज्य स्थापन झालें. इंग्रजांच्या कर्तृत्वाकडे, ज्ञानाकडे आणि शिस्तबद्ध राजकारणाकडे लोक आश्चर्यानें पाहूं लागले. आश्चर्यांतून अनुकरणाची भावना निर्माण झाली. लोकांच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भावना विचलित झाल्या. इंग्रजी शिकावें, साहेबासारखें असावें, दिसावें, ही प्रवृत्ति बलवान् होऊं लागली. याच काळांत केरळाला पहिल्या प्रथम छापखाना दिसला. त्याच्या द्वारा, वृत्तपत्रें आणि पुस्तकें छापलीं जाऊं लागलीं. नवे लेखक निर्माण झाले. पद्य मागें पडून गद्य प्रभावी झालें. निबंध, प्रबंध, कादंबऱ्या, कथा, अशा विविध अंगांनीं मलयाळम् गद्याचा विकास होऊं लागला.

पण तरीहि पद्यशाखा मात्र वाळली नाहीं. खंडकाव्येंच नव्हेत; तर कांहीं महाकाव्येंहि या कालांत निर्माण झालीं आहेत. केरलवर्मा कोइत्तम्पुरान यानें

मलयाळी नाट्यशाखा पल्लवित केली. याच काळांत स्वाति तिरुनल नांवाचा एक राजा झाला. त्याला 'गर्भश्रीमान्' असें म्हणत. गर्भावस्थेंतच तो राज्याच्या सिंहासनावर आरूढ झाला होता. त्याला कारण घडलें तें असें. सन १८११ मध्यें तिरुवितांकुरच्या महाराजाचा मृत्यु झाला. राजाला मुलगा नव्हता, म्हणून त्याच्या बहिणीची मुलगी लक्ष्मी हिला प्रजेनें सिंहासनावर बसवलें. त्यावेळीं ती गर्भवती होती. योग्यकालीं तिनें ज्या पुत्ररत्नाला जन्म दिला, तोच हा स्वाति तिरुनल! तो दोन वर्षांचा होतो न होतो, तोंच त्याच्या मातेनेंहि स्वर्गाचा रस्ता सुधारला. मग त्याचें आणि राज्याचेंहि पालनपोषण त्याच्या मावशीला करावें लागलें.

पण हा पोरका मुलगा पुढें गुणी निपजला. यौवनाच्या उंबरठ्यांत पाय ठेवतेवेळींच त्यानें राजकारणाचें बरेंच ज्ञान मिळविलें. तो मोठा रसिक होता आणि अंतरींचा रसभाव शब्दार्थांनीं फुलवूं शकणारा कविहि होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो मराठीहि शिकला होता. त्यानें अत्यंत रसिकतेनें राज्य केलें. प्रजावत्सलता आणि न्यायनिष्ठुरता हे दोन्ही गुण त्यानें समानत्वानें दाखवले. त्याच्या कारकीर्दींत पंडितांना आणि कवींना खूप प्रोत्साहन मिळालें. त्याच्या राजसभेंत विद्वान्, कवि, गायक, वादक, असे सर्व प्रकारचे कलावंत मानानें बसत होते. त्याच्याच काळांत केरळीय संगीतालाहि जोरदार चालना मिळाली. संगीताला उपकारक ठरतील, अशीं अनेक पद्यें या राजानें रचलीं. 'कीर्तन' या नांवानें केरळांत आजहि तीं प्रचलित आहेत. 'कथाकालक्षेपम्' म्हणजे गाऊन कथा सांगणें. त्यासाठीं त्यानें दोन संस्कृत आख्यानें रचलीं. याचा अर्थ संस्कृत भाषेंतहि त्याची अनिर्बंध गति होती, असा होतो. या राजाची सुमारें सातशें कविता आजमितीस उपलब्ध आहे. त्याचे कित्येक काव्यप्रकार हे केरळांतल्या देवस्थानांतील उत्सवांशीं निगडित झालेले आहेत.

### उळ्ळूर परमेश्वर अय्यर

त्या पुढच्या काळांत केरळीय साहित्यांत तीन महाकवि आपल्या तेजानें तळपतांना दिसतात. पहिला उळ्ळूर परमेश्वर अय्यर, दुसरा कुमारन् आशान् आणि तिसरा वळ्ळत्तोळ नारायण मेनन्. मलयाळम् साहित्यांतले हे दिग्गज होत. हे तिघेहि 'कवित्रिमूर्ति' या नांवानें ओळखले जातात.

११४२८

उळ्ळूर कवीच्या महाकाव्याचें नांव आहे, ‘ उमाकेरलम् ’ या काव्याला इतिहासाची पृष्ठभूमि लाभलेली आहे. किंबहुना असेंहि म्हणतां येईल, कीं तिरुवितांकुर राज्यांतल्या एका ऐतिहासिक प्रसंगाचा शुष्क सांगडा घेऊन या महाकवीनें त्याच्यांत प्राण भरला आहे. त्याच्यावर जणूं नवरसांची वृष्टि केली आहे. या महाकाव्याची रूपरेषा थोडक्यांत सांगतों—

तिरुवितांकुरच्या दक्षिण भागाचें नांव वेणाट्टु. आदित्यवर्मा हा त्या प्रदेशाचा राजा. बिचारा सत्प्रवृत्त खरा; पण दुबळा ! त्यानें आठ ब्राह्मणांची एक समिति स्वतःला सल्लागार म्हणून नेमली. आठ ब्राह्मण हे पूर्ण आणि राजा हा अर्धा मिळून ही समिति बनली होती. म्हणूनच तिचें नांव ‘ एट्टरयोगम् ’ म्हणजे ‘ साडेआठांची समिति ’ असें पडलें. पण या आठांनीं या अर्ध्याचें रक्षण करण्याच्याऐवजीं भक्षण करण्याचाच संकल्प केला. रविवर्मा तम्पान हा या राजाचा मंत्री होता. नेकजात असल्यामुळें तो त्या आठांच्या डोळ्यांत खड्यासारखा खुपत होता. राजाला कल्याणी नांवाची एक मुलगी होती. प्रधानाचें आणि या राजकन्येचें सूत जमलें. त्यानीं परस्परांच्या भोंवतीं प्रेमपाश टाकले आणि आपल्या लग्नाला राजाची अनुमतिहि मिळवली.

एवढ्यांत त्या कटवाल्यांपैकीं कोणीतरी राजवाड्याला आग लावून दिली. दुसऱ्यांनीं तो आरोप तम्पानवर घातला. तम्पान हा खरोखर विश्वासू आणि कल्याणकर्ता असा प्रधान होता. पण त्याच्याविरुद्ध कान फुंकले गेल्यामुळें राजानें त्याला आपल्या राज्यांतून हद्दपार केलें. अशा रीतीनें समितींतल्या कटवाल्यांनीं आपल्या मार्गांतला कांटा काढून टाकला. पुढें थोड्याच दिवसांत त्यानीं राजाच्या अन्नांत विष कालवलें. राजा तडकाफडकीं मरण पावला.

त्या आठांच्या समितींत पिळ्ळा नांवाचा एक अत्यंत घातकी माणूस होता. त्यानें राजाच्या सहा मुलांना तलावांत बुडवलें. त्यांपैकीं पांचांचीं प्रेतेंच गवसलीं. सुदैवानें थोरला मुलगा तेवढा जगला. राज्यांतली ही अशी अंदाधुंदी पाहून नेमकें त्याचवेळीं एका मोगल सरदारनें राज्यावर आक्रमण केलें. त्यानें राजकन्या कल्याणी हिचाहि अपहार केला. ही भयानक परिस्थिति

पाहून राणी सैरभैर झाली. तिनें तम्पानचा शोध करून त्याला पुन्हा बोलावून घेतलें. मागचें सगळें विसरून तो राज्यरक्षणार्थ धावून आला. त्यानें कोट्टयम्‌च्या केरलवर्म्याचा मदतीसाठीं धावा केला. केरलवर्मा त्वरित आला. तम्पाननेंहि राज्यांतलें सैन्य संघटित केलें. दोघांनीं मिळून त्या मोगल सरदारावर हल्ला चढवला. त्याला पळतां भुई थोडी करून टाकली. मात्र मोगल सरदार पळाला तरी पण, पळतां पळतां त्यानें कल्याणीलाहि पळवलें. तिच्यावर बलात्काराचा प्रसंग आणायलाहि तो कचरला नाहीं. पण कल्याणीहि शेणामेणाची मुलगी नव्हती. ती सुंदर होती, तशीच प्रखर वीजहि होती. तिनें त्या बांक्या प्रसंगीं आपली अब्रू तर राखलीच; शिवाय त्या मोगल सरदारालाहि यमाच्या घरीं पाहुणा म्हणून धाडून दिलें. पुढें थोड्याच कालांत राज्यांत स्थिरस्थावर झाली. कल्याणी आपल्या अभंग कौमार्यानिशीं परत आली. नंतर एका शुभ मुहूर्तावर तम्पानशीं विवाहबद्ध होऊन तिनें आपले मनोरथ पूर्ण केले.

ही आहे 'उमाकेरलम्' महाकाव्याची संक्षिप्त कथा!

## कुमारन् आशान्

दुसरा महाकवि आहे, कुमारन् आशान्. वर्णबाह्य समजल्या जाणाऱ्या 'ईडव' जातींत त्याचा जन्म झाला. याला प्रतिभेचें देणें उपजतच होतें अन् त्याच्या जोडीला कुशाग्र बुद्धिहि लाभली होती. स्वतःची साधना आणि गुरूची कृपा या दोन मार्गांनी हा पुढें आला. याचीं 'वीणपूवु,' 'सिंहप्रसवम्,' 'नलिनी,' 'लीला,' 'चाण्डाल भिक्षुकी,' इत्यादि अनेक खंडकाव्यें आहेत. गीतिकाव्याला मलयाळम् भाषेंत सुप्रतिष्ठित करण्याचें श्रेय याच महाकवीला आहे. वीणपूवु ही त्याची पहिली काव्यकृति. एका फुलावर लिहिलेलें एकेचाळीस श्लोकांचें हें एक मनोज्ञ काव्य आहे.

सुकून खालीं पडलेलें एक सुंदर सुगंधी फूल कवि पाहातो. त्याची ही पायदळीं पडण्याची अवस्था पाहून कवीच्या मनांत विचारांचे कल्लोळ उठतात. तो म्हणतो—

'हे नाजुक सुंदर फुला! प्रफुल्ल अवस्थेंत एखाद्या सम्राज्ञीसारखें तुझें वैभव विलसत होतें. सारें विश्व त्यावेळीं तुझ्या सेवेला सादर होतें. पल्लव-

पुटांनीं तुला अवगुंठन केलें होतें. वायुलहरी तुला मंद मंद झोके देत होत्या. बालसूर्याचे किरण तुझ्या पाकळीपाकळीला तेजाची ओप देत होते. शुक-सारिका मस्तक डोलवून तुला गीत आणि नृत्य शिकवीत होत्या. कोणाचीहि नजर खिळून जावी असें, तुझें तें तारुण्य !

" वैराग्यमेरियोरु वैदिक नाट्टे एट्ट –
वैरिय्क मुन्पुरिडयोडिय भीरुवाट्टे
नेरे बिट्टन्नु मरुवीड्निन निन्ने नोक्कि
आराकिल्लेन्तु मिड्डियुल्लवर निन्निरिक्काम् "

विरक्त असो वा वेदान्ती असो; किंवा आक्रमक शत्रूपासून प्राण वांच-विण्यासाठीं पळणारा पळपुटा जीवहि असो. तुझ्या यौवन कालांत जवळून जात असतांना क्षणभर तरी तो तुला पाहून थबकलाच असेल.

पण आज ते दिवस गेले. ते रसिकहि गेले आणि तुझ्याभोंवतीं रुंजी घालणारे ते भ्रमरहि पसार झाले. फक्त कवि तेवढा तुझ्यासाठीं इथें उभा आहे. त्याच्या डोळ्यांतून आसवें गळत आहेत. तुझी ही दयनीय अवस्था त्याला सहन होत नाहीं. तो विचारतो, कीं विधात्यानें तुला इतके चांगले गुण कां दिले ? दिले, तर ते इतक्या तांतडीनें हरण कां केले ? सृष्टीचें हें रहस्य काय आहे ?....पण मला वाटतें जें झालें तेंच योग्य !

" साधिच्चु वेगमथवा निज जन्मकृत्यं
साधिष्ठर् पोट्टिह् सदा निशि पान्थपादं
बाधिच्चु रुक्षशिल वाड्वतिल निन्नु मेघ—
ज्योतिस्सुतन् क्षणिकजीवितमल्लि काम्यम् "

जन्मा आलियाचें फल पदरांत पडलें, उद्देश पूर्ण झाला, कीं त्या व्यक्तीनें अस्तमून जाणें, गळून पडणें हेंच उचित आहे. मार्गांत शिलाखंड काय कमी असतात ? पांथस्थांचे पाय ठेंचाळीत, रक्तबंबाळ करीत ते युगानुयुगें जगतात. पण काय उपयोग त्या जीवनाचा ! त्यांच्या दीर्घ जीवनापेक्षां कृष्णमेघांतून क्षणकाल उजळून जगाचे डोळे दिपवून अंतर्धान पावणाऱ्या विद्युल्लतेचें जीवनच अधिक अभिलषणीय नाहीं काय ?.......

याच कवीचें दुसरें खंडकाव्य ‘ नलिनी. ’ या काव्यानें मलयाळम् साहित्यांत एका नवीन क्षेत्राचें उद्‌घाटन झालें. तोंवर पुराणकथांच्या आधारें प्राचीन रीति आणि शैली यांना धरूनच काव्यरचना होत होती. पण आतां केरळांत वर्ड्‌स्वर्थ, शेली, बायरन् इत्यादि कवींचें अध्ययन सुरू झालें होतें. पाश्चात्य विचारसरणीनें भारलेले त्या वेळचे केरळी तरुण पाश्चात्य धर्तीवर एखादी नितांत रम्य प्रेमगाथा मलयाळम् भाषेंत निर्माण व्हावी, अशी अपेक्षा करीत होते. कुमार आशान्‌नें त्यांच्या त्या आशालतेला सुपुष्पित केलें. नलिनी केवळ शब्दांतच राहिली नाहीं, तर ती रंगभूमीवरहि अवतीर्ण झाली. केरळाच्या सुशिक्षित समाजानें तिचें मनःपूर्वक स्वागत केलें. या नलिनीची कथा घडली आहे ती अशी—

हिमाचलाच्या खालच्या टेकडीवर प्रभातकालीन सूर्याचे किरण पडले आहेत. त्या प्रकाशांत एक तरुण योगी पद्मासन घालून बसलेला दिसत आहे. सभोंवतीं फुललेल्या आणि खुललेल्या निसर्गाच्या सौंदर्यावर त्याचे डोळे खिळून गेले आहेत. त्याचें मन मुग्ध झालें आहे. एवढ्यांत थोड्या अंतरावर झाडाच्या आडून संगीताचे विलोल स्वर त्याच्या कानीं पडतात. त्या स्वरांचें कंपन त्याच्याहि हृदयांत उठतें. तो आसन सोडून उभा होतो. दोरी लावून ओढल्यागत त्या संगीताच्या दिशेनें चालूं लागतो. संगीत जवळ जवळ येतें. एक मानवी व्यक्ति त्याच्या डोळ्यांना दिसूं लागते. ती व्यक्ति स्त्री आहे, तरुण आहे, सुंदर आहे, कलावती आहे, नुकतीच न्हालेली आहे, वल्कलांनीं आपलें परिपुष्ट यौवन कसेंबसें झाकून बसली आहे आणि कोण्यातरी आराध्य देवतेच्या प्रसन्नतेसाठीं गात बसली आहे.

तरुण योगी तिच्यासमोर स्तंभित होऊन उभा राहतो. तिचें तें दिव्य गायन आकंठ पिऊन घेतो. एवढ्यांत तिचे मुकुलनयन उघडतात. ती पहिल्या क्षणाला चपापते, दुसऱ्या क्षणीं त्याला ओळखते आणि तिसऱ्या क्षणीं वाकून त्याला प्रणाम करते. तिचा आराध्य परमेश्वरच जणूं तिच्यापुढें उभा ठाकलेला असतो. ती मंदस्मित करून किंचित् लाजत, लवत त्याला विचारते.

“ मला ओळखलं नाहीं ? ”

“ तूं मला ओळखलंस ? ” योगी तिला विचारतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... वि: ...........५५

"होय ओळखलं. प्रियकरानं कितीहि वेष बदलले, भगवे बदलले, तरी नारीजातीच्या वेधक नेत्रांना त्याची ओळख पटल्यावांचून राहात नाहीं."

आणि मग दिवाकराला कळतें, कीं ही आपली बालपणची सखी नलिनी! आपल्यावर जिवाआगळें प्रेम करणारी प्रेयसी! केवळ आपल्यासाठीं, आपला मार्ग शोधीत, आपल्यालाच हुडकण्यासाठीं ती इथवर आली आहे. भेट घडावी, विरहज्वाला शमावी आणि आपलें दोघांचें मीलन व्हावें म्हणून ती योगिनी बनली आहे. तप करून आपली कोमल काया तिळातिळानें झिजवीत राहिली आहे.

दिवाकराला तिचें प्रेम कळतें. त्यागहि जाणवतो! पण तरीहि मीलनाची तिची आकांक्षा तो पूर्ण करूं शकत नाहीं. आपले दोघांचे मार्ग भिन्न आहेत, असें सांगून तो तिच्यापासून दूर होऊं पाहतो. ती लगबगीनें पुढें होऊन त्याला धरते. त्याच्या चरणांवर पडते. तो तिला हळूच उठवतो आणि म्हणतो.

"नलिनी! तुझं प्रेम परिशुद्ध आहे. तुझं अंतःकरण कोणालाहि मोहवील असं आकर्षक आहे. पण मी तुला सांगतों, कीं तुझं हें प्रेमपुष्प तूं कोणत्याहि नश्वर वस्तूला वाहूं नकोस!"

ते रुखे, तिखे शब्द नलिनीच्या कानीं पडतात मात्र; ती एकदम स्तब्ध होते. त्याच्या वक्षःस्थलावरचा तिचा भार वाढूं लागतो. ती हळूहळू थंड होऊं लागते. दिवाकराला समजतें कीं, नलिनीची ही अवस्था म्हणजे निद्रा नव्हे, मूर्च्छा नव्हे आणि समाधीहि नव्हे! नलिनीनें मरणाला मिठी घालून शरीराचा त्याग केला आहे. ती हर्ष-शोकाच्या पलीकडे गेली आहे. तिचें सारें संपलें आहे!

एवढ्यांत एक योगिनी त्या ठिकाणीं येते. नलिनी ही तिची शिष्या असते. तिच्याच आश्रयानें तिथें राहिलेली असते. आपल्या शिष्येचा अकालमृत्यु पाहून तीहि स्तंभित होते. दिवाकर आणि योगिनी दोघेंहि मिळून मग नलिनीचा निश्चेष्ट देह गौरीशंकर शिखरावर नेतात आणि तिथें त्याला अग्निसंस्कार करतात. आणि पुढें दोघेंहि आपापल्या मार्गानें निघून जातात.

हें खंडकाव्य वाचतांना वाचक, दिव्य आणि अलौकिक अशा भूमींत विहार करूं लागतो. नलिनी आणि दिवाकर! दोन सामान्य मानवी जीव!

पण प्रेम, त्याग आणि तपस्या यांच्या बळावर ते मानवभूमींतून वर उठतात. पुण्यात्मे होतात. भगवंताच्या पूजेसाठीं तीं जणूं दोन दिव्य फुलें उमललीं होतीं, असें वाटूं लागतें.

**महाकवि वळ्ळत्तोळ**

याच मालिकेंतील चढत्या श्रेणीनें तिसरे आणि समस्त केरळाला नवजीवन देणारे महाकवि वळ्ळत्तोळ हे होत. कुमारन् आशान्चे अकालीं निधन झालें. त्यामुळें केरळांतल्या सामाजिक असमतेविषयीं करुण विरक्ति एवढा एकच भाव त्यांच्या काव्यांतून प्रकट होऊं शकला. उळ्ळूर सरकारी नोकर होते; त्यामुळें त्यांना आपल्या कवितेच्या द्वारें केरळीय जनतेचें राष्ट्रीय उद्बोधन करतां आलें नाहीं. वळ्ळत्तोळ हे मात्र या सर्व कार्यांत यशस्वी झाले आहेत. मलयाळम् भाषा, तिथला निसर्ग, तिथल्या नर-नारींची जीवनकला, तिथल्या प्रकृतीची संजीवक शक्ति, हें सर्व कांहीं पाहून, पारखून, परिष्कारून, त्यांनीं काव्याच्या मखरांत बसवलें, सुशोभित केलें आहे.



महाकवि वळ्ळत्तोळ

सन १९५८ च्या १३ मार्च रोजीं हा महाकवि इहलोक सोडून गेला. जिथें कालिदास, भवभूति विराजत असतील, जिथें व्यास-वाल्मीकि निजानंद अनुभवीत असतील आणि जिथें वैदिक ऋषि देवांसह अमृताचा आस्वाद घेत असतील, त्या दिव्य लोकांत आणि त्यांच्या पंक्तीला चिरविश्राम करण्यासाठीं

या महाकवीनें परलोक सुधारला. केरळीय जनता वळ्ळत्तोळ यांना साहित्य आणि कला यांचे पितामह समजत होती. त्यांच्या निधनानें त्या जनतेला जणूं अनाथ पोरक्यासारखें वाटूं लागलें.

श्री. वळ्ळत्तोळ यांचा जन्म १८७९ सालीं केरळांतल्या मंगलम् या गांवीं झाला. वळ्ळत्तोळ हें त्यांच्या घराण्याचें नांव आहे. त्यांचें संपूर्ण नांव नारायण मेनोन असें होतें. पण नांवाच्या बाबतींत म. गांधीसारखेंच त्यांचेंहि झालें. मोहनदास करमचंद हें त्यांचें व्यक्तिनाम मागें पडून 'गांधी' या नांवानेंच ते जगप्रसिद्ध झाले. या कवीलाहि नारायण मेनोन या नांवानें कोणी ओळखणार नाहीं. वळ्ळत्तोळ म्हटलें, तरच त्यांची ओळख पटते. बाल-वयांतच ते आपल्या मामाकडे संस्कृत शिकूं लागले. १५ व्या वर्षी संस्कृताचे पंडित बनले. पुढें आचार्य होऊन संस्कृत पढवूंहि लागले. त्यांच्या कवितेचा प्रारंभ फुटकर संस्कृत कवितेनें झाला. घरची सामान्यतः गरिबीच; त्यामुळें कष्ट करीत करीतच त्यांना आपल्या प्रतिभेचा विकास करावा लागला. त्यांच्या समग्र काव्यांत दलित वर्गाविषयींची जी अपार कळकळ निर्मळ झऱ्यासारखी झुळझुळते, तिचा उगम त्यांच्या कष्टमय जीवनांतच आहे.

मलयाळम् भाषेला कांहीं शतकांतच देववाणीचा आधार मिळाला आणि तिनें स्वतःवरचें तमिळ वर्चस्व झुगारून दिलें. संस्कृत साहित्य संपदा ही आपलीच संपदा मानून तिच्या बळावर मलयाळम् भाषा आपला संसार सजवूं लागली. पण पुढें पुढें केरळांतल्या पढिक पंडितांच्या संस्कृत दडपणानेंहि मलयाळम्चा कोंडमारा होऊं लागला. ती जणूं भाराक्रांत झाली. दुसऱ्या दृष्टीनें मलयाळम् साहित्यहि शास्त्रीय परंपरेच्या चक्रव्यूहांत सांपडून खऱ्या जीवनापासून फार दूरवर जाऊन पडलें. या दोन्हीं संकटांतून मलयाळम् भाषेला मुक्त करणारे, तिला जनतेच्या घरांत अन् झोपडींत आणून बस-विणारे दोनच महाभाग केरळांत अवतीर्ण झाले. पहिला १६ व्या शतकांतला एडुताच्छन् आणि दुसरा चालू शतकांतला वळ्ळत्तोळ. एडुताच्छन्नें खास जनतेच्या भाषेंत तिला नैतिक संस्कार दिले, तर वळ्ळत्तोळनें तिच्यावर राष्ट्रीय भावनेचा अभिषेक केला. ज्यांनीं साहित्याचे परंपरागत शास्त्रीय मानदंड मोडून विशाल जीवनाच्या क्षेत्रांत येऊन ठाण मांडलें, असे मलया-ळम्चे पहिले साहित्यिक महाकवि वळ्ळत्तोळ हेच होत. साहित्याच्या मठा-

धिपतींना त्यांनीं ललकारून सांगितलें, कीं ‘ जोंवर तुम्हीं जीवनाला सामोरे जाणार नाहीं, त्याचा साक्षात् अनुभव घेणार नाहीं, तोंवर तुमच्या साहित्यांत प्राण येणार नाहीं, राम येणार नाहीं ! ’

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध भारतांत स्वातंत्र्याच्या दुर्दम्य आकांक्षेनें भारलेला होता. आधीं लो. टिळक आणि नंतर म. गांधी या महापुरुषांनीं देशावरच्या सुस्त जीवनावरची राख फुंकून टाकली होती. थंड मातीचा गोळा असलेला भारत आता चैतन्याचा रसरशीत लोहगोळ बनला होता. देशभरचे कवि, महाकवि आपल्या गीत-मंत्रानीं त्या स्वातंत्र्याग्नीला जनतेच्या हृदया-हृदयांत फुलवीत होते. केरळांत हें कार्य वळ्ळत्तोळ यांनीं केलें. गुलामीच्या शृंखला तोडून स्वतंत्र होण्यासाठीं वळ्ळत्तोळ यांनीं जो कवितेचा स्वर लावला, तो जितका निर्भय तितकाच तीव्रहि होता. त्यांच्या राष्ट्रगीतांनीं केरळांतल्या असंख्य युव-युवतींना कारागृह हें स्वातंत्र्याचें मंदिर बनवलें. समग्र केरळभर राष्ट्रीय उत्थानाची जी एक लाट उसळली, तिला म. गांधींनीं दिलेल्या प्रेरणेच्या खालोखाल वळ्ळत्तोळ यांची प्रेरणाहि कारणीभूत होती. ते महात्माजींना गुरू मानीत. त्यांच्या सर्व विधायक कार्याविषयीं त्यांनीं आपली आस्था दर्शविली आहे. हिंदु, मुस्लीम आणि ख्रिस्ती या केरळाच्या तीन प्रमुख जाती होत. हे तिन्ही धर्म तिथें एकमेकांत गुंफले गेले आहेत. केरळ ही जणूं तीन धर्मांची त्रिवेणी आहे. वळ्ळत्तोळ यांनीं या तिन्ही धर्मांचें अध्ययन करून त्यांतलीं सारभूत तत्त्वें ग्रहण केलीं आणि त्या तत्त्वांनीं आपल्या काव्याचे शब्दार्थ अनुप्राणित केले.

‘ चित्रयोगम् ’ हें त्यांचें महाकाव्य. कथासरित्सागरांतल्या ‘ मंदारवती आणि सुदर्शन ’ या कथेचा या महाकाव्याला आधार आहे. त्या प्रणयी युग्माचीं नांवें तेवढीं त्यांनीं बदललीं आहेत. त्या दोघांची दृष्टिभेट, त्यांतून उगवलेला प्रणय, त्याच्या मार्गांत आलेलीं विघ्नें आणि अंतीं त्या सर्व विघ्नांचा निरास होऊन झालेलें त्यांचें मधुर मीलन, अशी ती कथा विस्तारली आहे. केरळाच्या पंचमहाकाव्यांत ‘ चित्रयोगम् ’ला विशेष स्थान आहे. केरळांतल्या पंडित मंडळीनें वळ्ळत्तोळ यांना महाकवि ही पदवी दिली, ती याच महाकाव्यावरून. पण केरळांतली चालू पिढी त्या महाकाव्याशीं विशेषशी परिचित नाहीं. जीवन आणि साहित्य यांच्या संगमांतून त्यांनीं जीं अनेक

खंडकाव्यें रचलीं आणि मुक्त भावगीतें गाइलीं, त्या काव्यसंपदेवरच केरळी जनता लुब्ध आहे. त्या काव्यांतून विश्वमानवतेची पूजा करणारी अन् तिलाच जीवनाचा नैवेद्य समर्पिणारी जी भावना मुखरित झाली आहे, तीच तिथल्या लोकांना प्रिय आणि पावन ठरली आहे. वळ्ळत्तोळ यांनीं अखिल मानवतेच्या चरणीं आपला जीव जडवला आहे.

पण 'तुका आकाशा एवढा' तसे ते आकाशाएवढे उंच झाले, तरी त्यांना आपल्या घरांत सांजवात लावण्याचें मात्र विस्मरण झालेलें नाहीं. ते मान उंचावून केरळांतलीं सह्याद्रीचीं उत्तुंग शिखरें पाहतात आणि किनाऱ्यावर उभें राहून खालच्या दृष्टीनें सागराचें गांभीर्यहि न्याहाळतात. केरळ भूमीच्या कणाकणावर त्यांचें प्रेम आहे. केरळांतले नदी-नाले, वनें-उपवनें, पशु-पक्षी, त्या भूमीवर होणारें ऋतूंचें नाट्य-नर्तन, तिथले हरिजन-गिरिजन, शेतकरी आणि श्रमिक, या सर्वांच्या भक्ति-प्रेमानें त्यांचें हृदय भरून ओसंडत आहे. केरळाचा आणि त्याच्या इतिहासाचा त्यांना रास्त असा अभिमानहि आहे. ते म्हणतात —

" केरळमन्नु केट्टालो तिळरकणम्
चोरा नमुक्कु अरं पुकळित् "

'केरळचें नांव ऐकतांच हृदय भरून गेलें पाहिजे, नसानसांतलें रक्त उसळून आलें पाहिजे.'

मात्र त्यांच्या या अभिमानांत आणि केरळगौरवांत प्रादेशिक क्षुद्रतेचा लवलेशहि नाहीं. ते अखिल भारताचे आणि भारताच्या ऋषिप्रणीत संस्कृतीचे निष्ठावंत उपासक आहेत. अथर्ववेदांतल्या त्या भूमिसूक्त गाणाऱ्या ऋषीच्या भावभक्तीनेंच ते भारताचें स्तोत्र गातात—

" भारतमेन्ना पेरकेट्टालभिमान
पूरित माकणमंतरंगम्
अंपो ! महिमावितार्षभूवे, तव वन्
पोर्कळत्तिलुम ब्राह्मण्य संपत्ति
वेशत्तेरुविलुम चरित्र सौरभम् "

'भारताच्या केवळ नामश्रवणानें अंतरंग अभिमानानें भरून यावें. काय सांगावा या आर्ष भूमीचा महिमा! इथें रणमैदानावरहि निष्काम कर्मयोगाचा गुंजारव ऐकूं येतो. इथल्या भिल्लाच्या झोंपडींतहि ब्रह्मज्ञान खेळतें. इथें वारयोषितांच्या आळींतहि चारित्र्याचा सुगंध पसरून राहिलेला दिसतो!'

वळ्ळत्तोळ यांच्या महाकाव्याचा वर उल्लेख केला. गणपति, आनिरुद्धन्, अच्छनुम् मकलुम्, बापूजी, विलासलतिका, सीता, इत्यादि त्यांचीं खंडकाव्यैंहि बरींच आहेत. या महाकवीची दिगंताचा शोध घेणारी प्रतिभा या खंडकाव्यांतच पूर्णपणें विलसित झाली आहे. याशिवाय 'साहित्य मंजिरी' या नांवानें त्यांचे आठ काव्यसंग्रहहि प्रसिद्ध आहेत. वाल्मीकिरामायण, शाकुंतलम्, स्वप्नवासवदत्तम् यांचाहि त्यांनीं अनुवाद केला आहे. त्यांचें शेवटचें महान् साहित्यिक कार्य म्हणजे ऋग्वेदाचा मलयाळम् भाषेंतला अनुवाद हें होय! हें आर्ष शतकृत्य पुरें करूनच त्यांनीं देह ठेवला. ऋग्वेदाचा अनुवाद म्हणजे तें एक प्रचंड साहसच होतें. पण वळ्ळत्तोळ त्या कामीं यशाचा तुरा लावून गेले. भारतसरकारनें या वेदानुवादाच्या प्रकाशनाची व्यवस्था करून त्यांच्या परिश्रमाचें सार्थक केलें आहे.


पूर्वींच्या त्रिवांकुरच्या संस्थानिकांनीं त्यांना अनेक बिरुदें अर्पण केलीं. मद्रास सरकारनें त्यांना राजकवि मानलें. केरळच्या आणि दिल्लीच्या साहित्य-अकादमींचे ते सदस्य आणि सभापतिहि होते. पण या सर्व बिरुदांवर सुवर्ण कळस म्हणजे भारताच्या राष्ट्रपतींनीं त्यांना दिलेली 'पद्मविभूषण' ही पदवी!

मलयाळम्च्या गद्याचा विकास एकोणीसाव्या शतकापासून सुरू होतो. मलयाळम्मध्यें प्राचीन कालांतहि एकप्रकारची गद्यशैली प्रचलित होती; पण नांव गद्य असलें तरी ती पद्याचीच एक जात होती. केरळांत पाश्चात्यांचें आगमन झालें आणि त्यानेंच खऱ्या अर्थानें गद्यसाहित्याला प्रेरणा दिली. पाश्चात्यांच्या बरोबर त्यांचें बायबल आलें आणि बायबलासंगें ख्रिस्ती धर्मप्रचारकहि आले. त्यामुळें शुद्ध मलयाळम् भाषेंत सर्वप्रथम जी गद्य रचना झाली ती म्हणजे बायबलचा अनुवाद. या कामीं डॉ० गुंडर्ट यांचें नांव चिरस्मरणीय आहे. हेहि ख्रिस्ती धर्मांचे प्रचारकच होते. केरळांत आल्यावर ते मलयाळम् भाषा शिकले. त्याच्याच जोडीनें त्यांनीं इतर देशी भाषांचेंहि अध्ययन केलें. त्यांनींच मलयाळम्चा शब्दकोशहि बनवला.

पण मलयाळम् गद्याचें पितृस्थान 'केरल कालिदास' या उपाधीनें मंडित झालेल्या 'केरलवर्मा कोइत्तम्पुरान' या रसिक आणि कर्तृत्ववान् अशा विद्वानाकडेच जातें. त्यांनीं 'विज्ञानमंजिरी' 'सन्मार्गप्रदीपम्' 'महच्चरित-संग्रहम्' 'भारताचा व तिरुवितांकुरचा इतिहास' असे अनेक ग्रंथ लिहिले. कादंबरीलेखनाचा उपक्रमहि या केरल कालिदासानेंच केला. पण खरीखुरी कादंबरी लिहिली, ती मात्र चन्तु मेनन यांनीं. तिचें नांव आहे 'इंदुलेखा.' एका नायर कुटुंबाच्या पार्श्वभूमीवर या कादंबरीचा प्रपंच झालेला आहे. केरळाचे हरिभाऊ आपटे म्हणजे सी. वी. रामन् पिळ्ळा हे होत. यांनीं बऱ्याच ऐतिहासिक कादंबऱ्या आणि गद्य प्रहसनेंहि लिहिलीं आहेत. चन्तु मेनन कडूनच यांना प्रेरणा मिळाली आहे.

ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रांत आणखी एक नांव गौरवानें घ्यावें लागतें, तें सरदार के. एम्. पणिक्कर यांचें. 'कल्याणमल्', 'परंकिपटयाली', 'पुनर-ओट्टस्वरूपम्', 'केरलसिंहम्' इत्यादि अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून श्री. पणिक्कर यांनीं केरळाच्या प्राचीन पराक्रमाचें यथार्थ दर्शन केरळी जनतेला घडवलें आहे. श्री. नारायण पणिक्कर हे तर मलयाळम्चे साहित्यमहर्षिच होत. त्यांचे सुमारें ऐंशीं ग्रंथ प्रकाशित आहेत. 'केरळ भाषा साहित्य चारित्रम्' नांवाचा तीन हजार पृष्ठांचा एक ग्रंथ लिहून त्यांनीं मलयाळम्च्या इतिहासाचें न्यून पूर्ण केलें आहे. मलयाळम्च्या नाटककारांत कुमार पिळ्ळा, गोपाळ पिळ्ळा, चेल्लपन् नायर, गोपीनाथन् नायर, मुनशी परमु पिळ्ळा, इत्यादि लेखक मानाचें स्थान प्राप्त करून बसले आहेत. कथालेखकांत शिवशंकर पिळ्ळा, केशवदेव, पोट्टकाट्टु; नीळकंठ पिळ्ळा, वैकम् बशीर, चेल्लपन् नायर, यांचीं नांवें गाजत आहेत. राघवन् पिळ्ळा हे मलयाळम्चे आधुनिक कवि होत. त्यांच्या जोडीनें नांव घेतात तें चङ्ङम् पुडा यांचें. याशिवाय केटा मंगलम्, पुत्पुकुट्टि, बोधेश्वरन् असेहि अन्य बरेच कवि आहेत. आजमितीस भाषाशास्त्र, चरित्र, निबंध, संशोधन, वैज्ञानिक साहित्य, विनोदी साहित्य, अशा अनेक अंगांनीं मलयाळम् भाषा आपली अभिवृद्धि करीत आहे.

* * *



# शंकराचार्य ........

भूषण कवीनें म्हटलें आहे, कीं जर शिवछत्रपतींचा अवतार झाला नसता तर—

" काशीजीकी कला जाती
मथुरा मशीद् होती
ना होता शिवाजी तो
सुनत होत सबकी "

शंकराचार्यांच्या बाबतींतहि कांहीं मनीषी पंडितांनीं असेंच म्हटलें आहे. शंकराचार्यांचा अवतार झाला नसता, तर बौद्ध धर्माच्या विप्लवांतून हिंदु-धर्म कधींच वर उठला नसता. या देशांतून श्रौत-स्मार्त कर्मांचा पार लोप झाला असता. आणि उभ्या भारतांत एकच ललकार उठत राहिला असता कीं ' बुद्धं सरणं गच्छामि ! '

या उलट शंकराचार्यांना ' प्रच्छन्न बौद्ध ' म्हणजे छुपे बौद्ध समजणारे पंडितहि त्यांच्याच कालांत निर्माण झाले आहेत. ती एक वेगळीच उपाधि त्यांच्या नांवामागें कायमची जोडली गेली आहे. महर्षि विनोबा म्हणतात, कीं ' हिंदुधर्माला कोणीं सामर्थ्यशाली बनविलें असेल, तर तें शंकराचार्यांनींच. बुद्धाप्रमाणेंच शंकराचार्यांनींहि सरळ कर्मकांडावरच प्रहार केला. त्यांनीं या गोष्टीवर जोर दिला, कीं या जीवनांत, याच शरीरांत हृदयाची शुद्धि व आत्म्याची अनुभूति हीं प्राप्त होऊं शकतात आणि हेंच धर्मांचें सार आहे.

शंकराचार्यांना ‘ प्रच्छन्न बौद्ध ’ म्हणतात याचें कारण एवढेंच, कीं बुद्धानें मान्य केलेला संन्यासमार्ग शंकराचार्यांनीं पुढें वाढवला आणि बुद्धाप्रमाणेंच कर्मकांडाचा विरोध करून यतिसंघाची स्थापना केली.... ’

शंकराचार्य ही एक अलौकिक विभूति होती. अनेक गुणविशेषांचा अद्‌भुत असा संगम त्यांच्या ठिकाणीं झाला होता. त्यांचें अगाध पांडित्य वर्णावें, विरोधी मतांच्या वावड्या वाऱ्यावर उधळून देणारें वादपटुत्व वाखाणावें, शैलीदार संस्कृत प्रशंसावें, प्रचंड कर्तृत्व गौरवावें, का त्यांच्या अद्‌भुत योगैश्वर्याचें स्तोत्र करावें, तेंच कळत नाहीं.

लोकोत्तर विभूति या खरोखर कोण्या एका देशाच्या नसतातच. त्या सार्वभौम असतात. स्थलकालातीत असतात. निराळ्या अर्थानें विश्व हेंच त्यांचें घर असतें. शंकराचार्यांचेंहि तसेंच आहे. जगाच्या महापुरुषांत त्यांची गणना होते. जागतिक तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत आणि ऊहापोहांत त्यांचें नांव अपरिहार्यपणें घ्यावें लागतें. केरळ ही त्यांची जन्मभूमि. भारत ही कर्मभूमि. परंतु शंकराचार्य हे विश्वव्यापक झाले असले, तरी केरळावर लिहीत असतांना त्यांना आदराचें एक अर्घ्य दिल्यावांचून पुढें जाणें हा अन्याय्य, अतिक्रम ठरेल. तो दोष अंगीं लागू नये म्हणून आणि त्यांच्याविषयीं अंतरांत नितांत भक्ति भरून राहिली आहे म्हणून, या प्रकरणांत त्यांच्या चरित्राची अन् कार्याची रूपरेषा थोडक्यांत सांगणार आहें.

पण खरी अडचण उपस्थित होते ती इथेंच. एवढ्या महापुरुषाचें खरेंखुरें जीवनचरित्र उपलब्ध होऊं नये, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या जीवनांतील घटनांचें संकलन त्यांच्या अवतारसमाप्तीनंतर बऱ्याच कालानें झालें. आनंदगिरीचा व चिद्‌विलासयतीचा ‘ शंकर विजय ’, माधवाचार्यांचा ‘ शंकरदिग्विजय ’ गोविंदानंदाचें ‘ आचार्यचरित ’ इत्यादि अनेक ग्रंथ शंकराचार्यांचें चरित्र वर्णितात. पण ऐतिहासिक दृष्ट्या त्यांतला एकहि ग्रंथ प्रमाणभूत मानतां येत नाहीं. आधुनिक कालांतहि शंकराचार्यांविषयीं जें कांहीं संशोधन झालें आहे, त्यांतसुद्धा पुष्कळच मतभेद आहेत. शंकराचार्य कोणत्या काळांत जन्मले आणि कधीं अंतर्धान पावले, इथपासूनच मतभेदाला प्रारंभ होतो.

बर्नेल म्हणतात, कीं त्यांचा जन्म सातव्या शतकांत झाला. राजेंद्रनाथ घोष त्यांच्या या मताला पुष्टि देऊन आचार्यांचा जन्म ६०८ किंवा ६८६ या सालीं झाला, असें त्यांचें जन्मवर्ष निश्चित करतात. वेबर हे ८ व्या शतकाचे पुरस्कर्ते आहेत. लुई रैस हे वेबरच्या मताचेच समर्थक आहेत. मात्र बहुतेक विद्वानांचें मत आचार्य सन ७८८ सालीं जन्मले आणि आयुष्याच्या बात्तिसाव्या वर्षी समाधिस्थ झाले, असें आहे. बाकीच्या गोष्टी कांहींहि असोत; पण शंकराचार्यांचें चरित्र म्हणून जें उपलब्ध आहे, त्यावरून त्यांची जीवन-कथा सांगायची तर ती अशी—

केरळांत पूर्णा नदीच्या कांठीं कालडी नांवाचें एक गांव आहे. त्या गांवीं एका नम्पूतिरि ब्राह्मणाच्या कुटुंबांत आचार्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचें नांव शिवगुरु आणि आईचें नांव सुभद्रा. मोठें धार्मिक आणि भावभक्तीचें दांपत्य! त्यांच्या संसारांत अन्य कांहीं न्यून नव्हतें. उणीव होती ती फक्त अपत्याची! अनेक ऋतु आले अन् गेले. अनेक वर्षें उगवलीं अन् मावळलीं. पण त्या दांपत्याला पुत्रमुख कांहीं दिसेना. मग त्यांनीं पुत्रकामनेनें शंकराची प्रखर आराधना सुरू केली. शंकर त्या जोडप्याला प्रसन्न झाला. स्वप्नांत असो वा दृष्टांत असो, तो त्यांच्यापुढें उभा राहून म्हणाला—



शंकराचार्य

"मी तुम्हांला पुत्र देईन; पण माझ्याकडे दोन पर्याय आहेत. दीर्घायुषी पुत्र हवा असला, तर तो मूर्ख मिळेल. सर्वज्ञ आणि गुणसंपन्न हवा असला, तर तो अल्पायुषी निपजेल. कोणता पर्याय मान्य होतो तें सांगा."

त्यावर शिवगुरूनें अल्पायुष्याचा दोष पत्करूनहि सर्वज्ञ पुत्रच पसंत केला. शंकरानें 'तथास्तु' म्हटलें. थोड्याच कालांत सुभद्रादेवी गर्भवती झाली. नवमास भरतांच वैशाख शुद्ध पंचमीस एका पुत्ररत्नाला प्रसवली. शंकरानें पुत्र दिला म्हणून शिवगुरूनें त्याचें 'शंकर' हेंच नांव ठेवलें. आपल्या घरांत बालकरूपानें एका महान् दिव्य विभूतीनें जन्म घेतला आहे, हें त्या माता-पित्यांच्या लगेच लक्षांत आलें. पण शंकराचें उपनयन होण्यापूर्वींच शिवगुरूचें देहावसान झालें. पांचव्या वर्षी मातेलाच दुःखी अंतःकरणानें त्याची मुंज करावी लागली. लगेच शंकर अध्ययनासाठीं गुरुगृहीं गेला अन् सातवें वर्ष पूर्ण होतें तोंच वेद-वेदांगांचें अध्ययन समाप्त करून परत घरीं आलासुद्धा ! त्याची ती लोकविलक्षण बुद्धिमत्ता पाहून गुरुजनांनीं तोंडांत बोट घातलें.

त्यानें पुढचा विचार केला तो दुसरा कोणता नव्हे; तर संन्यास घेण्याचा. पण आईची त्याला अनुज्ञा मिळेना. एवढ्या अल्प वयांत मुलानें भगवीं वस्त्रें घेणें म्हणजे तिच्या वांट्याला पुत्राचें अकालमरणच तें ! कारण संन्यास घेतल्यावर त्याला व्रत घ्यावें लागणार होतें तें 'चरैवेति'चें ! सुभद्रादेवी कळवळून म्हणाली, 'नको रे बाबा संन्यास घेऊं !'

मातेच्या अंतःकरणाला कष्ट देण्याची शंकराची इच्छा नव्हती. तो संन्यास घेणार होता; पण तो आईची अनुज्ञा घेऊनच. आणि तसा योग लवकरच जुळून आला. एक दिवस शंकर आईला घेऊन पूर्णा नदीवर स्नानाला गेला. आई बुचकळी मारून वर आली; पण शंकरला वाटलें दोन हात मारून यावें. तो पोहत पोहत बराच पुढें गेला आणि एकाएकीं त्याच्या तोंडून भयार्त चीत्कार बाहेर पडला. आई ओरडली, 'अरे, काय झालं रे ?' शंकरानें उत्तर दिलें, 'अग आई ! मगरीनें माझा पाय पकडला आहे. ती मला डोहांत खेंचते आहे !' तें ऐकून आईचें काळीज उपडें पडलें. ती ऊर पिटून आक्रोश करूं लागली. शंकर पुन्हा तिथूनच ओरडला,

"आई आकांत नको करूं. त्यानं कांहीं होणार नाहीं. तूं मला संन्यास घेण्याची अनुज्ञा देशील, तर ही मगर आत्तां माझा पाय सोडते बघ !"

त्यावर सुभद्रादेवी म्हणाली.

"घे बाबा! संन्यास घे, काय हवं तें कर, पण जिवानिशीं बाहेर ये."

आणि काय आश्चर्य! मगरीनें शंकराचा पाय सोडला. तो पोहत पोहत किनाऱ्यावर आला. आईनें त्याला पोटाशीं धरून आंसवांच्या धारांखालीं आणखी भिजवलें. तीं दोघें मग घरीं आलीं. शंकरानें पुढचा बेत निश्चित केला. वयाला अवघें आठवें वर्ष! पण तशाहि अवस्थेंत तो घरांतून बाहेर पडला. त्यामुळें पुन्हा एकदा मातेच्या वत्सल हृदयाचा ठाव सुटला. पण शंकरानें तिला समजावलें.

"आई! मी कुठेंहि गेलों असलों तरी, अंतकाळीं तुझ्या सेवेला सादर होईन. तुझा अंत्य संस्कार मी माझ्या हातांनीं करीन!"

मगरीच्या तोंडांत असतांनाच शंकरानें 'संन्यस्तं मया' म्हटलें होतें. पण तो केवळ 'आपत्संन्यास' होता. त्याला धर्मशास्त्राप्रमाणें मान्यता मिळायची, तर त्यावर शास्त्रोक्त विधि–विधानाचें शिक्कामोर्तब व्हायला हवें होतें. त्यासाठीं अधिकारी गुरु हवा होता. तशा ब्रह्मज्ञानी गुरूच्या शोधार्थ शंकर निघाला. हिंडत हिंडत नर्मदातटाकीं आला. तिथें गोविंद भगवत्पाद नांवाच्या यतीशीं त्याची भेट झाली. शिष्य व्हायला आलेला बालक पूर्ण अधिकारी आहे हें जाणून त्यांनीं शंकराला विधियुक्त संन्यासदीक्षा दिली. शंकर आतां पूज्यपाद 'आचार्य' झाला.

आचार्यांनीं मग तिथेंच नर्मदेच्या तीरावर गुरूपदिष्ट मार्गानें योगसाधना केली. अल्पकालांत त्याहि मार्गांत त्यांनीं सिद्धि मिळवली. तिथून ते वाराणशीला आले. तिथें मणिकर्णिका घाटावर त्यांनीं मठी बनवली. तिथें त्यांची ख्याति व्हायला उशीर लागला नाहीं. कित्येकांनीं त्यांचें शिष्यत्वहि ग्रहण केलें. सनंदन नांवाचा शिष्य त्यांना इथेंच लाभला. आचार्य तिथें आपल्या शिष्यांना अद्वैत वेदान्त पढवूं लागले.

पुढें एक दिवस ते शिष्यांसमवेत गंगास्नानाला जात असतां एक चांडाल त्यांची वाट अडवून उभा राहिला. आचार्य त्याला म्हणाले कीं, 'दूर हो!' चांडाल बोलला, 'कां दूर होऊं? तुम्ही अद्वैती आहांत ना? मग जें सच्चिदानंद आत्मतत्त्व तुमच्यांत आहे, तेंच माझ्यांतहि आहे. 'मीं ब्राह्मण

अन् तूं चांडाल ' ही भेदभावना जर तुमच्या अंतरांत कायम असेल, तर तुम्हाला अद्वैत कळलं, पण वळलं नाहीं, असंच मी समजेन. '

चांडालाच्या स्पष्ट आणि तत्त्वग्राही वाणीनें आचार्य स्तिमित झाले. त्यांच्या हृदयांत तत्त्वप्रकाश उजळला. ते त्या चांडाळाला म्हणाले, ' बाबारे, तूं कोणीहि असलास तरी माझा गुरु झालास हें खरें. '

आजवर अद्वैत आचार्यांच्या बुद्धींत होतें. या प्रसंगानें तें त्यांच्या हृदयांत संचरलें अन् प्राणांत भिनलें. चरित्रकार म्हणतात, कीं चांडाल-स्वरूपानें तो काशीचा विश्वेश्वरच त्यांना भेटला होता. आचार्यांचें अद्वैत त्यानेंच कसाला लावलें होतें.

नंतर त्यांना ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहिण्याची प्रेरणा झाली. ब्रह्मसूत्रें ही वेद-व्यासांची निर्मिति. हिमालयांतल्या ज्या गुहेंत बसून त्यांनीं ती केली त्याच गुहेचा आश्रय करून आपण त्यांवर भाष्य लिहावें, असें आचार्यांच्या मनानें घेतलें. त्यासाठीं सनंदनादि शिष्यांसह ते लगेच हिमालयाचे पांथस्थ बनले.

त्यावेळीं आचार्यांचें वय अवघें बारा वर्षांचें होतें. कुमारदशा नुकतीच कुठें संपली होती. पण त्यांच्या मुखावर जें ज्ञानाचें आणि आचरणाचें तेज विलसत होतें तें अलौकिक होतें. जो जो त्यांना भेटे, तो तो त्यांच्या चरणीं लागे. ते हिमालय चढले. बदरिकाश्रमांत पोंचले. तिथें सरस्वतीच्या तीरावर ती ' व्यासगुहा ' होती. तिथें त्यानीं आपला मुक्काम केला. तिथेंच ब्रह्मसूत्र-भाष्याला प्रारंभ केला व तिथेंच त्याची समाप्तिहि केली. त्यानंतर गीताभाष्य. त्यापुढें उपनिषदांवरचें भाष्य. वयाचीं सोळा वर्षें पूर्ण होण्याच्या पूर्वींच ही सारी भाष्यरचना संपूर्ण झाली !

तिथून ते उत्तरकाशीला आले. तिथेंहि कांही काल त्यांचा मुक्काम झाला. तिथेंच आपल्या शिष्यांना ते ब्रह्मसूत्रभाष्य पढवूं लागले. असाच एक दिवस पाठ चालला असतां एक कृष्णवर्णी वृद्ध ब्राह्मण तिथें उपस्थित झाला. त्यानें म्हटलें,

“ अहो, तरुण आचार्य ! तुम्हीं म्हणे व्यासांच्या ब्रह्मसूत्रांवर अद्वैतपर भाष्य लिहिलें आहे. मला त्यांतल्या एका सूत्राविषयीं शंका आहे. तुम्ही निराकरण कराल काय ? ”

"यावद् बुद्धिबलोदयम्! जसं मला समजेल तसं सांगेन." आचार्य नम्रपणें उत्तरले.

मग शंका-प्रतिशंका सुरू झाल्या. तो ब्राम्हणहि लेचापेचा नव्हता. त्यानें आचार्यांना खूप हैराण केलें. आठ दिवस त्यांचा शास्त्रार्थ चालला होता. अखेर तो ब्राह्मण निरुत्तर झाला आणि त्या पराभवांतहि संतोष पावला. मग त्यानें सांगितलें.

"ब्रम्हसूत्रें लिहिणारा व्यास तो मीच! आज तूं माझ्या परीक्षेला उतरलास. तुझं भाष्य मला पसंत आहे. तूं याचा जनांत प्रचार कर. खरं म्हणजे सोळाव्या वर्षी तुझं आयुष्य समाप्त होण्याचा योग होता. पण मी आणखी सोळा वर्षांच्या आयुष्याचं तुला वरदान देतों."

व्यासांचा असा वरदहस्त मिळवून आचार्य हिमालय उतरले. तिथून ते प्रयागला आले. त्यांना कुमारिल भट्टांना भेटायचें होतें. कुमारिल भट्ट हे महान् मीमांसक होते. प्रख्यात पंडित होते. वैदिक धर्माचे कट्टे अनुयायी अन् प्रचारकहि होते. बौद्धांच्या वेदबाह्य मतांचें रान त्यांनीं आपल्या बुद्धीच्या प्रखर धारेनें साफ करून टाकलें होतें. त्यांची ही कीर्ति आचार्यांच्या कानावर गेली होती आणि म्हणूनच त्या महापुरुषाच्या दर्शनार्थ ते प्रयाग क्षेत्रांत आले होते.

आचार्यांना तिथें त्रिवेणीसंगमावर त्यांचें दर्शन झालें. पण तें कशा अवस्थेंत? कुमारिल भट्टांनीं कोंडयाच्या राशींत कमरेपर्यंत आपला देह खुपसला होता अन् त्या राशीला अग्नि लावून दिला होता. आचार्यांनीं स्तंभित होऊन त्यांना विचारलें.

"महाराज! या तुषाग्नींत कां बरं स्वतःला जाळून घेतां?"

"माझ्या हातून गुरुद्रोह घडला आहे, त्याचं प्रायश्चित्त करतों आहें." कुमारिल भट्ट म्हणाले.

"गुरुद्रोह?"

"होय आचार्य. ज्या बौद्ध गुरूकडून मी बौद्ध तत्त्वज्ञान शिकलों, त्याचाच वादांत मीं पाडाव केला. मला या अपराधाचं प्रायश्चित्त घेतलंच पाहिजे."

" तुम्हीच असा अकालीं इहलोक सोडून गेलांत, तर वैदिक धर्माला त्राता कोण ?"

"तुम्ही ! माझ्या मागून तें कार्य तुम्ही उत्तम रीतीनें कराल याचा मला भरंवसा आहे. मीं तुमची अद्‌भुत् कीर्ति ऐकली आहे. अंतकाळीं तुमचं दर्शन झालं, ही भाग्याची गोष्ट !"

आणि थोडयाच काळांत कुमारिल भट्टांचें तें अघोर प्रायश्चित्त पुरें झालें. कुमारिल भट्टांचा देह दग्ध झाला. आत्मा शंकराचार्यांच्या आत्मज्योतींत मिसळला. सूर्यानें सायंकाळीं अस्ताला जातांना आपलें तेज अग्नीला देऊन जावें, तसा तो प्रकार घडला. आचार्यांच्या मनावर त्या घटनेचा गंभीर परिणाम झाला.

प्रयागहून ते महिष्मती नगरीला आले. तिथें एक बडें कर्मकांडी प्रस्थ होतें. त्यांचें नांव मण्डनमिश्र ! हे प्रखर मीमांसक आणि तत्कालीन पंडितांचे मुकुटमणि होते. पण मीमांसक असल्यानें अद्वैताशीं त्यांचें वांकडें होतें. त्यांना जर वादांत पराभूत केलें, तर 'प्रधान मल्ल निबर्हण' न्यायानें इतर सर्व पंडितांना आपोआप जिंकल्यासारखें होणार होतें. असा एक मोहरा अद्वैताचा पक्षपाती झाला, तर आचार्यांचा पक्ष उभ्या भारतांत अद्वितीय ठरणार होता. त्यांच्या तत्त्वज्ञानाला एक महान् प्रचारक भेटणार होता.

मण्डनमिश्राची भार्या भारती. ती म्हणजे साक्षात् सरस्वतीच. तें दांपत्य म्हणजे 'समसमासंयोग' होता. शोणनदाच्या तीरावर राहणाऱ्या विष्णुमित्र नांवाच्या ब्राह्मणाची ही कन्या. तिचें माहेरचें नांव अंबा होतें. मण्डनमिश्रांची पत्नी होऊन तिनें गृहस्थाश्रम हा विद्याश्रम बनविला होता.

आचार्य त्यांच्या घरीं गेले, तेव्हां त्यांचें स्वागत नाखुषीनेंच झालें. कारण संन्यासी म्हटला, कीं मण्डनमिश्रांना डोकेंदुखी उठत असे. पण हा संन्यासी अन्नभिक्षेला आला नव्हता. त्याला हवी होती ती वादभिक्षा ! हा कोंवळा यति आपल्याशीं शास्त्रार्थ करण्यासाठीं दंड थोपटून आला आहे असें समजतांच मण्डनमिश्र जरा चकितच झाले. पण त्यांनीं तें वादाचें आव्हान स्वीकारलें. आतां प्रश्न आला मध्यस्थाचा. हार-जीत कोणाची याचा निवाडा कोणीं द्यायचा ? आचार्य म्हणाले, 'भारतीदेवीनें या वादांत मध्यस्थ

व्हावें. तिचा निर्णय आपण दोघांनीं मान्य करावा.' या त्यांच्या प्रस्तावानें तर मंडनमिश्र चकितच झाले. प्रतिस्पर्धी पंडिताच्या पत्नीवर एवढा विश्वास ! छे ! पण आचार्यांचा तो भारतीवरचाच विश्वास नव्हता; तर तो आत्मविश्वासहि होता. उभयानुमतें भारती मध्यस्थ ठरली. आचार्यांनीं वादाचा उपक्रम म्हणून आपली अद्वैतपर प्रतिज्ञा मांडली.

"या जगांत ब्रह्म हीच एक सत्, चित्, निर्मल व यथार्थ वस्तु आहे. ब्रह्म हेंच जगद्रूपानें भासित होतें. त्या ब्रह्माच्या ज्ञानानेंच प्रपंचाचा नाश होतो व जीव आत्मरूपीं पैठा होऊन जन्ममरणांतून मुक्त होतो....हीच माझी प्रतिज्ञा ! हाच सिद्धान्त ! यांत मी पराजित झालों, तर काषाय वस्त्रें टाकून गृहस्थाचीं शुभ्र वस्त्रें परिधान करीन !"

मंडनमिश्रांचा सिद्धान्त नेमका याच्या उलट होता. त्यांच्या मतें जीव-ब्रह्म यांचे ऐक्य कशाच्च प्रकारें सिद्ध होणार नव्हतें.

आणि इथूनच वादाला प्रारंभ झाला. दोघेहि आपापलें मत सिद्ध करण्यासाठीं श्रुतींचे आधार सांगूं लागले. प्रत्यक्ष, अनुमान, इत्यादि प्रमाणें आपल्या मताच्या सिद्धीसाठीं पुढें आणूं लागले. तो वाद एका दिवसानें संपणारा नव्हता. कारण, विश्वाच्या मूलभूत सिद्धांतासंबंधींचाच तो वाद होता. जीव, जगत् आणि जगदीश्वर यांचे परस्परसंबंध त्या वादांत ठरायचे होते. विश्व हें सत्य आहे, का तो एक भ्रमाचा बुडबुडा आहे हें त्यांत निर्णयाला यायचें होतें. परमेश्वराची सत्ता आणि त्याचा अधिकार, जीवाचे बंध अन् मोक्ष या सर्वांचेंच समुद्रमंथन व्हायचें होतें. त्यामुळें तो वाद खूप दिवस चालला आणि खूप रंगलाहि.

पण अखेर मण्डनमिश्रांचा पक्ष दुर्बल ठरला. ते निरुत्तर झाले. त्यांना आचार्यांचा अद्वैत सिद्धान्त खोडून काढतां आला नाहीं. भारती निर्णय देण्यासाठीं बसली होती. तिनें आपलें कार्य निःपक्षपातानें केलें. तिनें आचार्यांचा जय आणि आपल्या पतीचा पराजय घोषित केला. आतां आचार्य आपली बैठक सोडणार, इतक्यांत ती त्यांना म्हणाली.

"आचार्य ! तुम्हांला जय मिळाला खरा; पण तो अर्धाच मिळाला आहे हें लक्षांत ठेवा. मी त्यांची भार्या. त्यांचें अर्धांग. मी अजून 'अजिता' आहें. माझा जेव्हां तुम्ही पराभव कराल, तेव्हांच तुम्ही पूर्ण विजयी व्हाल !"

आचार्य म्हणाले, ‘ठीक आहे; मी सिद्ध आहें.’ पण भारतीनें त्यांच्यापुढें कूट प्रश्न टाकले, ते वेदान्तशास्त्रांतले नव्हते; तर कामशास्त्रांतले होते. शंकराचार्य हे ब्रह्मचारी अन् ब्रह्मचर्यांतूनच संन्यस्त झालेले. त्यांना कामशास्त्राची गंधवार्ताहि नव्हती. ते त्या मांडवाखालूनहि गेले नव्हते. पण विजय मिळवायचा तर भारतीच्या पूर्वपक्षांना उत्तर देणेंच भाग होतें म्हणून मग त्यांनीं सहा महिन्यांची तिच्याकडून मुदत मागून घेतली.

लगेच ते तिथून निघाले. काय करावें, कसें करावें, असा विचार करीत ते रानांतून चालले होते. त्याच वेळीं अमरुक नांवाचा एक राजा शिकारीला आला असतां अचानक मूर्च्छा येऊन रानांतच मरून पडला होता. आचार्यांच्या मनांत चटकन् एक कल्पना स्फुरली. त्यांनीं योगबलानें त्या राजाच्या मृत शरिरांत प्रवेश केला.

आचार्यांचा आत्मा त्या थंडगार मृत देहांत प्रवेशतांच तो राजा उठून बसला. लगेच आपल्या राज्यांत परत आला. राणीला वाटलें, कीं आपला पतीच आला. इथें देह फक्त पतीचा आहे; पण त्यांतला आत्मा दुसराच आहे हें तिला कळलें नाहीं. म्हणून राणीनें त्याच्याशीं आपले भोगशृंगार निस्संकोच चालू केले. आचार्य तिथें सहा महिन्यांतच कामशास्त्रांत पारंगत झाले. त्यानंतर त्यांनीं राजदेह सोडला. ते परत आत्मदेहांत प्रविष्ट झाले. तिथून सरळ मण्डनमिश्रांच्या घरीं आले. भारतीच्या प्रश्नांचीं त्यांनीं समर्पक उत्तरें दिलीं अन् तिला कुंठित केलें. मग तिनें आचार्यांचा संपूर्ण विजय मान्य केला.

आतां मण्डनमिश्रांना आपली पूर्व प्रतिज्ञा खरी करणें भाग पडलें. मग त्या कामीं त्यांनीं कोणतीहि सबब पुढें आणली नाहीं. लगेच भगवीं वस्त्रें धारण करून ते संन्यासी झाले आणि आचार्यांना म्हणाले,

**‘शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्!’**

आचार्यांचा तो विजय तर मोठा होताच; पण मंडनमिश्रांचा तो पराजयहि मोठा होता, प्रशंसनीय होता. आचार्यांनीं प्रसन्न मनानें त्यांना दीक्षा दिली आणि त्या आश्रमांतलें त्यांचें ‘सुरेश्वराचार्य’ असें नांव ठेवलें.

मण्डनमिश्रांच्या या पराजयामुळें उत्तर भारतांतील सर्व पांडित्य आचार्यांच्या चरणीं विनम्र झालें. थोड्याच कालांत उत्तर भारतांत अद्वैताचे भेरी–नगारे दुमदुमूं लागले. आचार्य मग तिथून दक्षिणेकडे निघाले. सुरेश्वराचार्यहि त्यांच्याबरोबर होतेच. ते प्रथम महाराष्ट्रांत येऊन पंढरपूरला कांहीं दिवस राहिले. तिथून पुढें श्रीशैलावर गेले. श्रीशैल हें बारा ज्योतिर्लिंगांतलें महत्त्वाचें क्षेत्र असलें, तरी त्याकाळीं कापालिक मताच्या लोकांनीं तिथें आपला अड्डा जमवला होता. ते शंकराचे उपासक खरे; पण त्याच्या भैरव रूपाचे. त्यांची ती उपासना अघोरी होती. वैदिक मार्गाला विरोधी होती. ते आपल्या दैवताला नरबलीहि समर्पीत होते. आचार्यांनीं कांहीं काळ तिथें क्षेत्रवास करून त्या कापालिकांचा अड्डा मोडून काढला. जनतेच्या मनावर त्यानीं धाक बसवला होता तो दूर केला.

तिथून ते शृंगेरीला गेले. तिथें एक मंदिर निर्माण करून त्यांत शारदाम्बेची प्रतिष्ठापना केली. पुढें शृंगेरी हेंच आचार्यांनीं आपल्या विधायक कार्याचें मुख्य केन्द्र बनवलें. आचार्यांना त्यांचा तिसरा शिष्य हस्तामलक हा प्रयागमध्येंच भेटला होता. चौथा तोटकाचार्य शृंगेरीला भेटला. हे चार शिष्य म्हणजे त्यांच्या अद्वैत प्रासादाचे चार खांब ठरले.

शृंगेरीची सारी व्यवस्था त्यांनीं सुरेश्वराचार्यांवर सोंपविली. एवढ्यांत त्यांना बातमी कळली, कीं आपली माता सुभद्रांबा मृत्युशय्येवर पडली आहे. म्हणून मग लगबनीनें त्यांनीं आपल्या जन्मभूमीकडे प्रयाण केलें. थोड्याच कालांत ते कालडीच्या आपल्या घरीं पोंचले. आपल्या पुत्राची तेजःपुंज मूर्ति अचानक समोर उभी राहिलेली पाहून त्या माऊलीचें वात्सल्य अनावरपणें खळाळलें. ती क्षीण अन् कंपित स्वरांत बोलली.

" आलास बाबा ? मी तुझ्यासाठीं डोळ्यांत प्राण सांठवून बसलें होतें. आतां सुखानं मरेन ! "

तीनशें वर्षांपूर्वीं समर्थ रामदास आईच्या अखेरीच्या भेटीस घरीं आले, तशा प्रकारची ही त्याहि आधींची मायलेकरांची भेट होती. सुभद्राम्बेनें मुलाला जवळ बसवून त्याचा सगळा प्रवासवृत्तांत विचारून घेतला. आचार्यांनीं आपलें अद्वैत मत अन् त्याच्या प्रचारासाठीं केलेले दिग्विजय आईल

निवेदिले. थोडक्यांत आपल्या सिद्धान्ताची रूपरेषा तिला समजावली. तें सगळें ऐकून ती म्हणाली.

"मला तुझं तें अद्वैत बिद्वैत कांहीं कळत नाहीं. 'भक्तीचं कांहीं असलं तर मला ऐकव."

त्यावर शंकराचार्यांनीं भुजंगप्रयात छंदांत दक्षिणामूर्ति शंकराचें एक भावपूर्ण स्तोत्र रचून तिला ऐकवलें. म्हातारी तें ऐकून सद्‌गदित झाली. आणि मग तिनें थोड्याच काळांत इहलोक सोडला. आचार्य तिच्या अंत्य-संस्काराच्या तयारीला लागले. त्यांनीं जवळपासच्या लोकांना बोलावणें धाडलें; पण कोणी जिता जीव त्यांच्या घराकडे फिरकला नाहीं. संन्याशानें मातेचा अंत्यसंस्कार करणें त्यांच्या मतें धर्मबाह्य वर्तन होतें आणि त्या पातकांत ते धर्ममार्तंड वांटेकरी होऊं इच्छित नव्हते. आचार्यांच्या पुढें मोठा पेंच निर्माण झाला. पण तरीहि ते डगमगले नाहींत. त्यानीं आपल्या मातेचें प्रेत एकट्या-नेंच उचललें आणि बाहेरच्या दरवाज्याजवळ आणून तिथेंच त्याला अग्नि दिला. आपल्या दायादांच्या या कठोर आणि हृदयशून्य वर्तनाचा त्यांना क्रोध आला. ते आपल्या जातिब्राह्मणांना उद्देशून शापवाणी वदले.

"ज्याप्रमाणें मला घराच्या दारांतच मातेचा अग्निसंस्कार करावा लागला, त्याचप्रमाणें तुम्हींहि आजपासून तसेंच कराल! तुमच्या घराच्या आवारांतच तुमचें स्मशान राहील!"

ही शापवाणी खरी ठरलेली आजहि आपल्याला दिसते. कारण नम्पूतिरि ब्राह्मण आपल्या घराजवळच प्रेतें जाळतात.

मातेच्या मृत्यूनंतर आचार्य पुनश्च संचाराला निघाले. फिरत फिरत काश्मीरांत प्राप्त झाले. तिथें शारदेचें एक मंदिर असून त्यांत 'सर्वज्ञपीठ' नांवाचें एक आसन होतें. जो सर्वज्ञ असेल त्यानेंच त्या पीठावर आरोहण करावें असा त्याच्यामागें संकेत होता. त्या शारदामंदिराला चार दरवाजे होते. तीन दरवाजे उघडे असत; पण चौथें दक्षिणद्वार मात्र सदैव बंद असे. त्यांतला सूचित अर्थ असा होता, कीं भारताच्या दक्षिण दिशेला कोणी सर्वज्ञ निपजलाच नाहीं. म्हणून हें दक्षिणद्वार बंद ठेवावें लागलें आहे. दाक्षिणात्यांच्या नांवावरचा हा कलंक आचार्यांना सहन झाला नाहीं. त्यांनीं तो धुवून

काढायचें ठरवलें. त्यांनीं त्या दक्षिणद्वारावर धडक देऊन तें सताड उघडलें. त्यासरशीं तिथली सर्व पंडितमंडळी आचार्यांवर तुटून पडली. आचार्य म्हणाले,

" नुसता गिल्ला करूं नका. वादासाठीं पुढें या."

मग ते काश्मीरी पंडित आचार्यांशीं सामना द्यायला उभे राहिले आणि अखेर सर्वच्या सर्व पराभूत झाले. आचार्यांची सर्वज्ञता सिद्ध झाली. लगेच पुढें होऊन ते मंदिरांतल्या सर्वज्ञ पीठावर चढूं लागले. पण त्याच क्षणीं शारदेची आकाशवाणी झाली.

" या पीठावर आरूढ होण्याला केवळ सर्वज्ञताच पुरेशी नाहीं. त्याच्या जोडीला पवित्रताहि हवी ! "

आचार्यांनीं त्या आकाशवाणीला तितक्याच खणखणीत शब्दांत उत्तर दिलें.

" मी जितका सर्वज्ञ आहें त्याहून कणभर अधिकच पवित्र आहें. मला या पीठावर आरूढ होण्याचा सर्व अधिकार आहे."

आणि दुसऱ्याच क्षणीं आचार्यांनीं त्या पीठावर आरोहण केलें. या घटनेनें काश्मीर देशांत त्यांच्या विजयाची पताका उंच होऊन फडकली.

शंकराचार्य तिथून पुढें नेपाळांत गेले. नेपाळ हें पशुपतिनाथाचें अनादि पुण्यक्षेत्र. पण त्याकाळीं तें बौद्ध धर्माचें एक प्रधान केन्द्र बनलें होतें. बौद्धांच्या प्राबल्यानें पशुपतिनाथ उपेक्षित झाला होता. आचार्यांनीं तिथल्या बौद्धपंडितांचा पराभव करून त्यांच्या तावडींतून त्या क्षेत्राची मुक्तता केली. पशुपतिनाथाची वैदिक पद्धतीनें अविछिन्न पूजा-अर्चा चालेल, अशी व्यवस्था करून आणि तिथें एक मठ स्थापून ते तेथून निघाले.

भारतांतली धार्मिक व्यवस्था एकसूत्री, नियमबद्ध आणि अक्षुण्ण राहावी यासाठीं आचार्यांनीं अनेक तीर्थक्षेत्रांत मठस्थापना केली. भारताच्या चारी दिशांच्या चारी धामांत त्यांचे मठ आहेत. हिमालयांत बदरीनाथाजवळ ज्योतिर्मठ आहे. द्वारकेंत शारदामठ आहे. दक्षिणेंत शृंगेरीमठ आहे आणि पूर्वेस पुरी येथें गोवर्धन मठ आहे. प्रत्येक मठावर आचार्यांनीं एकेका खास शिष्याची नेमणूक केली. प्रत्येक मठाचें भौगोलिक क्षेत्रहि ठरवून दिलें. आपापल्या क्षेत्रांतले वर्णाश्रम नीट चालतात कीं नाहीं हें पाहाणें, आपापल्या

क्षेत्रांत संचार करून लोकांना धर्मोपदेश करणें आणि धार्मिक विवादांच्या बाबतींत न्यायनिवाडा देणें हें प्रत्येक मठपतीला आचार्यांनीं नेमून दिलेलें काम होतें. अशा प्रकारानें आचार्यांनीं अखिल भारताची धर्मसत्ता आपल्या हातीं आणली. आचार्य अखिल भारताचे ' धर्मसम्राट् ' बनले.

एवढें सर्व करीपर्यंत आचार्यांच्या आयुष्याचीं बत्तीस वर्षें कृतार्थ झालीं. तीच त्यांच्या जीविताचीहि मर्यादा ठरलेली होती. योगसिद्ध असूनहि आचार्यांनीं त्या मर्यादेचें उल्लंघन केलें नाहीं. त्यासाठीं ते पुनश्च हिमालयांत गेले. वैशाख शुद्ध एकादशीच्या दिवशीं कैलासाच्या पुण्यभूमींत आणि शिवशंकराच्या सान्निध्यांत त्यांनीं आपल्या नश्वर शरीराचा त्याग केला. निर्विकल्प समाधीचा आश्रय करून ते ब्रह्मपदीं विराजमान झाले. धरातलावर अवतीर्ण झालेला परमात्म्याचा हा तेजोरूप अंकुर जगाला धर्मप्रकाश देऊन पुनश्च मूळ ज्योतींत समाविष्ट झाला.

शंकराचार्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले आणि अनेक ग्रंथ त्यांच्या नांवावर चढले अन् खपले. या ग्रंथसंभारांतून आचार्यांचे ग्रंथ नेमके कोणते तें निवडून काढणें ही एक मोठी जटिल समस्या आहे. आजवर अनेक पंडितांनीं या बाबतींत संशोधन करून आपापलीं मतें मांडलीं आहेत. आचार्यांची रचना आणि भाषाशैली अत्यंत प्रौढ अन् सुबोध अशी आहे. त्यांचें लिहिणें जितकें स्वाभाविक तितकेंच प्रासादिक ! हें एक अंतर्गत प्रमाण ध्यानांत घेऊन संशोधकांनीं आचार्यांचे म्हणून कांहीं ग्रंथ वेगळे काढले आहेत. त्या ग्रंथांचे तीन विभाग पडतात.

पहिला विभाग प्रस्थानत्रयीवरच्या भाष्यांचा. यांत ब्रह्मसूत्रें, गीता आणि उपनिषदें यांचीं भाष्यें येतात. हा विभाग संशयातीत आहे. या शिवाय विष्णुसहस्रनाम, सनत्सुजातीय, ललितात्रिशती आणि माण्डूक्यकारिका या ग्रंथांवरहि आचार्यांचीं भाष्यें आहेत. हा दुसरा विभाग. त्यांची स्तोत्ररचनाहि विपुल आहे. हा तिसरा विभाग. आचार्य हे परमार्थतः अद्वैतवादी खरे; पण व्यवहाराच्या भूमिकेवर त्यांनीं नाना दैवतें मानलीं आहेत आणि त्यांच्या उपासनेलाहि महत्त्व दिलें आहे. निर्गुणाची उपलब्धि होण्यासाठीं सगुणो-पासना हें एक मुख्य साधन आहे, असें ते मानीत. एखादा साधक प्रथम सगुण ईश्वराची उपासना न करतां एकदम निर्गुण ब्रह्माला झोंबण्याचा प्रयत्न

करील, तर त्याला तें ब्रह्म कधींहि गवसणार नाहीं अशी त्यांची धारणा होती. आचार्यांची स्वतःची अशी एक सगुणोपासना शेवटपर्यंत होतीच. ते तिच्या पलीकडे गेलेले असूनहि लोकसंग्रहासाठीं ते ती उपासना चालवीत.

आचार्यांच्या ठिकाणीं क्षुद्र आणि संकुचित सांप्रदायिकतेला कधींच थारा नव्हता. त्यांच्या काळांत शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त आणि सौर हे प्रमुख संप्रदाय भारतांत वावरत होते. त्यांच्यांत परस्पर हेवेदावे आणि तंटे-बखेडेहि चालू होते. उपास्य देवतेच्या कारणानें समाजांत तट पडून दुही माजणें हें हिताचें नव्हे, यासाठीं त्यांनीं एक नामी युक्ति शोधून काढली. त्यांनीं या पांचहि दैवतांना एका संपुष्टांत आणून बसवलें. पांचांचाहि आध्यात्मिक समन्वय केला. यालाच ‘ पंचायतन ’ असें म्हणतात. प्रत्येकानें आपल्या मुख्य आराध्य दैवताला मध्यें बसवून त्याच्याभोंवतीं चारी कोपऱ्यांनीं चार देव ठेवून पांचांचें पंचायतन मांडावें असें त्यांनीं सांगितलें. ही पंचायतनपूजा भारतांत सर्वत्र मान्य झाली आणि आजमितीसहि ती सगळीकडे रूढ आहे. आचार्यांच्या पुढच्या काळांत भारतांत पुष्कळ ठिकाणीं मंदिररचनाहि पंचायतन पद्धतीवरच झालेली दिसून येते.

शंकराचार्यांनीं अनेक दैवतांवर सुंदर आणि हृदयंगम स्तोत्रें रचलेलीं आहेत. बुद्धीच्या प्रखर धारेनें पुढें येईल त्या सिद्धान्ताचें अन् मताचें विच्छेदन करणारा, सर्व विचार बुद्धिवादाच्या निकषावर घांसून घेणारा हा महातार्किक पुरुष स्तोत्ररचना करतांना इतका मऊ, इतका कोंवळा, इतका भावस्निग्ध आणि इतका अनन्यशरण होत असलेला पाहून खरोखर आश्चर्य वाटतें. या निकराच्या अद्वैती तत्त्वज्ञानें आपल्या भावसुखाच्या पूर्तीसाठीं जें देव-भक्तांमधलें काल्पनिक द्वैत निर्माण केलें आहे, त्यांत विलक्षण भक्तीचा जिव्हाळा भरलेला आहे. या भूमिकेवर शंकराचार्यांना पाहिलें कीं, तुकोबांच्या एका अभंगाची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं—

> **“ अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान**
> **गोड हे चरणसेवा तुझी ”**

‘ अहं ब्रह्मास्मि ’ या महावाक्याचा साक्षात्कार जागेपणीं आणि निजेलेंणींहि अविच्छिन्न अनुभवणारे शंकराचार्य; पण भक्तीच्या उद्यानांत प्रविष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........ ७७
नों. दि: ........

झाल्यावर त्यांचा हा ब्रह्मरूप 'कोऽहं' परमेश्वराच्या चरणांवर लीन होऊन कसा लोळण घेत आहे, तें पाहायचें असेल तर त्यांचें 'षट्पदी' हें एकच स्तोत्र पाहावें—

अविनयमपनय विष्णो
   दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम् ।
भूतदयां विस्तारय
   तारय संसारसागरतः   १

दिव्यधुनीमकरन्दे
   परिमलपरिभोगसच्चिदानन्दे
श्रीपतिपदारविन्दे
   भवभयखेदच्छिदे वन्दे   २

सत्यपि भेदापगमे
   नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्
सामुद्रोहि तरङ्गः क्वचन
   समुद्रोहि तारंगः   ३

उद्धृतनग नगभिदनुज
   दनुजकुलामित्र मित्रशशिदृष्टे
दृष्टे भवति प्रभवति
   न भवति किं भवतिरस्कारः ४

मत्स्यादिभिरवतारै
   रवतारवताऽवता सदा वसुधाम्
परमेश्वर परिपाल्यो
   भवता भवतापभीतोऽहम्   ५

दामोदर गुणमन्दिर
   सुन्दरवदनारविन्द गोविन्द
भवजलधिमथनमन्दर
   परमं दरमपनय त्वं मे   ६

**नारायण करुणामय**
**शरणं करवाणि तावकौ चरणौ**
**इति षट्पदी मदीये**
**वदनसरोजे सदा वसतु ७**

या स्तोत्राचा सारांश असा — हे विष्णो ! तूं माझा अविनय दूर कर. माझ्या मनाला दमव. अंतरांतल्या विषयांच्या मृगतृष्णेला शमव. माझ्या ठिकाणीं भूतदया वाढव आणि मला संसारसागरांतून तारून ने. मी भव-भयाची खिन्नता छेदून टाकणाऱ्या श्रीपतीच्या चरणकमलाला वंदन करतों. हे नाथ ! तुझ्या माझ्यांत लवमात्र भेद नाहीं हें खरें; पण तरीहि मी तुझा बनलेला आहें आणि तूं मात्र माझा बनलेला नाहींस. याला दृष्टांत सागर आणि तरंग यांचा. सागर अन् तरंग यांत मुळींच भेद नाहीं. पण तरंग सागरावर उठतो; पण सागर मात्र तरंगावर उठत नाहीं. हे दामोदरा, गुणमंदिरा ! माझें भवतापभय तूं दूर कर. करुणामया ! यासाठींच मी तुझ्या चरणीं शरण आलों आहें.

याशिवाय विवेकचूडामणि, शतश्लोकी, वाक्यसुधा, उपदेशसहस्री, इत्यादि अनेक प्रकरणग्रंथ आचार्यांनीं लिहिले आहेत. हे ग्रंथ वेगवेगळ्या वेदान्त विषयांचे प्रतिपादक असल्यामुळें त्यांना ‘ प्रकरण ग्रंथ ’ असें म्हणतात. आपला अद्वैत वेदान्त विद्वानांच्या वर्तुळांतच घुटमळत राहूं नये, तर तो सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोंचावा, या उद्देशानें या मनोरम साहित्याची रचना झाली आहे.

आचार्यांनीं आपल्या दिव्य प्रतिभेनें आणि मूलग्राही पांडित्यानें जो अद्वैत सिद्धान्त प्रस्थापित केला, त्याचा मूलमंत्र हा—

**‘ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ’**

( १ ) ब्रह्म हेंच सत्य अत एव त्रिकालाबाधित आहे,
( २ ) हें दृश्य जग मिथ्या म्हणजे मायिक आहे,
( ३ ) जीव हा तत्त्वतः ब्रह्मच आहे, आणि
( ४ ) जीव हा ब्रह्माहून कोणत्याहि प्रकारें भिन्न नाहीं.


हे चार सिद्धान्त आचार्यांच्या अद्वैत वेदान्ताच्या इमारतीचे चार खांब होत.

अद्वैतवाद हा भारतांतील एक प्राचीन सिद्धान्त आहे. हा उपनिषदांत तर स्पष्ट दिसतोच; पण त्याहि आधीं ऋग्वेदांतसुद्धां याचें सूक्ष्म दर्शन घडतें. अद्वैतवाद ही वैदिक ऋषींची आध्यात्मिक जगाला अमोलिक अशी देणगी आहे. याच अद्वैतपर श्रुतींच्या पायावर आचार्यांनीं आपल्या अद्वैत वेदान्ताची टोलेजंग इमारत उभी केली. नामरूपांनीं भरलेलें जग हें सत्य नसून काल्पनिक आहे हें सिद्ध करून दाखविण्यासाठीं आचार्यांनीं ज्या मायावादाचा स्वीकार केला, तो मायावादहि त्यांचे आजेगुरु आचार्य गौडपाद यांच्या-कडूनच त्यांना मिळाला आहे. यावरून शंकराचार्यांचा मायावाद म्हणजे बौद्ध तत्त्वज्ञानाचें औपनिषदिक संस्करण आहे, असें जें कांहीं पंडित प्रतिपादन करतात, तें निर्मूल वाटतें.

वैदिक धर्माची प्रतिष्ठा आणि प्रचार हेंच आचार्यांच्या जीवनाचें परम ध्येय होतें. आपण केलेली धर्मजागृति सदैव टिकून राहावी यासाठीं त्यांनीं एक मोठा थोरला यतिसंघ स्थापन केला. गृहस्थाश्रम हा श्रेष्ठ खरा; पण गृहस्थाला आपल्याच प्रापंचिक उपाधींत गुंतून पडावें लागतें आणि त्यामुळेंच त्याला धर्मप्रचारासाठीं अवकाश मिळणें दुर्लभ होतें. जो विद्वान् आहे आणि ज्याला कसलेच लागेबांधे उरले नाहींत, असा विरक्त संन्यासीच तें कार्य करूं शकेल. आचार्यांनीं संन्यासाला प्राधान्य दिलें तें यासाठीं. त्यांनीं आग्रहानें विद्वत्संन्यास प्रतिपादिला, तो संन्यस्त पुरुषानें 'नारायण नारायण' म्हणत निष्क्रिय बसून राहावें आणि समाजाला भारभूत व्हावें म्हणून नव्हे, तर त्यानें अविरत संचार करून धर्मस्थापनेचें महत्कार्य करावें, विचारप्रदानानें जनतेचें मन संपन्न आणि संस्कारित करावें म्हणून. त्यांचें स्वतःचें जीवनच या गोष्टीला साक्षीदार आहे.

आणि या सर्व दृष्टींनीं केरळाच्या भूमींत अवतार घेतलेल्या या भगवत् पूज्यपाद शंकराचार्यांचे भारतवर्षावर अनंत उपकार आहेत.

* * *



# केरळसंस्कृति......

जातिसंस्था ही भारतांतल्या सर्व सामाजिक संस्थांमध्यें बलवत्तर अशी संस्था आहे. भारतीय समाज भिन्न भिन्न जाती-जमातींत विभागलेला आहे. हिंदूंची बहुसंख्या असलेला हा देश. 'हिंदुस्थान' हेंच याचें नांव. पण आपण एकमेकांना हिंदु म्हणून न ओळखतां कोणत्यातरी जाती-पोटजातीं-वरूनच ओळखीत असतों. हिंदुत्व किंवा भारतीयत्व हें जणूं गौण ! ब्राह्मण, क्षत्रीय, साळी, माळी, न्हावी, धोबी, सुतार, लोहार, असा कोणी तरी असल्याशिवाय केवळ हिंदु म्हणून आपल्याला समाजांत कुठें स्थानच नाहीं. आपण जातीला 'जातगंगा' म्हणून गौरवतों. जातीचाच आग्रह किंवा अभिनिवेश बाळगतों.

जातिसंस्थेची परंपरा भारतांत फार प्राचीन आहे. तिनें आपल्या आवश्यांत वंशपरंपरेनें विद्या-कलांची, कारागिरीची जपणूक केली, हें तिचें शुभ लक्षण आणि एखाद्या खाष्ट सासूप्रमाणें तिनें व्यापक राष्ट्रीय भावनेची वाढ खुंटवून टाकली, हें तिचें अवलक्षण !

भारताच्या संस्कृतीचा विचार करतांना हीं दोन्ही लक्षणें डोळ्यांपुढें ठेवावीं लागतात. केरळाच्या बाबतींत तीच गोष्ट लागू आहे. तिथल्या संस्कृ-तीचा परिचय करून घ्यायचा असेल, तर तिथली जातिप्रथा दृष्टिआड करून चालणार नाहीं. केरळांतल्या प्रमुख जाती दोन. नम्पूतिरि हे ब्राह्मण आणि नायर हे अब्राह्मण. इतर अनेक जाती-पोटजाती या दोघांच्या मध्यें येतात, म्हणूनच त्यांना 'अंतराळ जाती' अशी संज्ञा दिलेली आहे. याशिवाय तिथें दोन वेगळ्या प्रकारच्या कुटुंबसंस्था नांदतात. एक पितृपरंपरेनें चालणारी

आणि दुसरी मातृपरंपरेनें चालणारी. त्यांत पुन्हा या दोन्ही पद्धतींचे लागेबांधे एकमेकांत गुंतलेले. त्यामुळें केरळाच्या संस्कृतीला एक आगळें वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे. त्याच कारणानें कांहीं वेगळीं सुखदुःखेंहि त्यांच्या वांट्याला आलीं आहेत.

नम्पूतिरि ब्राह्मण हे मूळ उत्तरेकडचे. तिथून सह्याद्रीचा घाट उतरून वसाहतीसाठीं तिकडे गेलेले, जसे बुद्धिमान् तसेच कर्तबगार. आपल्या श्रेष्ठत्वाच्या कल्पना आणि संस्कृतीच्या विशिष्ट विचारधारा घेऊन ते तिथें गेले होते. त्यामुळें तिथल्या स्थानिक समाजापासून कांहीं काळ ते अलगच राहिले. आपलें वेगळेपण टिकवून धरण्याचा त्यांनीं खूप प्रयत्न केला. पण तसें



नम्पूतिरि ब्राह्मण

करण्यांत त्यांच्या महत्त्वाकाक्षांना पायबंद बसूं लागला. आपल्या महत्त्वाकांक्षा सफळ करायच्या असतील, तर स्थानिक लोकांशीं दळणवळण वाढवलें

पाहिजे, त्यांच्या संस्कृतिशीं मिळतें-जुळतें घेतलें पाहिजे, हें त्यांना कालांतरानें कळून चुकलें. त्यांनीं हळूहळू आपल्या जातीय जीवनाला तसें वळण लावलें. तिथल्या जनतेशीं शक्य तेवढें समरस होऊन त्यांनीं आपल्या महत्वाकांक्षेची वाटचाल सुरू केली. केरळाच्या धार्मिक जीवनावर हळूहळू त्यांचा प्रभाव पडूं लागला. आपल्या शक्ति-बुद्धींच्या बळावर केरळाच्या राजकारणांतहि ते घुसले. शतकानुशतकें त्यांनीं तिथल्या राजकारणाचीं सूत्रें आपल्याला हवीं त्याप्रमाणें खेळवलीं. 'इदं ब्राह्ममिदं क्षात्रम्' या द्रोणाचार्यांच्या विजिगीषु वृत्तीनें ते वागले. त्यांनीं शास्त्र तर संभाळलेंच; पण प्रसंगीं शस्त्रहि धरलें. कधीं गोड बोलून, तर कधीं दमदाटी करून राजकारणांत आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें. सत्ता आणि मत्ता या दोहींचाहि 'लाहो' घेतला. पंधराव्या शतकापर्यंत केरळच्या राजनीतीचा गोवर्धन पर्वत त्यांनींच आपल्या करांगुळीवर उचलून धरला होता. पोर्तुगिजांचा पाय केरळाच्या भूमीला लागेपर्यंत तिथल्या समाजावरचें नम्पूतिरींचें वर्चस्व अबाधित राहिलें होतें. त्यानंतर एकामागून एक असे अनेक पाश्चात्य देश केरळाच्या बंदरांत उतरले आणि त्या सर्वांनीं मिळून नम्पूतिरींच्या वर्चस्वावर घाव घातला. त्यामुळें नम्पूतिरींची सद्दी संपली.

उत्तरेकडील आर्यपद्धतीप्रमाणें नम्पूतिरींची कुटुंबसंस्था पितृसत्ताक आहे. मात्र मलयाळम् भाषेंत 'इल्लम्' असें तिचें स्थानिक नामकरण झालें आहे. आपल्या इकडे सगळ्या भावांना बापाच्या मिळकतीचा समान वांटा मिळतो. म्हणजे वडिलार्जित स्थावर-जंगमाची विभागणी होते, पण इल्लम्मध्यें तसें नाहीं. त्यांत फक्त थोरला मुलगाच पैतृक संपत्तीचा एकमेव वारस होतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही, कीं त्या थोरल्या मुलालाच फक्त जातींतल्या मुलीशीं लग्न करतां येतें. मग बाकीच्या भावांनीं आजन्म नैष्ठिक ब्रह्मचर्यच पाळायचें का? नाहीं. त्यांनीं नायरांच्या मुलींशीं 'संबंधम्' करावें. संबंधम् म्हणजे वैदिक संस्काराशिवाय केलेलें लग्नच; पण तें जातीच्या बाहेर होत असल्यामुळें त्याला लग्न न म्हणतां 'संबंधम्' म्हणायचें. मात्र संबंधम्ला विभक्त होण्याची, संबंध तोडून टाकण्याची मोकळीक आहे.

लग्न आणि संबंधम् यांत आणखी एक मोठाच फरक आहे. जातींतली मुलगी लग्न झाल्यावर पतीच्या घरीं गृहप्रवेश करते. लग्नानें घरांत एक माणूस कायमचें

वाढतें. पण संबंधमूची वधू नवऱ्याच्या घरीं गृहप्रवेश करीत नाहीं. नवऱ्याच्या उपरण्याला तिच्या पदराची गांठ मारली गेली, तरी ती माहेरींच राहते. सदाची अन् जन्माची. तिच्या पोषणाची जबाबदारी नवऱ्यावर कधींच पडत नाहीं. ती व्यवस्था तिच्या माहेरच्या उत्पन्नांतून आणि कायद्यानें होत असते. वर्षाला लागणारें तेल आणि दोन साड्या पतिराजांनीं तिला दिल्या, कीं त्यांची जबाबदारी संपली.

संबंधमू झाल्यावर नवऱ्यामुलाचीच तिच्या घरीं घरभरणी होते. त्यामुळें मूळ कुटुंबांत भर पडत नाहीं. खातीं तोंडें वाढत नाहींत. कुटुंबाची मालमत्ताहि विभागली जात नाहीं. मोठा मुलगा मिळकतीचा सर्वाधिकारी असल्यामुळें इल्लमूमध्यें त्याला मोठाच मान असतो. तोच धाकट्या बंधूंचें आणि मुलाबाळांचें भरणपोषण करतो. सगळ्या घरावर देखरेख त्याचीच. इल्लमूमधलें देवघर आणि होमशाळा तोच चालवतो. संस्कार आणि वार्षिक सण, उत्सव यांच्यासाठीं तोच आपल्या गंगाजळींतून सगळा खर्च करतो. त्या घरांत त्यालाच एकट्याला शयनगृह असतें. सर्व व्यवहार त्याच्याच हातीं राहतात.

नम्पूतिरींच्या धार्मिक समजुती बऱ्याच तीव्र आहेत. सोवळ्या ओवळ्याचेंहि प्रस्थ बरेंच आहे. ते घरांतल्या मुलांमुलींना कडक शिस्तींत वागवतात. स्त्रियांच्या बाबतींत त्यांच्या कल्पना अगदीं मनुप्रणीत आहेत. म्हणूनच नम्पूतिरि बायकांना पडदा पाळावा लागतो. बाहेरच्या माणसांना तर त्यांचें श्रीमुख दिसतां कामा नयेच; पण घरांतल्या दिरांनींसुद्धा वर मान करून त्यांच्याकडे पाहातां कामा नये. ती लक्ष्मणाची गोष्ट सांगतात ना ! जानकीचे सगळे दागिने कांहीं त्याला ओळखतां आले नाहींत. त्यानें फक्त तिच्या पायांतलीं नूपुरें तेवढीं ओळखिलीं. कारण त्याचें दर्शन सीतेच्या पायांपुरतेंच मर्यादित होतें. नम्पूतिरि बायकांच्या बाबतींतहि घरांतल्या पुरुषांना हीच मर्यादा आहे. बाहेर पडतांना आणि रस्त्यांतून चालतांना त्या शिरावर ताडपत्री छत्री घेतात, ती उन्हापावसापासून रक्षण व्हावें म्हणून नव्हे; तर जनांपासून आपला मुखडा लपला जावा म्हणून ! अजूनहि या स्त्रियांचा आधुनिक संस्कृतीशीं विशेषसा संपर्क आलेला नाहीं. त्यांच्या पातिव्रत्याला जराशीसुद्धा चीर पडूं नये, म्हणून ते लोक सारखे जपत असतात. त्यांतूनहि एखाद्या स्त्रीचें पाऊल वांकडें पडलेंच, तर तिला कठोर सामाजिक शिक्षा भोगावी

लागते. महाराष्ट्रांतली स्त्री हरिभाऊ आपट्यांच्या काळांत ज्या पद्धतीचें जीवन जगत होती, तशाच प्रकारचें जिणें नम्पूतिरि स्त्रीला या आधुनिक युगांतहि जगावें लागतें.

आपल्याकडे लग्नाच्या आधीं वाङ्‌निश्चय, सीमांतपूजन हे विधि करतात. पण नम्पूतिरि ब्राह्मणांत एक विधि अधिक आहे. त्याचें नांव ' मुखदर्शन. ' लग्न ठरल्यावर मगच वरानें वधूचें मुख पाहायचें असतें. त्या आधीं नाहीं. नम्पूतिरींत बहुपत्नीकत्वाची चाल आहे. पण पुष्कळ अंशीं हें बहुपत्नीकत्व परिस्थितीनें त्यांच्यावर लादलेलें आहे. कुटुंबांतला मोठा मुलगाच वडिलार्जित संपत्तीचा वारस होत असल्यामुळें तोच एकटा लग्न करूं शकतो. पण स्वतःच्या बहिणी उजवायच्या झाल्या, तर पुष्कळदा त्याला स्वतःचीं तितकीं लग्नें करून घ्यावीं लागतात. कारण ज्याला बहीण सांगून जावें तो म्हणतो, ' माझी बहीण तूं पत्करीत असलास, तर तुझी बहीण मी करतों.' त्यामुळें नम्पूतिरि समाजांत बऱ्याच मुलींना कुंवारच राहण्याची पाळी येते. पुरुषांना नायर मुलींशीं ' संबंधम् ' करतां येतें; पण तसला कोणताहि धर्मशुद्ध मार्ग त्या मुलींना उपलब्ध नाहीं. त्यामुळें अशा मुली बापाच्या घरींच जळत पिचत उभें आयुष्य काढतात. ज्या घरीं जन्मल्या, त्याच घरीं शेवटचा श्वास सोडतात.

नव्या हिंदु कायद्याप्रमाणें नम्पूतिरींवर सक्तीचें एकपत्नीत्व लादलें गेलें आहे. त्यामुळें तर आतां कुंवार मुलींची संख्या वाढतच चालली आहे. त्याच कारणामुळें हळूहळू हा समाज घटत चालला आहे. नम्पूतिरि तरुणांना हा ऱ्हास स्पष्टपणें दिसूं लागला आहे. नव्या युगाचे वारे आतां त्यांच्यांतहि वाहूं लागले आहेत. जातिबाह्य ' संबंधम् ' करण्याऐवजीं जातींतल्याच मुलींशीं विवाहबद्ध होण्याची आकांक्षा त्यांच्यां मनांत बळावत चालली आहे. पण जुन्या माणसांना अजून ती गोष्ट पचनीं पडत नाहीं. त्यामुळें संघर्ष सुरू झाले आहेत. इल्लम् या परंपरागत कुटुंबसंस्थेला धक्के बसूं लागले आहेत. पण कांहीं झालें तरी ज्या जातीनें शंकराचार्यांसारखी अलौकिक विभूति भारताला दिली, त्या जातीचा ऱ्हास थांबलाच पाहिजे असेंच कोणीहि म्हणेल.

केरळांतली दुसरी जात नायरांची. हा समाज केरळांत बहुसंख्य आहे. नायर ही जात नसून एक जमात आहे, असें सरदार पणिक्करांचें म्हणणें आहे.

मेनोन, कुरुप, नम्बियार आणि पणिक्कर या आडनांवांचे नायर हे त्या जमातींतले सर्व बाबतींत अग्रेसर लोक आहेत. नायरांचा अलीकडचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती. कांहीं लोक नम्पूतिरींकडे घरकामालाहि असतात. कांहींनीं सैनिकी पेशाहि पत्करला आहे. इतिहासकाळांत नायरांची घराणीं उत्कर्षाच्या शिखरावर चढलेली दिसतात. कित्येक कर्तबगार नायर पुरुषांनीं राजपदेंहि भूषविलीं आहेत. नायर ही मुळापासून लढाऊ जमात आहे. केरळांत ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत तिथलें लष्कर नायरांचेंच होतें. मलबार मॅन्युएलमध्यें त्यांच्याविषयीं लिहिलें आहे —

'प्राचीनकाळीं केरळ अनेक नाडूंमध्यें विभागलेला होता. या प्रत्येक नाडूचें संरक्षण नायरांकडेच असे. सहाशेंचा एक असे गट करून ते हें संरक्षणाचे कार्य चालवीत. नायरांच्या या सैनिकी संघटनेनें केरळाच्या राजकीय इतिहासांत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तिथले राजे उच्छृंखल झाले किंवा प्रजेला छळूं पिळूं लागले, तर हे नायर सैनिक त्याच्या प्रतिकारासाठीं निर्भयपणें उभे राहत.'

नायरांच्या उत्पत्तीचा इतिहास अद्यापिहि अंधारांतच आहे, पण एवढें धरून चालायला हरकत नाहीं, कीं हे लोक केरळाचे मूळ वसाहतकार होत. पुराणांतले नाग तेच आजचे नायर समजले जातात. पांडवांतल्या अर्जुनानें ज्या अनेक भार्या केल्या, त्यांतली उलूपी ही नागकन्याच आहे. धर्म आणि द्रौपदी यांच्या एकांतांत प्रवेश केल्यामुळें अर्जुनाला तीर्थयात्रा करण्याचें प्रायश्चित्त घ्यावें लागलें होतें. त्या भ्रमंतींत अर्जुन केरळांत आला असतां उलूपी त्याच्या दृष्टीस पडली. अल्पशाच परिचयांत त्यांचीं मनें परस्परांवर जडलीं. मग अर्जुनानें तिचें पाणिग्रहण केलें. पण या प्रकाराला लग्न म्हणण्यापेक्षां 'संबंधम्' म्हणणेंच रास्त ठरेल. कारण लग्न होऊनहि उलूपी अर्जुनाबरोबर सासरीं आली नाहीं, तर जन्मभर माहेरींच राहिली. नागांच्या कुटुंबपद्धतीला धरूनच हें झालें.

या नागांचें म्हणजेच नायरांचें मूलस्थान भारताचें उपखंड ऑस्ट्रेलिया या भागांत कुठेंतरी असावें असें म्हणतात. लंकेंतले गोगिमा आणि केरळांतले नायर यांच्यांत पुष्कळच साम्य आढळतें असें संशोधकांचें म्हणणें आहे.

नायरांची कुटुंबपद्धति पितृप्रधान नसून मातृप्रधान आहे. नायरांत संपत्तीचा वारसा मातृपरंपरेनें चालतो. त्या पद्धतीचें नांव आहे 'मरुमक्कतायम्.' मरु = बहीण, मक्क = मुलगा आणि तायम् = दाय. याचा अर्थ असा, कीं नायर पुरुषाचा वारसा त्याच्या मुलाकडे न जातां बहिणीच्या मुलाकडे म्हणजे भाच्याकडे जातो. राज्य अथवा पौरोहित्य यांचे अधिकारहि मुलाला न मिळतां मुलीकडे जातात म्हणजेच भाच्याला मिळतात. त्रिवांकुर-कोचिनची राजपरंपरा अशाच पद्धतीनें चालत आली आहे.

मातृप्रधान समाजाचीं वैशिष्ट्यें अशीं—या पद्धतींत स्त्री म्हणजे माता ही कुटुंबाचें केंद्र बनते. तिची संतति मातेचें गोत्र सांगते. मुलगी लग्न होऊनहि माहेरींच राहते. तिचा नवराच तिच्या घरीं राहायला येतो. चुलत्यापेक्षां मामाचा अधिकार मोठा असतो. देवदासींची पद्धति अशाच समाजांत निर्माण होते. कन्येच्या प्रथम रजोदर्शनाला महत्त्व असतें. त्यावेळचे संस्कार आणि सोहळे समारंभानें केले जातात.


सांप्रत काळीं अशा मातृप्रधान कुटुंबसंस्था भारतांत मुख्यत्वें केरळ आणि आसाम या दोनच प्रदेशांत रूढ आहेत. आसाममध्यें खासी, सिनतेंग, गारो इत्यादि जमातींत ही प्रथा भिन्न भिन्न वैशिष्ट्यांनीं चालते. केरळांत केवळ नायरांतच ती आहे असें नव्हे; तर थिय्या, मोपला आणि वन्य जमातींतहि आहे.

मातृप्रधान समाजव्यवस्था कशी आणि कां निर्माण होते, त्या विषयीं जगांतील मानववंश-शास्त्रज्ञांत बरेच मतभेद आहेत. कांहींच्या मतें मातृप्रधान कुटुंबाची कल्पना ही पितृप्रधान कुटुंबाच्या आधींची आहे. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत स्त्री-पुरुषांत 'कामचार' चालतो. त्यांतून तो समाज उत्क्रान्त झाल्यावर पाहिली अवस्था येते ती मातृमूलक कुटुंबाची. कारण अपत्याचें मातृत्व हें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध असतें. त्याचें पितृत्व हें मात्र अनुमानाचा विषय ठरतें. मेन या समाजशास्त्रज्ञानें ही कल्पना मांडली आणि अनेकांनीं ती उचलून धरली. पण मेलिनोव्हस्की यानें त्या कल्पनेचा फोलपणा दाखवून दिला आहे. तो म्हणतो कीं, भिन्न भिन्न समाजांत या दोन्ही प्रकारच्या कुटुंबपद्धति जगांत एकाच वेळीं चाललेल्या आढळतात. त्यामुळें समाजांतले कांहीं थर नेहमीं मातृसत्ताच मानीत राहतात, तर कांहीं थरांत कालांतरानें

मातृसत्ताच पितृसत्तेंत परिणित होते. पण हा एकोणिसाव्या शतकांतला सिद्धान्त आतां बाधित ठरला आहे.

केरळांतल्या मातृप्रधान कुटुंबव्यवस्थेची उपपत्ति डिस्ट्रिक्ट मॅन्युएल ऑफ कॅनरा या ग्रंथांत दिली आहे ती अशी—

'नायर जमातीचे लोक प्रारंभीं पश्चिम किनाऱ्यावरच्या डोंगराळ प्रदेशांत वास्तव्य करीत. शिकार हेंच त्यांचें उपजीविकेचें साधन होतें. कालांतरानें ते घाट उतरुन खालच्या सपाट प्रदेशांत आले. पण तरीहि नायर पुरुषांची शिकार सुटली नाहीं. त्यांच्या बायकांनीं मात्र तिथें शेती करायला सुरुवात केली. पुरुष भटके राहिले तरी, स्त्रिया मात्र स्थायिक झाल्या. कष्टानें संपादन केलेल्या शेत-जमिनीवर स्त्रियांचीच मालकी सुरू झाली. आईबरोबर मुलगी राबूं लागली आणि त्यामुळें आईच्या मागून तीच त्या जमिनीची स्वामिनी ठरली. स्थावर संपत्तीचे हे अधिकार पुढें स्त्री–परंपरेनेंच चालूं लागले. पुरुष शिकारी होते; ते पुढें शिपाई बनले. परकी आक्रमणापासून देशाचें रक्षण करण्याचें काम त्यांच्या वांट्याला आलें. राजाचें बोलावणें येतांच त्यांना लढाई-वर जावें लागे. त्यांत कित्येक पुरुष कामास येत; पण स्त्रिया जमिनीचा एखादा तुकडा संभाळून असल्यामुळें धारातीर्थीं पडलेल्या त्या वीरांचीं बायकामुलें वाऱ्यावर पडत नसत. जगून वांचून घरीं आलेल्या पुरुषांनाहि



केरळांतला छत्रीधारी शेतकरी

त्यांच्या बायकाच खायला प्यायला घालीत. याशिवाय त्यांच्यामध्यें एका स्त्रीला अनेक पति वरण्याचीहि मुभा होती. त्यामुळें साहजिकच्च घरदार आणि संपत्ति यांवर स्त्रीचा अधिकार प्रस्थापित झाला. तीच सर्वस्वाची धनीण झाली. वंशपरंपराहि तिच्याच नांवानें चालू झाली.'

पण या उपपत्तींतहि कांहीं कमकुवत दुवे आहेत. त्यामुळें निःशंक उत्तर गवसल्याचें समाधान होत नाहीं. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जें घडलें तें पूर्व किनाऱ्यावर कां घडलें नाहीं ? केरळांतहि अन्य अनेक जमातींत ही चाल कां उत्पन्न झाली नाहीं ? भटकेपणामुळें किंवा लढाऊपणामुळें जर मातृसत्ता जन्माला येत असेल, तर एका काळीं आर्यहि तसेच भटके, लढाऊ आणि आक्रमक होते. मग त्यांच्यामध्यें मातृसत्ता कां निर्माण होऊं नये ?...... असे कांहीं प्रश्न शिल्लक राहतातच.

नायरांच्या या कुटुंबसंस्थेला ' तरवाड ' असें म्हणतात. हीं तरवाडें म्हणजे भुईकोट किल्लेवजा प्रचंड घरें असतात. शंभर ते दोनशें माणसेंसुद्धा कित्येक तरवाडांतून पिढ्यान्‌पिढ्या नांदत असतात. विशेष म्हणजे कुटुंबांतले हे लहानथोर स्त्री-पुरुष कोणत्या तरी एकाच स्त्रीचे वंशज असतात. तरवाडची मालमत्ता सामायिक असते. तरवाडांत दिवसापेक्षां रात्रौ जनसंख्या वाढते. कारण प्रत्येक मुलीचे ' संबंधम् ' केलेले यजमान रात्रौ तिथें वस्तीला येतात.

तरवाडचा पसारा फार वाढला, कीं मग त्यांतूनच लहान आटोपशीर कुटुंबें निर्माण करतात. अगदीं जवळच्या रक्तसंबंधाचीं माणसें अशा वेळीं वेगळीं होऊन आपलें छोटें कुटुंब बनवतात; त्यांना म्हणायचें ' तावझी. ' अनेक तावझी मिळून जो एक गट बनतो त्याला ' इणंगु ' म्हणतात. तरवाडांत कोणतेंहि मंगलकार्य व्हायचें असेल, तर इणंगूचा सल्ला विचारला पाहिजे. ' ताळिकेट्टु कल्याणम् ' साठींहि इणंगूंतूनच वराची निवड करतात.

तरवाड ही एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण वसाहत असते. मध्यभागीं हवेली-वजा खूप मोठें घर, सभोंवतीं प्रशस्त आवार, त्यांत फळांफुलांचें उद्यान, पुढें सारवलेलें अंगण, मागें गुरांचा गोठा, आवारांतच एखादें तळें अन् त्याच्या पाळीला एखादें मंदिर ! एखाद्या घरांत प्रवेश करण्याची संधि मिळाली तर तुम्हांला दिसेल, कीं घरांत सगळीकडे दालनेंच दालनें असून प्रत्येक स्त्रीचें शेजघर पृथक् पृथक् आहे. घरांत एक मोठें देवघरहि असतें. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही, कीं तरवाडचें स्मशानहि त्याच्या आवारांतच असतें. तिथें एकाच वास्तूवर जन्म आणि मृत्यु या दोहोंचेहि संस्कार होतात.

नायरांच्या मुली ' संबंधम् ' करतात असें मीं वर म्हटलें. आतां त्याचें विधिविधान सांगतों. प्रथम उभयपक्षीं वधू-वरांची निवड होते. मग तिथि-

निश्चय ठरतो. संबंधमूचा समारंभ दिवसा न होतां रात्रीं होतो. नवरदेव इष्टमित्रांसह वाजत गाजत वधूच्या तरवाडांत जातो. नवरदेवानें वधूला वस्त्र-दान करणें हा समारंभांतला आवश्यक आणि सर्वांत महत्त्वाचा विधि. तो झाल्यावर मग जमलेली मंडळी वधू-वरांवर अक्षता उधळतात. संबंधमूच्या वेळीं वधू वयांत आलेली असते. त्यामुळें त्याच रात्रीं वधू-वरांचा एकांत होतो. दुसऱ्या दिवशीं हा नम्पूतिरि ब्राह्मण नवरदेव सासुरवाडीस आपला हात ओला न करतां घरीं निघून येतो. कारण तो ब्राह्मण असतो आणि ती नायर असते. तिचें पाणिग्रहण करूनहि तो कधीं तिच्या हातचा सुग्रास जेवीत नाहीं. पत्नीधर्मानें वागायचें, पण खाण्यापिण्याच्या बाबतींत तिचा विटाळ मानायचा, असें हें चमत्कारिक दांपत्य असतें. ती नेहमीं माहेरींच राहाते; पण कधीकाळीं नवऱ्याच्या घरीं गेली, तरी तिला चार हात दूरच राहावें लागतें.

नायर मुली संबंधम् करतात; पण त्याआधीं त्यांचा आणखी एक संस्कार होतो, त्याला म्हणायचें 'ताळिकेट्टुकल्याणम्.' मुलगी सामान्यतः अकरा वर्षांची झाली, कीं तिचें हें कल्याणम् साजरें करतात. यांतली प्रमुख गोष्ट म्हणजे नवऱ्या मुलानें मुलीच्या गळ्यांत ताळी बांधणें ही होय! ताळी म्हणून सोनपुतळी बांधतात. आपल्याकडच्या मंगळसूत्राचाच तो प्रकार! त्यासाठीं मुलगा निवडायचा तो इणंगूतूनच निवडतात. या नेमस्त केलेल्या वराला 'मनवालन्' म्हणतात. ही निवड मोठ्या कसोशीनें करतात. त्यासाठीं ग्रह पाहणें, घटित जुळविणें, इत्यादि बारीक-सारीक गोष्टीसुद्धा आवर्जून करतात. मग एका सुमुहूर्तावर वधूचें 'कल्याणम्' होतें. तिच्या गळ्यांत ताळी शोभूं लागते. त्या प्रसंगीं खूप खर्च करतात. पण आश्चर्याची गोष्ट ही, कीं एवढा खर्च करून मोठ्या सोहळ्यानें केलेलें हें कल्याणम् म्हणजे लुटुपुटीचेंच लग्न असतें. जणूं भातुकलीचा खेळ! तिचें खरें लग्न होतें तें वयांत आल्यावर! तेंहि ताळी बांधणाऱ्या तरुणाशीं नव्हे; तर दुसऱ्याच कोण्यातरी सोम्यागोम्याशीं! या खऱ्या लग्नाला प्रथम ताळी बांधणाऱ्या मुलाची नांवापुरती संमति घेतात. त्यानें ती दिली तर 'अयं विशेषः!' दिली नाहीं तरी कोणी अडून बसत नाहीं.

मातृप्रधान कुटुंबसंस्था खरी; पण तरवाडांतले हे सगळे संस्कार एक पुरुषच घडवून आणतो. तरवाडाचे बाहेरचे सर्व व्यवहारहि तोच पाहातो. या पुरुषाला 'कारणवान' असें म्हणतात. कुटुंबांतल्या सर्वांत मोठ्या पुरुषाला हा

अधिकार प्राप्त होत असतो. साऱ्या मालमत्तेचा विश्वस्त तोच. कुटुंबांतल्या सान-थोरांनीं त्याच्याच आज्ञेंत वर्तायचें. एका काळीं या कारणवानाला मालमत्तेचे सर्वाधिकार होते. तरवाड म्हणजे एक लहानसें संस्थानच असे. त्याची स्थावर जंगम संपत्ति कधींहि विभागली जात नसे. सर्वांनीं कारणवानाच्या हाताखालीं एकत्र राहायचें. तो घालील तें खायचें, देईल तें नेसायचें. शतकानुशतकें असेंच चालत आलें होतें.

पण केरळांत पाश्चात्य संस्कृतीचा पायरव सुरू झाला, व्यक्तिस्वातंत्र्याचें वारें खेळूं लागलें आणि शहरी नायर लोकांना ती तरवाडची परंपरागत व्यवस्था रुचेनाशी झाली. त्यांचा कल पितृसत्ताक कुटुंबपद्धतीकडे झुकूं लागला. प्रत्येक तरवाडांत संघर्ष सुरू झाले. अंतर्गत स्वास्थ्य बिघडलें. बायका म्हणूं लागल्या, कीं 'लग्न झाल्यावरहि आम्हीं माहेरीं कां म्हणून राहायचें ? आम्ही सासरीं जाऊन नवऱ्याचा संसार थाटूं ! आमच्या भरण-पोषणाची जबाबदारी नवराच घेईल.'

हळूहळू या बाबतींत चळवळ सुरू झाली. आपले परंपरागत विवाह कायदेशीर व्हावे, पति-पत्नींच्या संसाराला स्वतंत्र अस्तित्व मिळावें, म्हणून समाजांतल्या सुशिक्षित लोकांनीं सरकार दरबारीं प्रयत्न सुरू केले. शेवटीं १९१२ सालीं त्रिवांकुर सरकारला लोकमतानुवर्ती असा नवा कायदा करावा लागला. त्या कायद्यानुसार नायरांचे विवाह सर्व बाबतींत कायदेशीर ठरले. तरवाडच्या उत्पन्नांतून प्रत्येकाला स्वतंत्र वांटणी मिळण्याचा अधिकार प्रस्थापित झाला. पत्नीच्या पालन-पोषणाची सर्व जबाबदारी पतीच्या शिरावर आली. पुरुषांचें बहुपत्नीकत्व आणि एका स्त्रीनें अनेक पति वरणें या दोन्ही चाली बेकायदा ठरल्या. या कायद्यामुळें नायर लोकांच्या समाजपद्धतींत क्रांतिकारक बदल झाला. कायदा अंमलांत येऊन पांच वर्षें लोटण्यापूर्वींच त्रिवांकुर संस्थानांतील सुमारें चाळीस हजार तरवाडांनीं आपल्या मालमत्तेची विभागणी केली. पूर्वीं जिथें भाच्याला वारसा हक्क मिळायचा, तिथें नंतर तो पितृसत्ताक कुटुंबपद्धतीप्रमाणें मुलाला मिळूं लागला.

हा कायदा मातृसत्ताक कुटुंबपद्धतीवर प्राणान्तिक प्रहारच होता. कालांतरानें नायर समाजाला उमगलें, कीं या कायद्यामुळें आपलें फार मोठें नुकसान झालें आहे. व्यक्तिवाद बळावला आणि फुटीर प्रवृत्तीला मोकळें कुरण

मिळालें तें या कायद्यामुळेंच. हा कायदा मागें घेतला जावा म्हणून नंतर थोडी चळवळहि झाली; पण तिला यश मिळालें नाहीं. केरळांतल्या खेड्यापाड्यांत मातृसत्ताक कुटुंबव्यवस्थेचे कांहीं अवशेष अजूनहि आहेत; पण शहरांतून आतां ती जवळजवळ लुप्त झाली आहे. आतां तिला पुनश्च जीव धरणें शक्य नाहीं. तशी मागणी करणेंहि निरर्थक आहे. कारण आजमितीस जग एका धावत्या यांत्रिक युगांत प्रविष्ट झालें आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत भारतीय स्त्रीच्या अधिकारांतहि मोठीच वाढ झाली आहे. १९५६ सालच्या हिंदु वारसा हक्काच्या कायद्यानें तर हिंदु स्त्रीला पुरुषांच्या समान पातळीवर आणून बसवलें आहे. त्यामुळें आतां मातृसत्ताक समाजपद्धतीची आवश्यकताच उरली नाहीं; असें केरळांतले विचारवंत लोक मानूं लागले आहेत.

नायरांनंतर थिय्यांचा उल्लेख करावा लागतो. मलबारी हिंदूंतली ही एक मोठी जात आहे. आपण लंकेमधून केरळांत आलों, असें ते सांगतात. हे लोक स्वच्छतेचे आणि टापटिपीचे भोक्ते आहेत. विचारांनीं पुरोगामी आहेत. शिक्षणांतहि पुढारलेले आहेत. त्यांच्या स्त्रियांतहि शिक्षणाचा बराच प्रसार आहे. या जातीनें जीवनाच्या सर्व क्षेत्रांत नांव काढणारीं माणसें निर्माण केलीं आहेत.

मुसलमानांचा वर्गहि केरळांत बराच मोठा आहे. हा वर्ग मोपला किंवा मापिल्ला या नांवानें ओळखला जातो. पोर्तुगीज येण्यापूर्वीं केरळांतला मसाल्याच्या पदार्थांचा व्यापार अरबांनीं काबीज केला होता, हें पहिल्या प्रकरणांतच सांगितलें आहे. या अरब व्यापाऱ्यांनीं तिथल्या स्थानिक बायकांशीं लग्नसंबंध जोडले. त्यांतून जी संतति निर्माण झाली, ते हे मोपले. केरळांतल्या कनिष्ठ जातींतल्या हिंदूंनीं मोठ्या प्रमाणांत इस्लामी धर्म स्वीकारल्यामुळे यांची संख्या वाढली, फुगली. मोपला ही कष्टाळू आणि हरहुन्नरी जमात आहे. ते नोकरी पेशांत मागें असले तरी व्यापारांत पुढें आहेत. इस्लाम



केरळी कोळी

स्वीकारला, म्हणून कांहीं त्यांच्यांतील उच्च-नीचता गेली नाहीं. त्यामुळें त्यांच्या व्यवसायांतहि एकरूपता आली नाहीं. उच्चवर्णी मोपले व्यापारी, उदमी बनले आहेत. कनिष्ठांनीं जमिनीवर शेती आणि समुद्रावर मच्छीमारी अशी उभयविध जीविका पत्करली आहे. मोपल्यांचीं घरें बहुधा हमरस्त्यावर असतात. त्यांच्या बायका गोषा पाळतात. त्यांना गृहपरिसरांत हिंडतांफिरतांना कोणीं पाहूं नये म्हणून मोपले आपल्या घराभोंवतीं उंच तट उभारून ठेवतात. मोपलेहि दाढी वाढवून डोक्याचा गोटा करणारेच आहेत. त्यांची टोपी शुभ्र तलम कापडाची असते. मोपले मुन्टू नेसतात; पण त्याची गांठ मात्र हिंदूंच्या विरुद्ध म्हणजे डाव्या अंगाला बांधतात. रंगीत साडी, सैलसर कंचुकी आणि डोक्यावरून उत्तरीय, ही मोपला महिलांची वेषभूषा असते.

पण केरळी जीवनांत पुष्कळ अंशी सामावून गेलेल्या या मोपल्यांना १९३६ सालापासून दुर्बुद्धि आठवली. त्यांच्यांत दंग्याधोप्याचें वारें संचरलें. ते इतर समाजाला उपद्रव देऊं लागले. त्यांची ही उपद्रवी प्रवृत्ति शमत नाहीं असें पाहून ब्रिटिश सरकारला 'मोपला ॲक्ट' नांवाचा एक विशिष्ट कायदा निर्माण करावा लागला. केवळ मोपल्यांना काबूंत ठेवण्यासाठीं ब्रिटिशांना मलपुरम् येथें एक सैन्य तुकडी कायम ठेवावी लागली होती.

१९२३ सालीं भारतांत खिलाफत चळवळ सुरू झाली. केरळांत दंगे करून तुर्कस्तानांतल्या खिलाफतीचें कसें काय बरें, भलें होणार होतें, तें त्यांचें तेच जाणोत! पण मोठ्या प्रमाणावर बंड उभारायला त्यांनीं त्या चळवळीचें निमित्त केलें एवढें मात्र खरें! केरळांत त्यांनीं सगळीकडे एकच आगडोंब उसळून दिला. त्यांच्या अंगांत जणूं सैतानच संचरला. केवळ स्मरणानेंहि अंगावर कांटा उभा राहावा, अशीं अनन्वित कृत्यें त्यांनीं आरंभिलीं. इतरांच्या पेक्षां नम्पूतिरि ब्राह्मणांवर त्यांचा विशेष दांत होता. मोपले जणूं त्या जातीचे तक्षक बनले. त्यांच्या त्या बंडांत किती लोक प्राणांना मुकले, किती घरादारांना पारखे होऊन राखेंत बसले, किती घायाळ होऊन जन्माचे जायबंदी झाले, किती स्त्रियांची इज्जत गेली, किती तरुणी त्यांच्या घरांत पडल्या, या सगळ्याची गणती कोण करणार!

अशाच एका दुर्दैवी तरुणीवर 'दुरवस्था' नांवाचें एक खंडकाव्य कुमारन् आशान् या केरळी कवीनें लिहिलें आहे. तें जणुं कढत अश्रूंनीं

लिहिलेलें काव्य आहे. त्या काव्याची नायिका सावित्री नांवाची ब्राह्मण-कन्या आणि नायक चात्तन् नांवाचा अस्पृश्य युवक आहे. गांवाबाहेर महार-वाड्यांत चात्तन्ची लहानशी झोंपडी आहे. झोंपडींत तो एकटाच राहतो. देशांत सर्वत्र बंडाचा वणवा पसरला आहे. जिकडे तिकडे उन्मत्तांच्या आरोळ्या आणि मरत्या जिवांचीं आक्रंदनें उठत आहेत. सगळीकडे पांगापांग आणि धावाधाव! सावित्रीहि पाठीस लागलेल्या सैतानांना झुकांडी देऊन पळत सुटते आणि प्राणाहून प्रिय असलेली आपली अब्रू बचावण्यासाठीं चात्तन्च्या झोपडींत प्रवेश करते. चात्तन् भांबावतो, विस्मित होतो. कोण, कुठली म्हणून तिला विचारतो. मोपल्यांकडून आपली पारध होत असल्याचें सांगून सावित्री त्याच्याकडे आश्रयभिक्षा मागते.

तो म्हणतो, ‘ मी जातीचा पुलयन. अस्पृश्यांतलाहि अस्पृश्य. माझ्याकडे राहिलीस, तर आगींतून फुफाट्यांत पडशील. ’

ती म्हणते, ‘ या वेळीं मी दुसरा कसलाहि विचार करूं शकत नाहीं. मला फक्त अब्रू राखायची आहे. तेवढा आसरा तूं मला दे. ’

चात्तन् तें मान्य करतो. सावित्री त्याच्या झोंपडींत राहते. तो पाणी आणून देतो. ती भाकर-तुकडा करते. त्याला वाढते, आपणहि खाते. तो कवाड लावून कामाला जातो. ती आंतल्या अंधारांत काळ काढते. चात्तन् मोठा भला माणूस! तो तिची अभिलाषा धरीत नाहीं. वांकड्या नजरेनें पाहत नाहीं. कधीं मर्यादारेषा ओलांडीत नाहीं. ‘ तम्पुराट्टि ’ या आदरार्थी शब्दानेंच तिला संबोधतो. त्यामुळें सावित्रीला धीर वाटतो. चात्तन्विषयीं तिचा आदर दुणावतो.

कालांतरानें वातावरण बदलतें. आगडोंब शांत होऊं लागतो. इंग्रज राज्यकर्ते लष्कर घालून मोपल्यांचें बंड मोडून काढतात. अत्याचारी गुंडांचे ‘ दादा ’ पकडले जातात. त्यांच्यावर खटले भरले जातात. त्यांना कडक शिक्षा होते. कित्येकांना अंदमानचें काळें पाणी दाखवलें जातें. उपद्रव शमतो. हवा निर्भय होते.

आतां सावित्रीला चात्तन्च्या झोंपडींतून बाहेर पडायला कसलीच हरकत नसते. पण ती तसें कांहीं मनांत आणीत नाहीं. तिचें विचारचक्र वेगळ्याच दिशेनें चालू होतें.

'चात्तन् आपला आश्रयदाता. जातीचा अस्पृश्य खरा; पण किती सोज्ज्वळ, किती मर्यादशील! माझ्यासारखी नितळ, स्वच्छ तरुणी अहोरात्र वितीच्या अंतरावर असतां या जवानानं आपलं मन चळूं दिलं नाहीं. हें धैर्य, हा संयम उच्च जातींत तरी आढळूं शकेल का?.. .....याला सोडून जाणं मला बरं दिसेल का?.......हा कृतघ्नपणा ठरणार नाहीं का?......, पण याच्या झोंपडींत राहणं म्हणजे.......होय. मीं तेंहि पसंत करीन. ज्या ईश्वरानं आश्रयासाठीं मला इथें आणून घातलं, त्या ईश्वराचाहि असाच संकेत असावा...."

आणि ज्या वेळीं चात्तन् बाहेरून येऊन तम्पुरट्टि म्हणून तिला हांक मारतो, त्यावेळीं ती त्याला म्हणते.

"अं, हं! आजपासून तम्पुराट्टि बंद! मला नुसतं सावित्री म्हणत जा."

"याचा अर्थ....?!" तो चमत्कारून विचारतो.

"याचा अर्थ तुझी ही चंद्रमौळी झोंपडी, हेंच आतां माझं निजाचं घर ....अन् तूं जन्माचा ..."

असें आहे हें आशान् कवीचें खंडकाव्य. काव्यांत अतिशयोक्ति असेल कदाचित्! कदाचित् सावित्री बंड शमल्यावर परत आपल्या घरीं आली असेल; पण तिचा तो मधला अज्ञातवास संशयास्पद वाटून रूढिवादी कुटुंबीयांनीं तिला घराचें दार बंद केलें असेल. त्यामुळें ज्या झोंपडींतून ती बाहेर आली, तीच झोंपडी आणि तोच आश्रयदाता तिला पुन्हां जवळ करावा लागला असेल. तें कसेंहि असो; केरळाच्या सामाजिक आणि कौटुंबिक जीवनाला मोपल्यांनीं दिलेला हा तडाखा जबरदस्त होता यांत शंका नाहीं. तो जणुं वर्मी घावच होता!

केरळांत ख्रिश्चनांचा समाजहि बराच मोठा आहे. त्यांत कांहीं सीरियन ख्रिश्चन आहेत. ते ख्रिस्ताला मानतात; पण कॅथॉलिक चर्चला मानीत नाहींत. कॅथॉलिकांनीं तिथें आपलीं पाळें मुळें खोलवर पसरविलीं आहेत. हे लोक शिक्षणांत आणि व्यापारांतहि आघाडीवर आहेत. त्यांचीं संपन्न अशीं मंदिरें आहेत. मातबर संस्था आहेत. शाळा, महाविद्यालयें, रुग्णालयें सर्व कांहीं आहे. केरळांत आधुनिक पद्धतीचें म्हणजे पाश्चात्य शिक्षण ख्रिश्चनांनींच आणलें.

त्याबरोबरच मुद्रणकलाहि आणली. ते मलयाळम् भाषा शिकले, त्या भाषेवर त्यांनीं प्रभुत्व संपादन केलें. खिस्ताचीं आणि धर्माचीं स्तुतिस्तोत्रें त्यांनीं त्या भाषेंत रचलीं. त्या भाषेच्या आधारेंच अशिक्षित आणि उपेक्षित जनतेंत धर्म-प्रचार केला. इतकेंच नव्हे; तर मलयाळमूच्या संशोधनाला, तिचा इतिहास तयार करायलाहि तेच पुढें सरसावले. केरळांत आधुनिक विद्या-कलांची बैसका त्यांनींच मांडली.


मात्र याचा अर्थ असा नव्हे, कीं पाश्चात्यांच्या आगमनापूर्वीं केरळ शिक्षणाच्या बाबतींत उदासीन होता. केरळ ही प्राचीन काळापासून विद्या-भूमि आहे. नम्पूतिरि हे त्या कामीं अग्रेसर होते. वयाच्या पांचव्या वर्षींच ते मुलाचा विद्यारंभ संस्कार करीत. आठव्या वर्षीं त्याचें उपनयन करून त्याला पाठशाळेंत घालीत. प्रत्येक नाडूंत शिक्षणासाठीं पाठशाळा उघड-लेल्या असत. लेखन, वाचन, गणित, खगोल ज्योतिष आणि फल-ज्योतिष हे अवांतर व्यावहारिक विषय वेदाबरोबरच शिकवीत. त्यानंतर संस्कृत काव्याचें अध्ययन करून घेत. श्रीमंत लोक आपल्या चौसोपींत वैयक्तिक पाठशाळा उघडीत. त्यांत त्या श्रीमंतांच्या मुलांबरोबरच आजू-बाजूच्या इतर मुलांनाहि शिक्षणाचा लाभ मिळे. मोठमोठ्या शहरांतून ‘ सभामट्ट ’ असत. त्यांतहि अध्यापनाचें कार्य चाले. मट्टांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विनामूल्य जेवणखाण मिळे. त्याहीवर मोठमोठीं गुरुकुलें असत. त्यांचा दर्जा विश्वविद्यालयाचा असे. विद्यार्थ्यांना कडक शिस्तींत वागवीत. त्यांच्या पाठांतरापेक्षांहि चारित्र्याची विशेष जोपासना करीत. शिस्तभंग आणि अनैतिक वर्तन घडल्यास विद्यार्थ्याला शिक्षणसंस्थेंतून ताबडतोब अर्ध-चंद्र मिळे. शिक्षक निःस्वार्थ वृत्तीनें आणि पवित्र कार्य या भावनेनें विद्यार्थ्यांना पढवीत. त्यांना वेतन नाममात्रच असे; पण विशिष्ट उत्सवप्रसंगीं मुलांच्या पालकांकडून नाना प्रकारच्या देणग्या आणि शिधासामग्री आपो-आप त्यांच्याघरीं चालून येत असे.

केरळांतल्या अशा शिक्षणसंस्थांतून अनेक कवि आणि पंडित निर्माण झाले. तिथल्या श्रेष्ठ ग्रंथांच्या निर्मितीचें श्रेय अशा संस्थांनाच आहे. शिक्षणाचा प्रभाव आणि प्रसार केवळ नम्पूतिरि ब्राह्मणांतच होता असें नव्हे; तर नायरहि त्याकामीं मागें नव्हते. नायरांत बौद्धधर्माचा बराच

प्रसार झाला होता. बौद्ध साहित्य आणि दर्शन यांत त्यांनीं आघाडी मारली होती. बौद्धांनीं केरळांत अनेक ठिकाणीं मठ आणि विहार उभारले होते. कित्येक नायर त्या मठांतून शिक्षण घेऊन बौद्ध धर्मांचे प्रचारक आणि अध्यापकहि बनले होते.

कोडंगलूर आणि पैय्यूर या ठिकाणीं केरळाचीं दोन विद्यापीठें होतीं. केरळी राजकुमार या विद्यापीठांतून शिकत. आवर्जून सांगण्याची गोष्ट ही, कीं तिथले विद्यासंपन्न राजेहि कोडंगलूरच्या विद्यापीठांत दिवसांतल्या कांहीं ठराविक वेळीं ज्ञानदानाचें कार्य हौसेनें आणि आस्थेनें करीत.

वैद्यकशास्त्र केरळांत त्या प्राचीन काळींहि बरेंच प्रगत झालें होतें. तिथले 'अष्टवैद्य' प्रसिद्ध आहेत. त्यांनीं पिढ्यान्‌पिढ्या आयुर्विद्या टिकवली आणि वाढवली. व्यायाम आणि युद्धकला यांचें शिक्षण देणाऱ्या तिथल्या शाळा म्हणजे 'कलरी.' प्रत्येक मोठ्या वस्तीच्या विभागांत भद्रकालीच्या मंदिरा-समोर कलरी ही असायचीच. ग्रीसमधल्या जिम्नॅशियम् सारखें त्यांचें स्वरूप असे. प्राचीन ग्रीक लोक आणि मलबारी लोक यांच्यांत संशोधकांनीं सामान्य सादृश्य शोधून काढलें आहे. ग्रीकांप्रमाणेंच मलबारी लोकहि नितळ त्वचेचे



कलरींतलें शारीरिक शिक्षण—मालिश

आणि पिळदार देहबांध्याचे असत. ग्रीस देश जसा नगरराज्यांचा बनलेला होता, तसाच केरळहि अनेक नाडूंचा मिळून बनला होता. प्रत्येक नाडूची

राज्यव्यवस्था स्वतंत्र होती; पण सबंध प्रदेशाचें मिळून एक सांस्कृतिक ऐक्यहि होतें. ग्रीसमध्यें त्यांचे राष्ट्रीय महोत्सव मोठ्या प्रमाणांत होत आणि त्यांत युद्धविद्येच्या अन् शस्त्रनैपुण्याच्या स्पर्धाहि होत. केरळांतल्या महामंखम् या उत्सवाचें स्वरूपहि तसेंच होतें. या साम्यावरून अनुमान निघालें आहे तें असें, कीं नायर लोक मुळांत त्या प्रदेशांतले असावे आणि तिथून निघून स्थलमार्गें किंवा जलमार्गें भारताच्या पश्चिम भागांत उतरले असावे.


ताडपत्री छत्री

प्राचीन काळीं केरळ हा तमिळ-नाडूचाच एक भाग होता. तमिळ-संस्कृतीचाच तो सहभागी होता. कित्येक तमिळ काव्यें आणि महाकाव्यें चेर राजांवर म्हणजेच केरळी राजांवर लिहिलेलीं आहेत. कालांतरानें केरळी संस्कृतीला तमिळहून वेगळेपणा आणि स्वतंत्रपणा आला. मुख्यत्वें दोन कारणांनीं हें वेगळेपण निर्माण झालें. हवा-पाणी अन् भौगोलिक वैशिष्ट्य हें पहिलें कारण आणि परदेशांशीं संबंध हें दुसरें कारण. केरळाचे परदेशांशीं संबंध जुळले ते सागराच्या मध्यस्थीनें. पाश्चिमात्य व्यापारी राष्ट्रांना मलबार पुरातन कालापासून ठाऊक आहे. फिनिशियन, इजिप्शियन, खाल्डियन, ग्रीक, रोमन हे सगळे विदेशी लोक मलबारच्या भूमीला पाय लावून आणि तिथला कांहींतरी माल घेऊन गेलेले आहेत. या प्राचीन दळण-वळणांचे अवशेष केरळांत अजूनहि आढळतात.

केरळांतल्या लोकांचाच युरोपीय लोकांशीं प्रथम संबंध घडला. मलबारांत त्यांच्या येण्या-जाण्याबरोबरच विचारांचीहि देवाण-घेवाण सुरू झाली. ग्रीकांच्या जवळ खगोलविद्या होती. त्यांच्या संपर्कांत केरळी लोकांनीं ती अवगत करून घेतली. अरबांच्या जवळ नौकानयनकला होती; तीहि ते शिकले. सीरियन

ख्रिश्चनांना वैद्यकशास्त्र विशेष अवगत होतें. त्यांचें वनौषधींचें ज्ञानहि प्रगत होतें. केरळी लोकांनीं त्यांच्याकडून तेंहि हस्तगत करून घेतलें. आधुनिक राइफल्स आणि घरसजावटीचें सामान या गोष्टी पोर्तुगीजांनीं तिथें आणल्या. नारळाचें मोठ्या प्रमाणांत उत्पादन करायला पोर्तुगिजांनींच तिथल्या लोकांना उत्तेजन दिलें. केरळाच्या भूमीवर पहिला छापखाना त्यांनींच उभारला.

दुसऱ्या बाजूनें ब्रह्मदेश, सयाम, चीन या देशांशींहि केरळीयांनीं संबंध वाढवला होता. चिनी गलबतें क्विलॉनच्या बंदरांत नेहमींच नांगरलेलीं असत. मच्छीमारीचें शास्त्र केरळी लोक चिनी लोकांकडूनच शिकले. जहाजांवरून युरोपच्या सफरीवर जाणारे मलयाळी हे पहिले खलाशी होत. समुद्रप्रवासाचा निषेध करणाऱ्या श्रुति-स्मृति त्यांना बाधत नव्हत्या. कारण हिंदूंचे अहिंदु होऊनच त्यांनीं जहाजावर पाय ठेवला होता. जे गेले ते सगळे मलबारी ख्रिश्चन आणि मुसलमान होते. आणि त्यांच्या धर्मांत खाण्या-पिण्याचा तसाच समुद्रप्रवासाचाहि निषेध नव्हता.

मलबारांत पहिला विदेशी धर्म आला तो ख्रिस्ती धर्म. त्या धर्माचा भारतांत आलेला अग्रदूत सेन्ट थॉमस हा होता. ख्रिस्ताच्या बारा शिष्यांत त्याची गणना होती. इसवी सनाच्या पहिल्या शतकांतच त्यानें मलबारच्या किनाऱ्यावर अवतरण केलें. लोकांच्या पोटांत शिरून हळूहळू त्यानें बाटवा-बाटवीला प्रारंभ केला. त्यानें थोडेच लोक बाटविले; पण ते अव्वल दर्जाचे होते. खुद्द चेर राजा पल्लिबाण पेरुमाळ हा थॉमसच्या गळाला लागलेला सर्वांत मोठा मासा होय. थॉमसनें मलबारांत सात चर्चें उभारलीं, हा त्याचा मोठा पुरुषार्थ मानावा लागेल.

उत्तरेकडून जैन आणि बौद्ध हेहि धर्मप्रसाराच्या उद्देशानें केरळांत उतरले; पण ते थॉमसच्या नंतरच. त्यांनींहि मठ—विहार निर्माण करून आपापल्या धर्माचे मांड मांडले. धर्मप्रचारहि खूप केला. पण शंकराचार्यांच्या ज्ञानसूर्या-पुढें त्यांना हतप्रभ व्हावें लागलें. आचार्यांच्या नंतर केरळांत जैन-बौद्धांचें कांहींच उरलें नाहीं. टिकून राहिले ते ख्रिस्ती आणि इस्लामी.

पण इस्लाम काय किंवा ख्रिस्ती धर्म काय, त्यांच्या मूळ स्वरूपांत तिथें राहूं शकले नाहींत. त्यांना देशकालानुरूप एतद्देशीय वळण लावून घ्यावें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ............९१
नों: दि: ..................


लागलें. तिथले खिश्चन आणि मुस्लीम विधर्मी असले, तरी ते केरळी समाजाचेच घटक आहेत. केरळांतल्या हिंदूंनीं सहिष्णु वृत्ति धरून त्यांना औदार्यानेंच वागवलें आहे. जुन्या काळीं हिंदु लोक त्यांची शिवाशिव पाळीत; पण तरीहि त्यांना तुच्छ लेखीत नसत.

केरळांतले राजेहि परधर्म-सहिष्णु होते. उगीच का सेंट थॉमसला त्या भूमीवर सात चर्चे उभारतां आलीं? ज्या काळीं पाश्चात्य देशांत रोमन सम्राट् आणि ससानिअन राजे खिश्चनांची लांडगेतोड आणि ससेहोलपट करीत होते, त्याच काळांत केरळाच्या भूमीवर राजसत्तेकडून त्यांना खुल्या दिलानें आश्रय मिळत होता. त्यांचीं मंदिरें उभारायला राजाच्या भांडारांतल्या द्रव्याच्या थैल्या रिकाम्या होत होत्या. त्यांना अनिर्बंध स्वातंत्र्य मिळत होतें. केरळांतले परदेशी खिस्ती तिथल्या भूपतीकडे आपले 'तारणहार' या भावनेनें पाहत होते. केरळी खिश्चन आणि रोमची धर्मसत्ता यांच्यामधले संबंध दाते. त्यांच्या त्रिवांकुर आणि कोचिन येथील राजांनींहि मुसलमानांना भरपूर आश्रय दिला.

केरळांतले हिंदु शिव, विष्णु किंवा देवी या देवतांचे उपासक आहेत. हीं दैवतें भिन्न स्वभावाचीं असलीं, तरी केरळांत तीं खेळीमेळीनें नांदतात. इथें पंथीय कट्टरपणा किंवा अभिनिवेश सहसा आढळायचा नाहीं. तृप्पणित्तुरा, तिरुविल्वामला, चिट्टूर, इत्यादि ठिकाणचीं वैष्णव मंदिरें प्रसिद्ध आहेत. एरणाकुलम्, तिरुवंचिकुलम्, पेरुवनम् इत्यादि ठिकाणीं शैव मंदिरें गाजत आहेत. या दोन्ही देवांपेक्षां तिथलीं दुर्गादेवीचीं मंदिरें संख्येनें अधिक भरतील. दुर्गा किंवा भद्रकाली ही केरळाची मातृदेवताच आहे.

केरळांतलीं हीं देवमंदिरें वास्तुकलेचा निराळा नमुना म्हणून दाखवतां येतील. मोठ्या मंदिरांच्या चारी दिशांना तमिळनाडप्रमाणें इथेंहि उत्तुंग गोपुरांची उभारणी असते. पण त्यावरची चित्रकला आणि मूर्तिकला तमिळनाडपेक्षां वेगळी. या गोपुरांवर वेगवेगळ्या पशूंचीं चित्रें दिसतील. माणसेंहि दिसतील; पण तीं विचित्र आकाराचीं आणि चमत्कारिक तोंडावळ्याचीं. मंदिरें, कांहीं चौकोनी तर कांहीं वाटोळीं असतात. कांहीं मंदिरें इतकीं लहान कीं गाभारा, त्यावर छप्पर आणि त्यांवर चढून खालीं उतरायला छोटासा

जिना, एवढाच त्यांचा आटोपसर कारभार. मोठीं मंदिरें म्हणजे खूपच त्या काळीं कोच्चिनच्या राजामार्फत चालत असत. व्हॅटिकनच्या दप्तरांत तशा




केरळी मंदीर

प्रकारचा व्यवहार आजहि सांपडेल. झामोरिन राजे हे मुसलमानांचे आश्रय-प्रशस्त. त्यांच्या सभोंवतीं काळ्या दगडांचा प्रदक्षिणामार्ग बांधून काढलेला असतो. मंदिराभोंवतीं उंच तट आणि त्याच्या आंत विस्तीर्ण प्राकार असतो. मुख्य मंदिर प्राकाराच्या मध्यभागीं असतें. त्याला ‘श्रीकोविल’ म्हणतात. मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांत एक दगडी चौथरा असतो, त्याला ‘बलिक्कल पुरा’ किंवा बालिपीठ म्हणतात. त्याच्या शेजारीं देवस्थानाची जशी श्रीमंती असेल, त्या मानानें सोनें पितळ किंवा तांबें या धातूचा ध्वजस्तंभ उभारलेला असतो.

केरळांतले सामाजिक महोत्सव वेगळे आणि या मंदिरांतून होणारे देवोत्सव वेगळे आहेत. देवोत्सवांना शिवेली, परयुत्सव, पूरम्, तालप्पिली, अशीं नांवें आहेत. हे उत्सव निरनिराळ्या मासांतल्या विशिष्ट नक्षत्रांवर होत असतात. या उत्सवप्रसंगीं हत्तीवरून देवाची मिरवणूक काढतात.

११४२४

नागपूजा हें केरळाचें खास वैशिष्ट्य होय! तिथें घरोघरीं नागांच्यासाठीं राखीव जागा असते. तिन्हींसांजा नागापुढें दिवा लावला जातो. नायरांच्या तरवाडांतून तर नागप्रतिमेसाठीं एक लताकुंजच तयार केलेला असतो. त्याला 'सर्पकावु' म्हणतात. या कावूंत दगडी चौथऱ्यांवर नागराज आणि नागयक्षी यांच्या मूर्ति बसविलेल्या असतात. वर्षांतल्या कांहीं तिथींना त्यांची महापूजा करून खिरीचा नैवेद्य दाखवितात. नाग हे गृहसंरक्षक आहेत, अशी त्या लोकांची धारणा आहे. सर्पकावु जेव्हां कोणत्यातरी कारणानें अपवित्र किंवा अमंगळ होतें, तेव्हां त्यांतल नाग घरच्या माणसांसमोर येऊन खडा होतो, असें सांगतात. मग घरचा किंवा तरवाडाचा मालक त्या स्थानाचा प्रक्षालनविधि करतो. नागांना जर कोणी पिडील किंवा डिवचील तर त्याला कुष्टरोग किंवा निदान खरूज तरी होईल, अशी भीति सर्वांच्या मनांत घर करून असल्यामुळें कोणी त्यांच्या वाटेला जात नाहीं.



नागलिंग, नाग व नागयक्षी

शिव–विष्णु या विशिष्ट भक्तांच्या उपास्य देवता. सर्प ही नायरांची अन् विशिष्ट कुलांची देवता. भद्रकाली किंवा भगवती ही ग्रामदेवता. पण केरळां-

तल्या आम जनतेचा श्रद्धेय देव कोणी असेल, तर तो शास्ता हा होय. याची जन्मकथा ऐकण्यासारखी आहे —

याला ‘ हरि-हरपुत्र ’ म्हणतात. हरि आणि हर दोघेहि पुरुषच! मग त्यांना हा पुत्र झाला कसा? या कोड्याचें उत्तर भस्मासुराच्या कथेंत शोधायला हवें! भस्मासुरानें शिवाची उग्र आराधना केली. शिव त्याला प्रसन्न झाला. असुरानें वर मागितला, कीं ‘ मीं ज्याच्या डोक्यावरून हात फिरवीन त्याचें भस्म व्हावें. ’ भोळ्या सांबानें मागचा पुढचा विचार न करतां तो वर देऊन टाकला. त्यामुळें असुर उन्मत्त झाला. त्याची पापी नजर जगन्माता पार्वतीकडेहि वळली. शिवाला त्याचें पारिपत्य कांहींच करतां येईना. शेवटीं श्रीविष्णूला त्यासाठीं मोहिनीरूप घेऊन पुढें यावें लागलें. मोहिनीनें मोठ्या हिकमतीनें भस्मासुराचें भस्म केलें. पण तिचें धर्म करतां कर्म उभें राहिलें. असुराचें भस्म झाल्यावर संकटांतून मुक्त झालेला शिवच तिच्यावर भाळला. तिचें मनगट पकडण्यासाठीं त्यानें आपला भुजदंड पुढें केला. मोहिनीला पळापळ लागली. शिव तिचा पाठलाग करू लागला. थोड्याच वेळांत मोहिनी शिवाच्या हातांत गवसली. आणि त्या प्रसंगांतून ज्या एका पुत्राचा जन्म झाला तो हा शास्ता होय!

त्याच्या हातून पुढें कांहीं महत्कृत्यें झालीं. समस्त द्रविड जनतेनें त्याला आपला देव मानलें. तमिळनाडमधील जनता ‘ अय्यनार ’ या नावानें त्याला पुजूं लागली. केरळांतील जनता ‘ शास्ता ’ या नावानें त्याला भजूं लागली. कूर्गमध्यें ‘ मलेदेव ’ या नांवानें तो पूज्य ठरला. महाराष्ट्रांत तोच ‘ खंडोबा ’ या नांवानें भक्तीचा विषय बनला. याचा अर्थ एकच, कीं कोणतातरी पर्वतवासी देव सगळ्या दक्षिण भारतांत भिन्न भिन्न रूपानीं आपलें अस्तित्व दाखवीत आहे.

केरळांत त्रिवांकुरच्या पर्वतराजींत ‘ साबरी मलै ’ या एका अवघड पहाडांत त्याचें मंदिर आहे. खेडोपाडींहि याचीं देवळें असतातच आणि तीं गांवाजवळच्या दाट झाडींत असतात. या शिवाय तिकडील शैव–वैष्णव मंदिरांच्या आवारांतहि याच्या नांवाची एखादी छोटीशी मढी असतेच. ‘ येळकोट मल्हार ’ हा जसा खंडो मल्हारीचा जयघोष आहे, तसा

'सारनाम अय्यापन्' हा या शास्त्याचा जयघोष आहे. महाराष्ट्राच्या खंडोबाला दोन 'अस्तुरी' आहेत. एक म्हाळसा व दुसरी बाणाई. त्याचप्रमाणें शास्ताहि पूर्णा आणि पुष्कला या दोन बायकांचा 'दादुला' आहे.



शास्ता

केरळांत मकर संक्रांतीला 'साबरी मलै' या पहाडांत याची मोठी जत्रा भरते. लाखों भक्तांच्या मंडपघसणीनें साबरीमलै नुसता गजबजून जातो. शास्त्याच्या या जत्रेला जायचें म्हटलें, तर त्यापूर्वीं दोन महिने म्हणजे सूर्यानें वृश्चिक राशींत प्रवेश केल्यापासून तों त्याच्या मकरसंक्रमणापर्यंत भक्तांना व्रतस्थ राहावें लागतें. ब्रह्मचर्य पाळावें लागतें. काळा किंवा पिंवळा पोषाख घालूनच शास्त्याचा पहाड चढावा लागतो. यात्रेच्या प्रसंगीं तिथल्या मंदिरांत एक दीपज्योत विशिष्ट स्थळीं लागते. तिचें दर्शन झालें, कीं मग तिथली यात्रा परतते. कांहीं कालापूर्वीं केरळांत जी राजकीय दंगल उसळली होती, त्या प्रसंगीं कांहीं विद्रोही लोकांनीं शास्त्याच्या मंदिरावरहि आघात केला होता, असें वृत्तपत्रांवरून कळलें. खरें सांगायचें तर केरळांतल्या समस्त श्रद्धावंतांच्या अंतःकरणावरच तो आघात होता. कारण केरळी जनता शास्त्याकडे आपला, आपल्या मुलाबाळांचा, गुरांढोरांचा, शेतीवाडीचा, सगळ्यांचाच एक समर्थ संरक्षक या भावनेनें पाहते. सवर्ण हिंदूच नव्हेत; तर तिथला वन्य समाजहि शास्त्याला सर्वभावें शरण आहे.

* * *



# यात्रकळि - कथकळि

भारतीय नृत्य- नाट्याचें स्वरूप मुळांत मनोरंजनात्मक नसून धार्मिक आहे. नृत्यानें अथवा नाट्यानें देवतेची आराधना करून तिचा कृपाप्रसाद मिळवणें ही कल्पना त्याच्या मुळाशीं आहे. नृत्य-नाट्यादि कलांचें मनोभावें प्रदर्शन केल्यास देवता संतोष पावते आणि मनोरथ पूर्ण करते, या श्रद्धेंतूनच भारतीय लोकनाट्याचा उगम झालेला आहे. दक्षिणेंत या कल्पनेला विशेष प्राधान्य आहे. ग्रामदेवतेच्या जत्रेंतहि नृत्य-नाट्याचा प्रयोग अवश्य व्हायला हवा, ही दक्षिणेची धारणा आहे. या धारणेंतूनच दशावतार, यक्षगान, बयलाटम्, कूडियाट्टम्, इत्यादि नृत्यनाट्याचे प्रकार निर्माण झाले आहेत.

## कूडियाट्टम्

कूडियाट्टम् हें केरळाचें एक प्राचीन नृत्य आहे. त्याचा अर्थ आहे, 'मिळून नाचणें.' अंतराळ वर्गातले चाक्यार जातीचे लोक या नृत्याचे परंपरागत मक्तेदार आहेत. ते स्वतःला सूताचे वंशज समजतात. नम्पियार आणि नङ्ङियार या दोन पोटजातींचे लोक चाक्यारांच्या जोडीला असावे लागतात. नम्पियार मिलाव नांवाचें वाद्य वाजवून सूत्रधाराचें काम करतो. तो जें आख्यान लावील, त्यांतल्या पुरुषपात्राचें काम चाकयार करतो. स्त्री भूमिकेसाठीं नङ्ङियार लुगडें नेसतो. मलयाळम् साहित्यांत कूडियाट्टम्साठीं लिहिलेलीं सुभद्रा-धनंजयम्, तपती-संवरणम्, अशीं अनेक पौराणिक आख्यानें आहेत. आख्यान सुरू झालें, कीं 'अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत्' असा तो प्रकार होतो. रात्र संपली तरी आख्यान कांहीं संपत नाहीं. केरळांतल्या देवमंदिरांत प्रसंगविशेषीं कूडियाट्टम् हें व्हायलाच हवें.

यात्रकाळि हें नृत्य-नाट्य विशेषें करून नम्पूतिरि ब्राह्मणांचें आहे. हा प्रयोग करणारे ब्राह्मण पढिक वेदशास्त्रसंपन्न असतात. या नाट्याच्या भोंवतीं कांहीं धार्मिक विधि गुंफलेले आहेत आणि त्याचे कांहीं संकेतहि आहेत.

## यात्रकाळि

पुढील चार विभाग मिळून यात्रकाळि परिपूर्ण होतें—( १ ) नालपादम् ( २ ) पानम् ( ३ ) अभिनयम् आणि ( ४ ) हास्यम्. नालपादम्साठीं एक उंच समई पेटवून रंगमंचावर ठेवतात. ' नाल ' म्हणजे चार ब्राम्हण वेद-स्वरांत एक प्रार्थनागीत म्हणतात—

" हे तृक्कायूरवासी शिवशंकरा, तूं आमच्या या नाट्यासाठीं रंगमंचावर उपस्थित हो आणि इथें वावरणारीं भुतें-खेतें तुझ्या तीव्र कटाक्षानें पिटाळून लाव. "

हें गीत गातां गातांच ब्राह्मण त्या समईला प्रदक्षिणा घालतात आणि रंगभूमीवर शंकराचें आगमन झालें असें समजंतात.

दुसऱ्या ' पानम् ' या कार्यक्रमासाठीं सर्व ब्राह्मण दिव्याच्या सभोंवतीं बसून एका विशिष्ट गीतानें गणपतीचें स्तवन मांडतात. त्यानंतर 'अभिनयम् ' सुरू होतें. एक भस्मचर्चित ब्राह्मण उपरणें कमरेला गुंडाळतो. एक मडकें उलटें करून त्यावर ताल धरतो. मग इतरांपैकीं कांहीं जण त्या तालावर सूर चढवतात. ते ज्या प्रकारचें पद्य गात असतील, त्याला अनुसरून इतर मंडळी मुद्राभिनय करूं लागतात. हें अभिनय-नाट्य थोडा वेळ चालल्या-नंतर मग शेवटचें ' हास्यम् ' सुरू होतें. प्रेक्षकांत हंशा पिकवायचा तर नटानें वेडावांकडा अभिनय तरी केला पाहिजे किंवा एखादें विनोदी गीत तरी गाइलें पाहिजे. अशीं विनोदी गीतें मलयाळम् साहित्यांत विपुल आहेत. तीं एखाद्याची रळी उडवणारीं तरी असतात किंवा असंबद्ध तरी असतात. असंबद्ध गीताचें एक उदाहरण असें—

" अड्डिक्कोल्ला तलिक्कोल्ला
अडुपिन् ती एरिकोल्ला
उरङ्ङल्ला उराङ्ङ् याल पिन्नुणरोल्ला
उदिक्कोल्ला अस्तमिक्कोल्ला भगवान् पोलुम् "

'झाडू मारूं नका, पाणी शिंपडूं नका, चुलींत आग घालूं नका. (मग खा काय ?) झोंपूं नका, झोंपलांत तर जागे होऊं नका. (म्हणजे मरा, असेंच ना ?) सूर्यानें उगवूंहि नये अन् मावळूंहि नये. (म्हणजे त्या बिचाऱ्यानें करायचें काय ?)'

असें आहे हें यात्रकाळि. पेरुमाळांच्या सत्ताकालांत इ. स. च्या आठव्या शतकानंतर केरळांत यात्रकळीचा उदय झाला आणि त्याला कारणहि तसेंच घडलें–

पेरुमाळ राजाच्या दरबारांत एक दिवस कांहीं बौद्ध भिक्षु उपस्थित झाले. ते विद्वान् आणि वादपटु होते. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठीं ते आले होते. त्यासाठीं दरबारी हिंदु पंडितांना त्यांनीं वादाचें आव्हान दिलें. सर्वांसमक्ष वादाची अट ठरली ती अशी–हिंदु हरले, तर त्यांनी 'बुद्धं सरणं गच्छामि' असें म्हणावें आणि बौद्ध हरले, तर त्यांनीं पीतवस्त्रें टाकून पुनश्च हिंदुधर्मांत यावें. राजाच्या साक्षीनें त्यांच्या वादाला प्रारंभ झाला. अटीतटीचा सामना उभा राहिला. त्यांत बौद्धांची एकेका मुद्यानें सरशी होऊं लागली. हिंदु पंडितांचे चेहरे उतरले, घामाघूम झाले. त्यांची विजयाची आशा मावळली. एकेक करून त्या सगळ्या पंडितांनीं वादाच्या रणक्षेत्रांतून काढता पाय घेतला. ते पराभूत पंडित तिथून सरळ तृक्कारियूर या क्षेत्रांत आले. त्या महान् शिवक्षेत्रांत देवाला संकट घालून बसले. सतत एकेचाळीस दिवस त्यांचें हें देवद्वारीं धरणें चालू होतें. शेवटच्या दिवशीं एक तामिळ ब्राह्मण तिथें आला. तो ब्राह्मण जणुं त्यांना प्रतिसूर्य भासला. त्यानें त्या धरणेकरी ब्राह्मणांना एक मंत्र उपदेशिला आणि त्या मंत्रानें दिव्याला प्रदक्षिणा घालायला सांगितलें. पंडितांनीं तो आदेश पाळला. त्याचें फळहि लगेच दिसून आलें. अचानक सहा दार्शनिक महाविद्वान् पेरुमाळाच्या दरबारांत उपस्थित झाले. ते कोण, कुठले, कुठून आले, याचा पत्ता लागला नाहीं. 'जैतरे जैत' म्हणून राजदरबारांत गर्वाचें घर करून बसलेल्या त्या बौद्ध आचार्यांना या नव्या षट्शास्त्री पंडितांनीं वादाचें आव्हान दिलें. पुनश्च वाद कडाडला. पण आतां पारडें संपूर्ण फिरलें. बौद्ध पंडितांचा एकहि मुद्दा, एकहि कोटिक्रम टिकेना. ते हरले आणि चंबु-गबाळें उचलून पसार झाले. केरळी पंडितांची अब्रू बचावली.

त्या दिवसापासून ही यात्रकाळि केरळांत भगवत्कृपेचें साधन म्हणून रूढ झाली.

### मोहिनी आट्टम्

केरळांत खास स्त्रियांचें, विशेषतः देवदासींचें जें नृत्य प्रचलित आहे, त्याचें नांव 'मोहिनी आट्टम्.' ही मोहिनी म्हणजे तीच, कीं जिनें समुद्र-मंथनांतून निघालेल्या अमृताचें आत्र-मन दैत्यांना झुलवून, ठकवून, नेमकें देवांच्या हातावर घातलें. मोहिनी आट्टम् हें सामान्यतः भरतनाट्यम् सारखेंच आहे. २५/३० वर्षांपूर्वी दक्षिण मलबारमध्यें हें नृत्य अत्यंत लोक-प्रिय होतें. देवदासींच्या तरुण मुली नट्टुवानाकडून पद्धतशीर शिक्षण घेऊन त्याच्याच नेतृत्वाखालीं या नृत्याचे प्रयोग करीत.



नर्तकी मोहिनी आट्टम्

मोहनीनें शंकरासारख्या वीतराग जोग्यालाहि मदनशरांनीं विद्ध केलें होतें. एवढें अचाट तिचें सामर्थ्य! त्याच भावनेचें उद्दीपन हेंच सूत्र मुख्यत्वें धरून केरळसुंदरी या नृत्याचा विलास करतात. यौवनाची मादकता विविध अंगा-भिनयांच्या द्वारें व्यक्त करणें हें मोहिनी आट्टमूचें वैशिष्ट्य होय! त्या नर्तिकेचे रुणुझुणुते पदाघात जणुं संयम आणि वैराग्य यांच्याच माथीं पडतात. त्या नृत्यांतून रसराज शृंगाराची जणुं पुष्पवाटिकाच बहरते. आणि म्हणूनच समाजांतल्या सभ्य आणि शिष्टवर्गानें या नृत्यापासून स्वतःला आणि आपल्या मुलांबाळांना नेहमींच चार हात दूर ठेवलें आहे.

तंत्रदृष्ट्या मोहिनीआट्टम् आणि भरतनाट्यम् यांत विशेषशी तफावत नसली तरी त्याच्या आविष्कारावर मात्र कथकळीची दाट छाया पडलेली आहे.

आणि म्हणूनच नृत्त आणि नृत्य या दोन्हीं प्रकारांना त्यांत अवकाश मिळाला आहे. या नृत्याच्या मागें अभिजात कर्नाटकी संगीत उभें असतें. त्याला नको रंगभूमि किंवा नको साधनसामुग्रीचें अवडंबर. नर्तिकेची वेषभूषासुद्धा अगदीं साधी. वेष आणि अलंकार यांनीं तारुण्याची नव्हाळी आणि अवयवांचें सौष्ठव झांकळून जाऊं नये, अशी दक्षता त्यांत घेतलेली असते. नर्तिका तलम पण शुभ्र वस्त्र आटपशीर पद्धतीनें नेसते. जशी साडी तशीच काचोळी. शुभ्र आणि तंग. तिच्या सिंहकटीवर ' उदयनम् ' म्हणजे सोन्याची मेखला घट्ट आवळून बसते. नर्तिका आपला केशबंध मस्तकाच्या एका बाजूस कलता असा बांधून, त्यावर जाईजुईचा गजरा माळते. मुखमंडळावर प्रसाधन चूर्णाचा हलकासा हात, चटुल नयनांत काजळरेषा, भुंवयांच्या धनुकल्यांची रेखणी, ओठांवर जरा अधिक लाली, एवढें प्रसाधन झालें कीं, ती निघाली रंगभूमीकडे. ती जणु साक्षात् मोहिनीच बनून येते. भरल्या सभेवर वेधक कटाक्ष फेकूं लागते. कधीं हास्य कधीं रुसवा. मध्येंच लचक तर मध्येंच मुरड. पाठीमागच्या संगीताशीं एकरस होऊन ती आपलें नाजुक नखरेल लास्य फुलवते. प्रेक्षक प्रसन्न होतात, बेहोष होतात. अशा प्रकारें ती प्रेक्षकांच्या अंतरांतल्या शृंगारभावना चाळवून मग रंगपटांत अदृश्य होते.

### कथकळि

आतां मी तुम्हांला केरळच्या एका महान् नृत्यप्रयोगाला घेऊन जाणार आहें. या नृत्याचें नांव आहे कथकळि. केरळाची ही भारताला महनीय देणगी आहे. त्या बद्दल केरळी जनतेनें स्वाभिमानाच्या भावनेनें आपली छाती फुगवली, तर तो गर्व ठरणार नाहीं.

नारळी पोफळींचीं हिरवीगार छत्र-चामरें ढाळून घेणाऱ्या केरळ भूमीवरील एका मंदिराचा प्रशस्त प्राकार. समोरच्या अंगाला चार खांब उभे असून त्यावर एक छत ताणलेलें आहे. त्याला पाना-फुलांची झालर लावलेली आहे. संध्याकाळपासूनच तिथें मृदंगवादन सुरू झालें आहे. त्यांतच बासरीचे कोवळे स्वरहि मधूनच डोकें वर काढीत आहेत. त्या रात्रीं तिथें होणाऱ्या कथकळीच्या नृत्यप्रयोगासाठीं जनतेला निमंत्रण देण्यासाठीं तो वाद्यांचा गजर आहे.

कथकळि म्हणजे सान-थोरांच्या रसिक आत्म्याला बालपणाचा मधुर अनुभव घडवणारी रात्र. त्यामुळें सर्वांनाच त्या रात्रीची ओढ लागली आहे. माणसें कामावरून लवकर घरीं आलीं. जेवणीं-खाणीं झटपट उरकून मंदिराच्या मार्गाला लागलीं. प्राकारांत मंडपघसणी झाली. रात्रीचा पहिला प्रहर संपला. रंगपटांत सोंगें सजत आली. कोणीतरी समईत तेलवात करून ती रंगभूमीच्या समोर आणून उभी केली. समई म्हणजे लहानसहान नव्हे; तर माणसाच्या उंचीची. सहा शेर तेल मावेल एवढें भलें भक्कम तिचें चाडें. तिच्या अनेक ज्योती वर्तुळाकार परजळूं लागल्या. दुसऱ्या एकानें रंगभूमीवर येऊन नर्तकासाठीं दोन मध्यम उंचीचीं चौरंगवजा आसनें मांडलीं. चेंडा नांवाचें वाद्य दुगुणींत वाजूं लागलें. त्याची लय वाढतां वाढतां कळसाला पोंचली अन् वादक घामानें निथळला.

आणि मग अचानक वाद्य थांबलें. त्याची सम पडते न पडते एवढ्यांत दोन कृष्णवर्णाचे उघड्या अंगाचे पुरुष पुढें आले. त्यानीं रंगीबेरंगी एक चादरवजा पडदा अंतरपाटासारखा धरला. त्याच्यामागें उभें राहून गायक देवतास्तवनाचे ‘वंदन श्लोकम्’ गाऊं लागले. वंदन संपतांच ‘थोडयम्’ म्हणजे भक्तिनृत्य. दोन कलाकारांनीं तेंहि पडद्याआडच पार पाडलें. प्रेक्षकांना ऐकूं आली ती फक्त घुंगुरांची रुम्झुम्! प्रेक्षकांना आतां धीर निघेनासा झाला.

पण एवढ्यांत पडदा अर्धवट खालीं झाला. नर्तक कलाकारांचा छातीपासून वरचा तेवढा भाग प्रेक्षकांना दिसूं लागला. लोकांना तो पडदा म्हणजे कार्यसिद्धीच्या आड येणाऱ्या विघ्नाप्रमाणें वाटला. पण इतक्यांत शंख, ढोल, मड्डुल या वाद्यांचा नाद एकवटून दुमदुमला. जाणते लोक समजले, कीं ही नृत्य सुरू होण्याची खूण. मग पडदा संपूर्ण दूर झाला. कलावंत आणि प्रेक्षक यांचें अन्योन्य दर्शन घडलें. गायक रंगभूमीच्या एका अंगाला जाऊन बसले. त्यानीं जयदेवाच्या गीत गोविंदांतील एक अष्टपदी सुरू केली—

“ मञ्जुलतरकुञ्जतलकेलिसदने
विलसरतिरभसहसितवदने
प्रविश राधे माधवसमीपमिह
.... .... .... ”

नर्तकानें एकदम नाचायला प्रारंभ केला नाहीं. तो समोर उभा राहून नुसते नेत्राभिनय दाखवूं लागला. त्याच्या जोडीला भुंवयांचें आकुंचन-प्रसरण. भूमिकेच्या अंतरांतले आशय तो केवळ नेत्रपल्लवीच्या द्वारें प्रेक्षकांकडे पोंचवूं लागला. त्याच्या जोडीला मुद्राभिनयहि होतेच. थोडावेळ ही कलाकुसरी झाल्यावर मग एक आट्टकथा म्हणजे पौराण प्रसंग सुरू झाला. नर्तक स्वतःच्या मुखानें एकहि शब्द न उच्चारतां आख्यानांतला अर्थ पदन्यास, मुद्रा अन् हावभाव यांच्याद्वारें व्यक्त करूं लागला. मांडलेलें आख्यान आकार धरूं लागलें. कथा पुढें पुढें जाऊं लागली. प्रेक्षक तन्मय होऊन कथेच्या रसप्रवाहांत वाहूं लागले. त्या बेहोषींतच रात्र संपली, दिशा फटफटल्या अन् जणूं अमृताच्या ताटावरून उठल्यागत प्रेक्षकांनीं आपलीं आसनें झटकलीं.

केरळांत कथकळीचा आनंदोत्सव होतो तो असा !

' कथकळि ' हा जोडशब्द आहे. कथा म्हणजे गोष्ट हें सर्वांना माहीत असलें तरी ' कळि ' म्हणजे नाट्य हें सांगितलें पाहिजे. कथकळीचा अर्थ होतो, कथेवर आधारलेलें नृत्य-नाट्य. केरळ आणि त्यांतल्यात्यांत त्रिवांकुर ( त्रावणकोर ) हें कथकळीचें माहेरघर होय. कथकळि ही नृत्यकला स्वतंत्र रूपानें अस्तित्वांत आल्यास अवघीं तीन-चारशें वर्षें झालीं, तरी तिचें मूळ शोधायला मात्र पंधराशें वर्षांचा भूतकाळ ओलांडून मागें गेलें पाहिजे. ' शिलप्पाधिकारम् ' मध्येंहि त्याबद्दल उल्लेख सांपडतो.

अशीं अनेक पंथीय नाटकें केरळांत उगम पावलीं अन् काळाच्या ओघांत विलीनाहि झालीं. त्या सर्व कलाप्रकारांतून कथकळीनें थोडीबहुत उसनवारी केलेली असली, तरी तिच्यावर खरा प्रभाव आहे तो प्राचीन 'कूडियाट्टम्'चा. शिवाय आर्य अन् द्रविड यांच्या संयुक्त प्रभावाखालीं केरळांत ज्या ज्या कला-संस्था विकसित झाल्या, त्या सर्वांकडून कथकळीला अंशभाग मिळा-लेला आहेच.

दक्षिणेंतले द्रविड लोक हे प्राचीन काळापासून भगवती शक्तीचे उपासक आहेत. त्यांच्या शक्तिपूजेंत नृत्याला फार महत्त्व होतें. हें नृत्य वीर आणि रौद्र रसांवर आधारलेलें असे. देवीच्या उत्सवप्रसंगीं, तिनें शुंभ, निशुंभ,

महिष, इत्यादि दैत्य-दानवांवर कसा विजय मिळवला, ते पराक्रमाचे कथाप्रसंग तिकडील कलाकार नाट्यरूपानें करून दाखवीत. त्याप्रसंगीं देव-दानवांचीं सोंगें अनुरूप मुखवटे घालून सजवीत आणि राक्षसांच्या भूमिका करणारे नट ' अललल डुर्र ' करीत रंगभूमीवर थयथया नाचत.

वसाहतकाळांत केरळमध्यें जे आर्य लोक गेले, तेहि आपलें नृत्यनाट्य समागमें घेऊन गेलें होते. सणासुदीस ते आपलें नृत्य करीत. मुख्यतः मंगलकार्याच्या प्रसंगीं, नवस फेडण्याच्या वेळीं आणि एखाद्या सार्वजनिक व्रतोत्सवाच्या निमित्तानें हे प्रयोग होत असत. त्यांत बरेच लोक भाग घेत. देव-दानवांचें खड्गयुद्ध, मूकनाट्य, हासपरिहास, असे त्याचे विविध प्रकार असत.

नंतर रामायण-महाभारतांतल्या कथा, भास-कालिदास यांचीं नाटकें, यांतून प्रसंग निवडून मलयाळम् भाषेंत त्यांचीं आख्यानें तयार करणें हा प्रकार सुरू झाला. त्या नाट्याला ' प्रबंध कुत्तु ' असें म्हणत. चाक्यार जातीचेच लोक याचेहि प्रयोग करीत. यांत जो कथा सांगणारा तोच नाचणाराहि असायचा. त्याची मृदंगाची साथ नम्बियार जातीच्या माणसानें करायची अन् कासाळूं वाजविणारी स्त्री नङ्गियार जातीची असायची. ज्या मानानें चाक्यार अधिक कसबी अन् हजरजबाबी, त्या मानानें ही नृत्यकथा रंगदार व्हायची. या प्रयोगांत मुद्राभिनय आणि अंगविक्षेप या दोन गुणांना प्राधान्य असे. कथकळींतहि याच दोन गुणांना महत्त्व आहे अन् तें कूडियाट्टम् मधून आलेलें आहे.

## कृष्णनाट्टम्

कालिकतचा राजा मानवेदन याला कथकळीचा जनक मानतात. तो १७ व्या शतकांत होऊन गेला. त्याच्या पूर्वीं बरींच शतकें केरळांत ' अष्टपदी आट्टम् ' नांवाची एक नृत्यकला प्रचलित होती. 'आट्टम्'चा मलयाळम् भाषेंत नृत्य असा अर्थ होतो. जयदेवाच्या गीत-गोविंद काव्याच्या आधारें त्याचे प्रयोग करीत. मानवेदन यानें त्याच धर्तीवर ' कृष्णपदी ' नांवाचें एक आख्यान रचून तें कलाकारांच्या द्वारें रंगभूमीवर आणलें. हें आख्यान संस्कृतांत होतें आणि श्रावणांत कृष्णजन्मोत्सवाच्या अगोदर ओळीनें आठ

रात्रीं हप्त्याहप्त्यानें त्याचे प्रयोग होत. या नृत्यनाट्याला लोक 'कृष्णनाट्टम्' म्हणून ओळखूं लागले आणि केरळांत तें खूप लोकप्रिय झालें. गाणारा वेगळा आणि नाचणारा वेगळा असा कलाविभाग यांतच प्रथम केला गेला आणि या पद्धतींत दोघांचीहि सोय असल्या-मुळें पुढच्या कथकळींत हीच पद्धत अवलंबिली गेली.



नर्तक–कृष्णनाट्टम्

उत्तर केरळांत होणारा 'कृष्णनाट्टम्'चा बोलबाला दक्षिण केरळांत कोट्टार-कराच्या सामुतिरी राजाच्या कानापर्यंत पोंचला. आपण तें एकदा पाहावें आणि आपल्या प्रजेलाहि दाखवावें, अशी त्याच्या मनांत आकांक्षा उत्पन्न झाली. त्यानें कालि-कतच्या मानवेदनला संदेश पाठविला, कीं 'आपलें कृष्णनाट्टमूचें कलापथक आमच्या राज्यांत पाठवून द्यावें.' त्यावर मानवेदननें त्याला काय प्रतिसंदेश पाठवावा? 'तुमच्या राज्यांतल्या लोकांची माझ्या 'कृष्णनाट्टम्'चें रसग्रहण करण्याची पात्रता नाहीं; सबब आमचें कलापथक तिकडे येणार नाहीं.'

## रामनाट्टम्

सामुतिरी राजा कांहीं सामान्य पुरुष नव्हता. काव्य, नाट्य, यांतलें तोहि कांहीं जाणत होता. मानवेदनचा तो अपमानकारक प्रतिसंदेश त्याला झोंबला.

तो म्हणाला, 'ठीक आहे. मी कांहीं मेल्या आईचें दूध प्यालों नाहीं, तुझें 'कृष्णनाट्टम्' तर माझें 'रामनाट्टम्'!' त्याच्या सुप्त प्रतिभेवरची राख उडाली. तो काव्यरचनेसाठीं कंकण बांधून बसला. त्यानें रामायणाच्या कथेवर एक कथानाटक रचलें. कृष्णनाट्टम्प्रमाणेंच आठ रात्रीं चालेल, इतकें तें प्रदीर्घ होतें. पुत्रकामेष्टि, अवतारम्, स्वयंवरम्, विच्छिन्नाभिषेकम्, खरवधम्, वालिवधम्, तोरणयुद्धम् आणि रामरावणयुद्धम् असे त्याचे आठ विभाग होते.

सामुतिरी राजानें केवळ आख्यानच लिहिलें नाहीं, तर त्यासाठीं उत्कृष्ट नटसंच राजाश्रयाखालीं तयार करून त्याचा केरळांत सगळीकडे प्रचारहि केला. कृष्णनाट्टम्मध्यें नटांना मुखवटे घालण्याची पद्धत होती. सामुतिरीनें मुखवट्यांना फांटा देऊन रंगभूषा आणि अभिनय यांवर विशेष भर दिला.

त्यानें त्या नाट्यांत आणखी एक सुधारणेचें पुढचें पाऊल टाकलें. त्यानें आख्यानाचे फक्त श्लोक तेवढे संस्कृतांत रचले आणि सगळीं पदें मल्याळम् भाषेंत तयार केलीं. त्यामुळें केरळी जनतेला आपल्या भाषेंत त्याचा रस घेतां येणें शक्य झालें. त्यामुळेंच समाजाच्या सर्व थरांत त्याचा सुलभ प्रवेश झाला. त्यांतले श्लोक फक्त विष्कंभकाचें काम करीत आणि पात्रांचें सगळें संभाषण मलयाळम् पदांतून होई. क्वचित् अधेंमधें त्यानें 'दंडक' नांवाची गद्यरचनाहि केली होती. कथानकाला गति देण्याच्या कामीं या दंडकांचा चांगला उपयोग होत असे. अशाप्रकारें सामुतिरी राजानें आपल्या अपमानाचा वचपा तर काढलाच; शिवाय केरळला एक नवी कलाहि बहाल केली.

रामनाट्टम् यशाच्या शिखरावर चढलेलें दिसतांच त्या धर्तीवर मलयाळम् भाषेच्या 'मणिप्रवाळम्' शैलींत अनेक कवींनीं निरनिराळ्या आट्टकथा लिहिल्या. त्याविषयीं जणुं कवींची अहमहमिकाच सुरू झाली. हीं सर्व नाट्यरूप आख्यानकाव्यें पौराणिक साहित्यावरच आधारलेलीं आहेत. बकवधम्, किर्मीरवधम्, कीचकवधम्, नलचरितम्, दक्षयागम् इत्यादि नांवांनीं तीं प्रसिद्ध आहेत. या आट्टकथालेखकांमध्यें कोट्टयम् तम्पुरान, उण्णाई वारियर, अश्वति तिरुनाल, अरियम्मन तम्पि, यांच्या कलाकृति गुणसमृद्ध असून त्या रंगभूमीवर उत्तम वठतात. केरळी जनता या कवींना खूप मानते. पुष्कळशा आट्ट-

कथा तिकडील राजपुरुषांनींहि रचल्या आहेत आणि त्यांच्या कलापथकांना उदार राजाश्रय मिळाल्यामुळें त्यांनीं कथकळीच्या प्रगतीला बहुमोल मदत केली आहे. या आट्टकथासाहित्याचा पुढील मलयाळम् साहित्यावरहि प्रभाव पडल्यांवाचून राहिला नाहीं.

कथकळीची सृष्टि ही पौराणिक सृष्टि आहे. देवांच्या जगांतल्या बहुरंगी घटना, दानवांच्या चढाया, राक्षसांच्या लीला, मानवी नायकाचा धीरोदात्तपणा अशा विविध प्रकारांनीं या नाट्यसृष्टीचा विस्तार होतो. कथकाळि हें एक धार्मिक नृत्य आहे. देवाचा कृपाप्रसाद हें त्याचें उद्दिष्ट आहे. त्यामुळें कथकळीच्या नटनर्तकांवर एक विशेष प्रकारची जिम्मेदारी येऊन पडते. त्यांना केवळ सोंग वठवून भागत नाहीं, तर त्या भूमिकेच्या अंतरंगांत शिरावें लागतें. तें एक साहस असतें आणि अविरत साधना अन् योग्य ती यम-नियमांची शिस्त, यांची कास धरल्यावांचून त्या साहसांत सफलता मिळत नाहीं.



कथकाळि–एक नृत्यमुद्रा

कथकळींत महत्त्वाची गोष्ट ही, कीं नटाला भाषणाची सवलत नाहीं. त्याला जें कांहीं सांगायचें तें नेत्रविभ्रम, अभिनय आणि हस्तमुद्रा यांच्या द्वारेंच सांगावें लागतें. त्यांच्या अभिव्यक्तीचें एकमेव साधन म्हणजे अभिनय. ती एक वेगळी भाषाच असते आणि ती आत्मसात् करायला दीर्घकालीन अभ्यासाची आवश्यकता असते. म्हणूनच कथकाळि नट होण्याची आकांक्षा धरणारा कलावंत वयाच्या बारा वर्षांपासूनच कलरींत जाऊं लागतो. कलरी म्हणजे पूर्वींची युद्ध-

शाळा पण आतांची नृत्यशाळा. कालांतरानें युद्धें बंद पडलीं आणि ज्या युद्धशाळा होत्या त्याच पुढें नृत्यशाळा बनल्या. कथकळि अशा शाळांतूनच वर आली. कथकाळि ही कला सहजसाध्य नव्हे; तिथें 'अभ्यासेंचि प्रकट' व्हावें लागतें.



कथकळींतले कृष्ण-सुदामा

एखादा मुलगा नृत्यशाळेंत दाखल झाला, कीं गुरूच्या हाताखालीं त्याच्या शिक्षणास प्रारंभ होतो. पहिला धडा व्यायामाचा. शरीर डौलदार,

लवचिक अन् तत्पर बनवणें हें पहिलें काम. त्यासाठीं विशिष्ट पद्धतींचा नित्य व्यायाम असतो. त्याच्या जोडीला मालिशहि चालतें. मग सकाळ-संध्याकाळ कांहीं तास अभिनयाचे पाठ दिले जातात. गुरु प्रथम शिष्याला एकेक करून सर्व प्रकारच्या भूमिका शिकवतो. अन् त्यांत प्रावीण्य मिळाल्यावर मग ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें ज्याला त्याला विशिष्ट भूमिकेचा अधिक अभ्यास करायला अनुज्ञा मिळते.

कथकळीचें कलाविश्व हें एक वेगळेंच विश्व आहे. सामान्य मानवाला त्यांत स्थान नाहीं. त्या जगांत वावरतात, ते देव आणि दानव. पराक्रमी वीरपुंगव अन् प्रेमोन्मत्त सुंदर रमणी. या अतिमानवांना अनेक अद्भुत सामर्थ्यें साध्य झालेलीं असतात. त्यामुळें प्रश्न पडला तो हा, कीं हें अति-मानव्य रंगभूमीवर दाखवायचें कसें ? उदाहरणार्थ, राम–रावणांचा प्रसंग घ्या. राम हा मानव असूनहि अवतारी, अतएव अतिमानव. रावणाबद्दल तर बोलायलाच नको. पण दोघांचा प्रकृतिधर्म किती भिन्न ! राम हा सात्त्विक अन् दैवी शक्तींचा पुतळा, तर रावण हा तामस अन् राक्षसी वृत्तींचा उद्रेक. या दोघांचे प्रतिनिधि रंगभूमीवर दाखविणें आणि प्रेक्षकांना ते पटविणें हें मोठें अवघड काम होतें. पण विशिष्ट प्रकारचे मुखवटे, प्रतीकात्मक रंगभूषा आणि विशिष्ट व्यवच्छेदक मुद्राभिनय यांची चतुर योजना करून कथकळीच्या आचार्यांनीं त्याकामीं अपूर्व यश संपादिलें. शिवाय साहित्य, संगीत आणि वाद्य यांचीहि त्याला यथायोग्य जोड दिली. त्यामुळें कथकाळि म्हणजे अनेक घटकांचा सुसंवादी मिलाफ असलेली एक परिपूर्ण कला बनली.

कथकळींत पात्रांच्या तोंडावर जे मुखवटे चढवतात, ते पांच प्रकारचे आहेत. पहिला प्रकार ‘ पच्चा ’ म्हणजे हिरवा. सात्त्विक, सद्गुणी अन् पराक्रमी पुरुषांच्या तोंडावर हा मुखवटा चढतो. ‘ कट्टी ’ हा दुसरा. रावणासारख्या दुष्ट दानवासाठीं त्याची योजना होते. तिसरा ‘ तडी ’ म्हणजे दाढीवाला मुखवटा. निषाद, किरांत यांच्यासाठीं तो वापरतात. ही सोंगाची दाढी वय अन् स्वभाव लक्षांत घेऊन रंगवितात. ‘ करि ’ म्हणजे काळा. हा मुखवटा राक्षसिणींसाठीं बनवतात. आणि ‘ मिनिक्कु ’ म्हणजे गुळगुळीत मुखवटा. तो मानवी स्त्रियांच्यासाठीं वापरतात.

त्याशिवाय किरीट-कुंडलें असतातच. किरीट लांकडांचे बनवितात आणि त्यावर नाजुक नक्षीकाम असतें. त्यावर सोन्याचा वर्ख चढवला, कीं तो समईच्या दीपत्कारांत झळाळूं लागतो. टोपाच्या बुडाशीं तांबडी पट्टी, कडांना मोरपिसाच्या काड्या, मधेंमधें लहान वाटोळे आरसे आणि भोंवतीं हिरवी पत्ररचना, असा हा जडित मुकुट राजपुरुषांच्या मस्तकावर शोभतो. कुंडलें दोन प्रकारचीं असतात. ज्याला कुंडलम् म्हणतात तें कमळाकृति असून कानांच्या खालीं लोंबणारें असतें आणि दुसरें ' चेविकुट्टु ' हें लहान, गोल, अन् खोलगट असून तें कानांच्या वर घालतात.

चेहरेपट्टी रंगवतांना सात्त्विक पात्रांचा चेहरा फिकट हिरव्या रंगाचा हात देऊन भुवया काळ्या अन् ओंठ लाल करतात. कपाळावर विविधरंगी नक्षी रेखून तिला शुभ्र ' चुट्टी ' म्हणजे किनारपट्टी काढतात. राक्षसपात्रांच्या भुवयावर लाल पांढऱ्या रेषा काढतात. कानावर त्याच दोन रंगाचीं लंब-वर्तुळें आणि ओंठावर लाल मिशांचे आंकडे बसवतात.

वर एका ठिकाणीं मुद्रांचा उल्लेख झालेला आहे. विशिष्ट आशयाचा आविष्कार करण्यासाठीं दोन्ही वा एका हाताच्या अंगुलीची विशिष्ट प्रकारें गुंफण किंवा रचना म्हणजे मुद्रा. भारतीय नृत्यकलेंत मुद्रांची महती फार आहे. मुद्रा सांकेतिक अर्थ व्यक्त करीत असते. ती नर्तकाची एक वेगळी भाषाच असते, मुद्रांच्या द्वारेंच तो आपल्या भूमिकेचें प्रभुत्व, तिचा स्वभाव, तिचा अभिनिवेश या गोष्टी प्रेक्षकांना कळवीत असतो. मुद्रा बिनचूक तर हवीच; पण त्याबरोबर तिला अनुकूल असे मुखमंडळाचे आविर्भावहि हवे. तरच ती योग्य अर्थाचें वहन करूं शकते. मुद्रेबरोबर नर्तकाचें समग्र व्यक्तिमत्त्वच एकदम बदललें पाहिजे. मुद्रा तीच; पण ती विशिष्ट अभिनयाच्या जोडीनें ' अमृत ' असा अर्थ दर्शवीत असेल; तर अभिनय बदलला कीं त्याच मुद्रेचा ' विष ' असा अर्थ व्हायलाहि वेळ लागत नाहीं. हें सगळें शास्त्र ठरलेलें आहे. नर्तकानें जें दाखवलें त्यांतलें वर्म समजायला समोरचा प्रेक्षकवर्गहि बऱ्याच अंशीं त्यांतला जाणकार असावा लागतो. तरच दोघांच्या मनाचा संवाद जमतो. कथकळीच्या शास्त्रांतल्या चौवीस प्रमुख मुद्रा आहेत. त्यांच्या नामावळीचा श्लोक पुढें देतों—

“ हस्तपताको मुद्राख्यः कटको मुष्टिरित्यपि ।
कर्तरीमुखसंज्ञश्च शुकतुंडः कपित्थकः ॥
हंसपक्षश्च शिखरो हंसास्यः पुनरंजलिः ।
अर्धचन्द्रश्च मुकुरो भ्रमरः सूचिकामुखः ॥
पल्लवस्त्रिपताकश्च मृगशीर्षाह्वयस्तथा ।
पुनः सर्पशिरः संज्ञो वर्धमानक इत्यपि ॥
अराल ऊर्णनाभश्च मुकुलः कटकामुखः ।
चतुर्विंशतिरित्येताः करशास्त्रज्ञसम्मताः ॥ ”

या स्थूलमुद्रा आहेत. या प्रत्येकीचे पुढें अनेक सूक्ष्मातिसूक्ष्म भेद होत जातात.

कथकळीच्या नर्तकसंघांत एकूण बारा लोक असतात. चार गाणारे, चार नाचणारे अन् चार वाजवणारे. वाद्यांमध्यें ‘ चेंडा ’ हें प्रमुख वाद्य. तें साधारण ढोलाच्या जातीचें असतें. दुसरें ‘ मड्डलम् ’ म्हणजे मृदंगाच्या जातीचें ढोलकें. तें बोटांनीं वाजवतात. एक मोठा तास असतो. त्याला ‘ चेंगालम् ’ म्हणतात. शिवाय कासाळू, बीन, मुरली, अशीं आणखीहि कांहीं वाद्यें साथीला घेतात. हें सगळें मिळून कथकळीचें वाद्यवृंद तयार होतें. वादकांनीं प्रथम वातावरण तयार केल्यावर नृत्याची नांदी होते.

नंतर मुख्य नर्तक रंगभूमीवर प्रवेशतो. ‘ पुडापड्डा ’ या प्रकारानें तो अभिनयाला प्रारंभ करतो. त्याचेहि दोन प्रकार असतात. ‘ नोटकलासम् ’ आणि ‘ नीलपदम्. ’ पहिल्या प्रकारांत केवळ नेत्रविभ्रम अन् दुसऱ्या प्रकारांत डोळ्यांबरोबरच अंगविक्षेप करायचे असतात. नंतर ‘ मेलापदम् ’ला प्रारंभ होतो. मेलापदम् म्हणजे पदन्यास. यांत नर्तक ताल पकडून नाचूं लागतो. नृत्याला प्रारंभ शृंगाररसानें होतो अन् शेवट अद्‌भुत किंवा शांत या रसानीं होतो. दुर्गुणांवर सद्‌गुणांचा अन् पापावर पुण्याचा विजय दाखवणें आणि मानवी मनाला उदात्त अशा नैतिक भूमिकेवर आरूढ करणें हें कथकळीचें उद्दिष्ट होय. या नृत्याला अशा प्रकारें नैतिक तत्त्वज्ञानाची बैठक आणि धर्माची आधारशिला लाभलेली आहे.

अशा प्रकारें शास्त्र अन् संकेत यांच्या बांधावळींत कथकाळि स्वतःचा मांड मांडून बसली असतां अचानक एके दिवशीं या वृक्षाच्या बुंध्याला एक नवीनच फांदी फुटली. इतकेंच नव्हे, तर फळींफुलीं बहरलीहि. त्या शाखेचें नांव 'ओट्टन् तुळ्ळल' आणि तिच्या जनकाचें नांव कुंचन् नम्पियार! केरळी कलाक्षेत्राच्या नभोवितानांत हा एक नवाच तारा धुमकेतूसारखा उगवला. त्याची जीवनकथा मागच्या प्रकरणांत सांगितलीच आहे. इथें फक्त तुळ्ळल नृत्याशीं संबंध असलेला तेवढाच त्याचा चरित्रभाग सांगायचा राहिला आहे.

## ओट्टन् तुळ्ळल

एक दिवस त्या नगरांतल्या कृष्णमंदिरांत 'कूत्तु'चा प्रयोग चालला होता. जेव्हां जेव्हां मंदिरांत कूत्तुचा प्रयोग उभा राहील, तेव्हां तेव्हां तो करणाऱ्या चाक्यारला मिडाऊ वाद्याची साथ नम्पियार जातीच्या माणसानें करायची, हा नियम ठरलेला. त्या दिवशीं वादकाला कांहीं अडचण आली, म्हणून त्यानें त्या कामीं कुंचनची योजना केली. चाक्यार जेव्हां 'पदम्' गाईल तेव्हां त्याला साथ करायची अन् तो पदमूचें साभिनय व्याख्यान करूं लागला, कीं स्वस्थ बसायचें हें नाम्पियारचें काम. या स्वस्थ बसण्यांत त्या रात्रीं कुंचनला जरा डुलकी आली. पुढच्या पदाला तो सावध राहिला नाहीं. चाक्यारला तेवढेंच पुरलें. त्यानें आपल्या भाषणांत कुंचन्ची खरपूस हजेरी घेतली. भरल्या सभेंत त्याला हास्यास्पद करून सोडलें. कुंचन्ला उलट उत्तर द्यायला तिथें सवड नव्हती. 'कूत्तु' हा एक धार्मिक, पवित्र प्रसंग. त्यावेळीं चाक्यार कोणाला कांहींहि बोलला, तरी त्याला कोणीं प्रतिवाद करायचा नाहीं, हा अगदीं सक्त नियम. त्यामुळें कुंचन्ला तो 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' सहन करावा लागला. प्रयोग संपल्यावर त्या अपमानाच्या दंशानें फणफणत तो घरीं आला.

पण चाक्यारनें राखेवर नव्हे; तर एका रसरसत्या इंगळावर पाय दिला होता. त्याचें प्रायश्चित्त त्याला दुसऱ्या दिवशींच मिळालें. तो मंदिरांत कालच्या पुढचें आपलें कथानाट्य सुरू करतो न करतो, एवढ्यांत मागच्या अंगाला

नमनाची ललकारी उठली. कोणीतरी एक नर्तक तिथें चौथऱ्यावर उभा राहून



तुळ्ळल नर्तक

मुस्वर कंठानें गणपतीचें स्तवन करीत होता. ' हा काय प्रकार आहे ' म्हणत मंदिरांतले कांहीं लोक त्या बाजूला गेले. पहातात, तों एक विचित्र पण निर्भय असा नर्तक खेळ मांडून उभा आहे, सर्वांगी चंदनाचा लेप, चेहऱ्याची रंग-रंगोटी अन् त्यावर कुसरीची रेखणी. मस्तकीं किरीट, गळ्यांत स्फटिकांच्या माळा, अवयवांवर पोकळीच्या फुलांचें मंदसुगंधी, ताजे, टवटवीत गजरे, अशी त्याची अभिनव वेषभूषा होती. त्याहिवर म्हणजे त्याच्या डोळयांत तरल विभ्रम अन् पायांत जणु वीज होती.

कोण होता तो नर्तक ? दुसरा कोणी नव्हे, तर आदल्या रात्रीं चाक्यार-कडून अपमानित झालेला अन् भरल्या सभेनें उपहासिलेला तोच कुंचन नम्पियार ! पाहते लोक कांहीं क्षण विस्मयानें स्तब्धच झाले ! पण कुंचननें त्यांच्या विस्मयाला फार वेळ सवलत दिलीच नाहीं.

त्यानें लगेच ' कल्याणसौगंधिकम् ' हें आख्यान सुरू केलें. द्रौपदीच्या आग्रहावरून भीमसेन सहस्रदळ कमळें आणण्यासाठीं हिमालयांत जातो, वाटेंत त्याची वृद्ध मारुतीशीं गांठ पडते, दोघांची खडाजंगी होते, भीमाचा त्यांत गर्वज्वर उतरतो, भीम तिथून पुढें जातो आणि कुबेराशीं युद्ध करून द्रौपदीचीं आवडतीं कल्हार कमळें घेऊन परत येतो; असें तें महाभारतांतलें आख्यान आहे.

कुंचन् आपल्या ओघवती वाणीनें तें आख्यान साकार करूं लागला. भीम–मारुति संवाद हा त्यांतला वाचिक समरप्रसंग. भीम त्या जराजर्जर कपिश्रेष्ठाला म्हणतो—

" ए माकडा ! वाटेंतलं तुझं आडवं शेपूट जरा बाजूला घे. मी भीम आहें भीम ! माझ्यापुढें तुझ्या गमजा चालायच्या नाहींत. दुसऱ्याची वाट अडवून बसूं नये, एवढा साधा धर्मसुद्धा तुला कळूं नये ? "

आणि त्यावर हनुमंतानें दिलेलें उत्तर जेव्हां कुंचन बोलूं लागला, तेव्हां तर श्रोते हवेंत तरंगूंच लागले. मारुतीनें भीमाला म्हटलें—

" भीमा, अरे तूं तर खूपच बोललास. तूं स्वतःला धार्मिक समजतोस ? काय आश्चर्य आहे ! अरे, पांचाली नांवाच्या एका स्त्रीला पाहून तुम्ही पांचहि बंधु पागल बनलांत. सर्वांनीं एकदम तिचा हात धरलात. हाच तुमचा धर्म ना ? ती मागते त्याला तुम्हीं मान तुकवतां. आहांत खरे धार्मिक पुरुष ! एका स्त्रीला पांच नवरे ! अरे, आम्हीं शेपटीवालीं माकडंसुद्धा असला अधर्म कधीं आचरीत नाहीं !..."

जमलेल्या प्रेक्षकांत हास्याचा खळखळाट उठला. देवळांतले ' कूत्तु ' पाहणारे लोक म्हणाले, ' बाहेर कांहीं तरी मौज चालली आहे; जाऊन पाहूं.' एक उठला, त्याच्या पाठोपाठ दुसरा उठला. सभामंडप ओस पडला. चाक्यार बिचारा नाचतो आहे, घसाफोड करतो आहे, पण गेलेल्यापैकीं एकहि प्रेक्षक परतला असेल तर शपथ ! शेवटीं त्यालाहि आपला प्रयोग गुंडाळून बाहेर यावें लागलें.

बाहेर काय नुसता जल्लोष चालला होता. कुंचन नम्पियारच्या रसवंतीचे फुटाणे उडत होते. सरळ, साधी, लोकांना समजेल अशी भाषा. तिला अभिजात विनोदाची झालर. रसवंतीला सहज अभिनयाची जोड. आणि लोकभाषेंतील ढंगदार पदें. मध्येंच रंगभूमि सोडून तो लोकांत मिसळत होता. लोकहि त्याच्याशीं लगट करीत होते. सारा थाट सुंदर मांडला होता. त्या रात्रीं तांबडें फुटेपर्यंत लोकांनीं आलोचन जागरण केलें. नम्पियारच्या उपहासगर्भ विनोदानें सारे प्रेक्षक पोटांत वेंठ येईतों हसले.

आणि त्याच रात्रीं सर्वसामान्यांना समजेल अशी कथकळीची एक लोकाभिमुख कला अवतरली. ' तुळ्ळल ' या नांवानें ती पुढें प्रसिद्धीस आली. केरळाच्या आम जनतेनें तिला आपल्या हृदयांत स्थान दिलें. कुंचन्च्या प्रति-

भेनें तिच्यसाठीं एक, दोन, नव्हे; तर चौसष्ठ तुळ्ळल आख्यानें रचलीं आणि तीं रंगभूमीवर जनतेला सादर केलीं. त्यानें आपलें समग्र जीवनच तुळ्ळल नृत्याला समर्पून कृतार्थ केलें. तुळ्ळलची आजची जडण-घडण, वेषभूषा अभिनयाची रीत, ही सारी त्या कलेला कुंचन्‌ची देणगी आहे. आजहि 'ओट्टन् तुळ्ळल'चें जनतेंतलें आकर्षण कमी झालेलें नाहीं. लोक तिला गरिबांची कथकळि असेंच म्हणतात.

मलयाळम् भाषेंत 'तुळ्ळल' शब्दाचा अर्थ द्रुतगतीचा पदन्यास आणि तालाच्या आधारें केलें जाणारें नृत्य असा आहे. याचे तीन प्रकार आहेत. 'ओट्टन्' 'परयन्' आणि 'सीथंकन्.' या तीन प्रकारांपैकीं 'ओट्टन्' हाच नृत्यप्रकार आजमितीस जिवंत आणि सचेतन आहे. ओट्टन् तुळ्ळल हें कथकळीच्या नियमांवर आणि शास्त्रीय तत्त्वांवर आधारलेलें असलें, तरी त्यांत तंत्राचा अवास्तव बडेजाव नाहीं. तें नियमबद्ध असूनहि मुक्त आहे. शिवाय तें जनतेच्या जीवनाशीं निगडित असल्यामुळें त्याला एक निराळीच गोडी प्राप्त झाली आहे. सगळ्या तुळ्ळलकथा पुराणांतूनच घेतलेल्या असल्या, तरी कुंचननें त्यांना केरळी जीवनाचें एक मजेदार पुट दिलें आहे. त्याच्या आख्यानांतले स्वर्गीय देव आणि पाताळींचे दानव हे केरळभूमीवर वावरणारेच वाटतात. किंबहुना तीं केरळांतल्या सद्‌गुण-दुर्गुणांचीं प्रतीकेंच असतात.



नर्तकाचा पृष्ठभाग

कुचन जेवढा विनोदी तेवढाच स्पष्टवक्ता होता. स्वार्थ आणि दंभ यांच्यावर उपहासगर्भ कोरडे ओढतांना त्यानें कोणाचीहि पत्रास ठेवली नाहीं. गरीब आणि बाळ्याभोळ्या जनतेचा तो प्रतिनिधि आहे. म्हणूनच आजहि ओट्टन् तुळ्ळलचा प्रयोग आहे असें कळतांच केरळी जनतेचें मन प्रफुल्लित होतें. डोळ्यांच्या पणत्या आणि

कानांचे द्रोण करून जनसमुदाय त्या विनोदरसाचे थेंबथेंब गोळा करण्यासाठीं प्रयोगाच्या ठिकाणीं धावत जातो.

तुळ्ळलमध्यें नर्तक एकटाच असतो. त्याला मद्दुलम्, झांज व सूर या वाद्यांची साथ असते. नर्तक प्रथम रंगभूमीवर येऊन एक पद म्हणतो. नंतर त्याचा अभिनयाच्या द्वारें अर्थ व्यक्त करतो. साथीदार चांगला असला, तर नर्तक पदाचा एकच चरण म्हणतो. मधूनच विनोदी कोट्या, श्रोत्यांची थट्टा, कधीं द्रुतलयींत पदन्यास, कधीं स्वस्थ उभें राहून विश्रांति घेणें, अशा विविध प्रकारांनीं तो आपल्या प्रयोगाला रंगत आणतो.

रंगभूषा आणि पोषाख यांतहि त्यांचें कल्पक वैचित्र्य असतें. कमरेला करगोटा, त्यांत तांबूस पांढऱ्या रंगाच्या कापडाची तीन इंच रुंदीची लांबच लांब पट्टी अशा प्रकारें गुंफलेली घोळवलेली, कीं तिचा गुडघ्यापर्यंत लोंबणारा परकर दिसावा. तिच्यावर लाल कापडाचा एक तुकडा बांधलेला, अंगावर मण्यांचे अलंकार. किरीट नक्षीदार तसाच मणि आणि खडे यांनीं जडित. त्यावर एक नागफणी. चेहऱ्यावर या कानापासून त्या कानापर्यंत पुढून एक पांढरा पट्टा. त्याच्या अंतर्भागांत हिरव्या रंगाची हलकी छटा. ओटच नव्हे, तर डोळ्यांच्या कडाहि लाल केलेल्या. कपाळावर जातिविशिष्ट चिन्ह आणि पायांत चाळ.

असा असतो आजच्या तुळ्ळल नर्तकाचा अवतार. तो रंगभूमीवर प्रविष्ट होतांच प्रेक्षकांकडून पहिली हास्याची फैर झडते, ती केवळ त्याच्या विचित्र वेषपरिवेषासाठींच. मंदिरांतल्या उत्सवांत तुळ्ळल नृत्याचे प्रयोग तर होतातच; शिवाय, धनिक लोक घरच्या लग्नसमारंभांतहि ते घडवून आणतात. वऱ्हाडी मंडळीला ती जणूं हास्यरसाची मेजवानीच होते. तुळ्ळल नृत्य बहुधा दुपारच्या वेळीं केलें जातें आणि दोन-अडीच तास त्याचा प्रयोग चालतो.

केरळांत इ. स. १८६० पर्यंत कथकळि नृत्याचा खूप गाजावाजा झाला. पण इतक्या लोकप्रिय अन् शास्त्रशुद्ध कलेलाहि नियतीचा चक्रनेमिक्रम बाधल्यावांचून राहिला नाहीं. त्यानंतर सुमारें पाउणशें वर्षें कथकळि नृत्यकला जीवन्मृत होऊन पडली होती. त्यानंतर तिला पुनश्च चेतना देण्याचें, तिच्यांत प्राण ओतण्याचें महत्कार्य महाकवि वळ्ळत्तोळ यांनीं केलें. १९३० सालीं

केरळांत ' केरळकलामंडलम् ' नांवाची एक संस्था स्थापन करून वळ्ळत्तोळ यांनीं याच संस्थेच्याद्वारें कथकळीला पुनश्च उर्जितदशा आणली. एक उत्कृष्ट नटसंच निवडून शिकवून निष्णात केला. तो नृत्यसंघ बरोबर घेऊन ते साऱ्या भारतभर हिंडले. जागोजागीं त्यांनीं कथकळीचें डोळ्यांत भरेल अन् स्मरणांत राहील असें प्रदर्शन केलें. ब्रह्मदेश, मलाया, इत्यादि भारताच्या शेजारी देशांतहि त्यांनीं दौरा काढला. या व्यापक संचारांत त्यांना जो द्रव्य-लाभ झाला, त्याच्या साहाय्यानें १९३७ सालीं चेरुमुरुथि या गांवीं त्यांनीं केरळ कला मंडळाची स्वतंत्र इमारत बांधली. १९४१ सालांत त्यावेळच्या कोच्चिन सरकारनें ती संस्था स्वत:च्या अधिकाराखालीं घेऊन श्री. वळ्ळत्तोळ यांना तिचें संचालक नेमलें.

आजमितीस कथकाळि पुनश्च नव्या जोमांत आली आहे. श्री. गोपीनाथ, श्री. रागिणीदेवी, श्री. माधवन् कृष्णन्, श्री. केनु कृष्ण कुट्टी, श्री. शिवरामन्, श्री. उदयशंकर, श्री. रामगोपाल, श्री. शांताराव या स्त्री-पुरुष कलापंडितांना कथकळीच्या आजच्या ऊर्जस्वल भाग्योदयाचें श्रेय दिलें पाहिजे.





# मण उत्सव.........

कवींच्या गणना प्रसंगीं कालिदासाच्या नांवानें जसें पहिलें बोट घालायचें, तसेंच केरळी उत्सवांच्या बाबतींत 'तिरु ओणम्'च्या नांवानें घालावें लागेल. केरळचा हा एक जातिधर्मनिरपेक्ष असा राष्ट्रीय उत्सव आहे. त्याला आजकालची नव्हे; तर युगायुगांची परंपरा लाभलेली आहे. एका अंगानें तो एका पुण्यस्मृतीचा स्मारक उत्सव आहे; तर दुसऱ्या अंगानें तो ऋतूत्सवहि आहे.

शरदाला समागमें घेऊन आश्विनमास उगवतो. श्रावणसरी थांबलेल्या असतात. ढगांचा कापूस गोरा होतो. धरित्री सर्वत्र प्रसन्न दिसते. तिच्या हिरव्या शालूवर सोनसळ्यांचा पाऊस अधून मधून जरीचें काम करून जातो. फसल पसवून डोलूं लागते. शारदीय फळें आणि शाकभाज्या झाडांवर अन् मांडवांवर डोलूं लागतात. पुष्पसंपदा बहरून येते. जिकडे पाहावें तिकडे दृष्टीला सुखच सुख होतें. निसर्गातला हा आनंद-उल्हास माणसांच्याहि अंतरांत नकळत शिरतो. त्यानांहि गावें, नाचावेंसें वाटतें. आणि नेमका त्याच काळांत ओणम्‌चा उत्सव केरळी जनतेच्या या सर्व मनकामना पूर्ण करण्यासाठीं पुढें येतो.

## तिरु ओणम्

ओणम् हा दहा दिवसांचा उत्सव आहे. आपल्याकडे आश्विन शुद्ध प्रतिपदेला नवरात्रांचा घट बसतो, तशीच आणि त्याच दिवशीं ओणम्‌ची सुरुवात होते. आपलें नवरात्र जसें दसऱ्याला संपतें तसाच ओणम्‌हि दहा दिवसांत समाप्त होतो. ओणम् म्हणजे श्रवण नक्षत्र होय. वामनरूपधारी

भगवान् विष्णु ही त्याची देवता आहे. म्हणून केरळी जनतेला हें नक्षत्र पूज्य ठरलें आहे. या उत्सवाला ते हस्त नक्षत्रापासून सुरुवात करतात. हस्तापासून श्रवण दहावें येतें. म्हणून हा दहा दिवसांचा उत्सव होतो. केरळाचें समस्त वैभव आणि राजभोग प्रदर्शित करणारा हा प्रमुख सण आहे. आबाल-वृद्ध सर्व मंडळी या उत्सवांतला आनंद उपभोगतात.

मुलांचें काम मुख्यत्वें फुलें तोडून आणण्याचें असतें. या दिवसांत केरळांतलीं मुलें जथ्याजथ्यानीं फुलांच्या परड्या घेऊन हिंडतांना दिसतात. तीं उद्यानांतून हिंडतात, कुंपणावरून डोकावतात आणि रानेंहि वळंघतात. घरापुढचें आंगण झाडणें आणि तें गोमयानें स्वच्छ सारवणें हें बायकांचें काम. सारवलेल्या अंगणांत विविध आकृतींच्या सुरेख रांगोळ्या काढणें हेंहि बायका-मुलीच करतात. रांगोळ्या झाल्या, कीं मुलें परड्या घेऊन पुढें सरसावतात. त्या स्वच्छ सुंदर भूमीवर रंगसंगति साधून तीं फुलांची वर्तुळाकार रचना करतात. दहा दिवस ही रंगवल्ली आणि पुष्पशोभा चालते.

शेवटचा दिवस ओणम्‌चा म्हणजेच श्रवण नक्षत्राचा. त्या दिवशीं वामनाची स्थापना आणि पूजा करायची असते. वामनाला ते 'तृक्काक्करप्पन्' असें म्हणतात. तृक्काक्करप्पन् म्हणजे तृक्काक्करा गांवीं असलेला देव.

तृक्काक्करा हें एक गांव असून तें मध्य केरळांत वसलें आहे. या मंदिराचे उल्लेख तमिळच्या संघम् साहित्यांतहि आढळतात. प्राचीनकाळीं दूरवरचे भाविक यात्रेकरू या ठिकाणीं तृक्काक्करप्पन्‌च्या म्हणजे वामनाच्या दर्शनार्थ येत. दहा दिवस इथें मोठा उत्सव होत असे. झामोरिन, त्रिवांकुरचा कुलशेखर अन् कालिकतचा राजा हे परस्पर वैरी खरे; पण युद्धाव्यतिरिक्त या वामनाच्या यात्रेंत एकत्र जमून ते एकमेकांचीं तोंडें पाहात. टिपू सुलतानाच्या आक्र-मणापर्यंत हें सर्व चालू होतें. पण त्यानें मंदिराची नासधूस केल्यामुळें त्या क्षेत्राचें महत्त्व लोपलें. आजमितीस पुनश्च त्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. ओणम्‌च्या उत्सवांत घरोघर मूर्ति बसवतात, ती याच वामनाची प्रतिकृति असते.

वामनाची ही मूर्ति मृण्मय आणि शंकूच्या आकाराची असते. अंगणांतच रांगोळीच्या मध्यभागीं आणि फुलांच्या वर्तुळांत ही मूर्ति बसवतात. मूर्ति-

स्थापनेच्या वेळीं ' आरप्पु ' असा सर्व मिळून उच्चैर्घोष करतात. हा घोष हें त्या वामनदेवाचें मुक्तकंठ स्वागत असतें. घरचा यजमान या ' तृक्काक्कर-प्पन् 'ची पूजा करतो. त्या प्रसंगीं घरांतील सर्व मंडळी न्हाऊन-धुऊन, नवीं



ओणम्–वामनपूजा

वस्त्रें परिधान करून, दागिने घालून आणि फुलें माळून मूर्तीच्या भोंवतीं हात जोडून उभीं राहातात. देवाला मिष्टान्नाचा महानैवेद्य होतो. फलाहारहि समर्पण केला जातो. पूजेनंतर घरांत पक्वान्नांचें पंक्तिभोजन होतें. या दिवशीं भाताचे विविध प्रकार बनवतात. लोणचें, पापड, भाज्या, असे शाकपदार्थ हरिदासी कटावांत वर्णिल्याप्रमाणें केले जातात. खीर तर असतेच आणि

पिकलेल्या केळ्यांचे तळलेले तुकडे तर हवेच असतात. त्या दिवशीं वित्त-शाठ्य नाहीं. त्या दिवशीं कुचराई नाहीं कीं कृपणपणाहि नाहीं. ‘ कर्ज काढावें पण ओणमूच्या दिवशीं सुग्रास जेवावें ’ अशी केरळांत म्हणच पडलेली आहे.

ओणमूच्या उत्सवाला कौटुंबिक आणि सामाजिक अशीं दोन्ही अंगें असतात. स्नेह-सौहार्दाची अभिव्यक्ति करण्याचें तें एक महान् पर्व आहे. गौरी-गणपतीच्या सणाला मुंबईतले कोंकणी गडी जसे आवर्जून घरीं जातात, त्याचप्रमाणें केरळी लोक बाहेर कुठेंहि असले तरी, ओणमूच्या सणाला घरीं ओढून येतात. ओणमूच्या वेळीं माहेरवाशीण सासरीं आलीच पाहिजे. तसें न झाल्यास जुन्या काळीं तेवढा एकच अपराध तिला घटस्फोट देऊन कुटुंबा-तून काढून लावायला पुरेसा होत असे. तरवाडचे कारणवान त्या दिवशीं आपल्या भाचेमंडळीला ‘ ओणप्पुटवा ’ देतात. ओणप्पुटवा म्हणजे नव्या वस्त्रप्रावरणाची भेट. नोकर-चाकरांनाहि ओणप्पुटवा दिलीच पाहिजे, असा संकेत आहे. या सणाच्या निमित्तानें कुटियान म्हणजे कुळें आपल्या जमीन-दारांना केळीं, करांदे, काकडी, फळें, शाकभाज्या या वस्तूंचें ‘ ओझें ’ आणून देतात. जमीनदारानें या भेट घेऊन आलेल्या कुळांना पोटभर सुग्रास भोजन वाढावेंच लागतें. मालक आणि कुळें यांच्यांतले संबंध घनिष्ठ आणि सद्भावाचे होण्याला या देण्या-घेण्याची बरीच मदत होते.

ओणमूसाठीं शाळा आणि सरकारी कचेऱ्या यांना ताळेबंदी असते. मुलें खेळण्यांत देहभान विसरून जातात. ओणमूमध्यें अनेक खेळ खेळले जातात; पण चेंडूचा खेळ हा त्यांतला मुख्य. केरळांत एक वेगळाच चेंडूखेळ प्रचलित आहे. त्याला ‘ नाटक पन्तुकळि ’ म्हणायचें. त्याशिवाय किळितट्टु, कोंत्ति-काळि इत्यादि आणखीहि कांहीं मैदानी खेळ असतात. ज्यांना मैदानांत खेळणें परवडत नाहीं, ते घरांत पत्ते, बुद्धिबळें, इत्यादि बैठे खेळ मांडून बसतात. बायकांना घरांतल्या कामाची तर गर्दी असतेच; शिवाय त्यांना नाचायचेंहि असतें. दुपारीं आणि रात्रीं आजूबाजूच्या शेजीबाई एकत्र मिळून ओणमूचें संगीत नृत्य करतात.

असा आहे हा केरळांतला तिरु-ओणमू महोत्सव ! याच्याविषयीं दंतकथा प्रचलित आहे ती अशी—

कोण्या एके काळीं प्रल्हादाचा नातू बलिदैत्य हा समुद्रवलयांकित पृथ्वीचा सम्राट् होता. स्वर्गातल्या देवांना तुच्छ करून तो आपलें राज्य चालवीत होता. त्याचें राज्य आम जनतेला इतकें सुखप्रद झालें, कीं पृथ्वीवरचीं माणसें स्वर्गीय देवताकडे पाठ करून बलीला भजूं लागलीं. देवांना मानवांकडून हविर्भाग मिळेनासा झाला. हा अपमान आणि ही दुर्दशा देवांना असह्य झाली. त्यांनीं वैकुंठांत जाऊन श्रीविष्णूची करुणा भाकली. मग विष्णु वामन झाला. त्यानें त्रिपादभूमीच्या याचनेच्या मिषानें बलीचें राज्य हिरावून घेतलें आणि त्याला पाताळांत दडपलें. त्यावेळीं बलीनें विष्णूजवळ एकच मागणें मागितलें.

"भगवन्! मला वर्षांतून एकदाच पृथ्वीवर जाऊन माझ्या प्रजेची हालहवाल पाहण्याची अनुज्ञा द्यावी!"

विष्णूनें 'तथास्तु' म्हटलें.

या कथेप्रमाणें केरळांतले लोक मानतात, कीं त्यांचा 'मावेलि' म्हणजेच महाबलि ओणमूच्या दिवशीं केरळाच्या भूमीवर येतो. केरळाची बळिराजावर महान् श्रद्धा आहे. ही श्रद्धा सूक्ष्म रूपानें महाराष्ट्रांतहि दिसून येते. दिवाळीच्या पाडव्याला मराठी जनताहि 'बळीचें राज्य येवो' अशी आकांक्षा उद्घोषित करते. वाल्मीकि रामायणापासून तों आजतागायत रामराज्याविषयीं आपल्या ज्या कल्पना आहेत, त्या सगळ्याच्या सगळ्या केरळी जनतेनें बळीच्या म्हणजेच एका असुराच्या राज्याला लावलेल्या आहेत, हें विसरतां कामा नये. एका पाट्टुकाव्यांत एक केरळी लोककवि बळीच्या राज्याची प्रशंसा करतो—

"जेव्हां महाबलि राजा राज्य करीत होता, तेव्हां सर्व माणसें समान होतीं. राज्यांत कुठें चोरी नव्हती, कीं कपट नव्हतें. लोक तिळाएवढेंहि खोटें बोलत नव्हते."

हा महाबलि राजा ओणमूच्या दिवशीं पाताळांतून केरळाच्या भूमीवर येतो, अशी तिथल्या लोकांची समजूत आहे. आपल्या त्या प्रजावत्सल राजाच्या स्वागत-सत्कारासाठींच ते हा महोत्सव साजरा करतात. त्यांना

वाटतें, कीं आपलें दैन्यदारिद्र्य सदाचें असलें, तरी तें आपल्या कृपाळू राजाला दिसूं नये. आपण सुखी आहों, संतुष्ट आहों, असेंच त्याला दिसावें. आपण दुःख-दैन्याचें जिणें जगत आहों असें जर त्यानें पाहिलें, तर तो दुःखी होईल. पाताळांत गेल्यावरहि आपलीच चिंता करीत बसेल. त्यामुळें त्याचें चित्त ईश्वरभजनांत लागणार नाहीं.


ही सारी कल्पनाच खरी; पण ती अत्यंत हृदयंगम आहे. तिच्यांत कृतज्ञता तर आहेच; शिवाय भारतीय आतिथ्याची सुसंस्कृत भावनाहि आहे. आपलें दैन्य लपवून अतिथीचा यावच्छक्य संतोष करायचा, त्याच्या चित्तांत संकोच किंवा विक्षेप न येईल, अशा प्रकारें वागून त्याची बोळवण करायची, हा खास भारतीय आतिथ्यधर्म आहे. तो केवळ लौकिक नसून आध्यात्मिकहि आहे.

या उत्सवाची परंपरा फार पुरातन आहे. केरळ प्रदेश तमिळनाडूपासून अलग होण्याच्या पूर्वीपासून हा उत्सव त्या भागांत चालत आलेला आहे. याचें प्रत्यंतर तमिळ आळवारांच्या कित्येक भक्तिगीतांतून मिळतें. केवळ वामनाचाच नव्हे; तर भगवान् श्रीविष्णूचे सर्व अवतार ओणमूच्या दिवशींच झाले, ही आळवारांची श्रद्धा त्यांच्या कित्येक अवतारगीतांवरून समजून येते. आजहि तमिळनाडमधील वैष्णव ओणमूच्या दिवशीं भगवंताचा विशेष पूजोत्सव करतात. हे दोन प्रदेश विभक्त झाल्यावर तमिळनाडमध्यें ओणमूला फक्त पंथीय स्वरूप राहिलें आणि केरळांत तो सार्वजनिक झाला. कर्नाटकाच्या समुद्रकिनाऱ्याच्या भागांतहि गंगावळी नदीपर्यंत ओणमूच्या उत्सवाचे अवशेष आजहि दिसतात.

### नौकाविहार

ओणमूच्या उत्सवांतली आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगायची राहिली, ती आतां सांगतों. ओणमूमध्यें वाद्यांच्या, धनुष्य-बाणाच्या, मल्ल-युद्धाच्या, अशा अनेक स्पर्धा घडवून आणतात. या सर्वांत नौका-स्पर्धेचा जल्लोष कांहीं और आहे. अर्थात् नदीच्या किंवा खाडीच्या कांठीं वास्तव्य करणाऱ्या लोकांनाच नौकाविहाराचा हा हर्षोत्सव करतां येतो. या विहाराचें

केरळी नाम ‘ वंचिकळि ’ असें आहे. या वंचिकळिसाठीं होड्या सोडणारे, वल्हीं मारणारे, गाणीं म्हणणारे अन् वाद्यें वाजवणारे या सर्वांच्याच



ओणम् मधली लुट्टुपुटीची लढाई

अंगांत त्या प्रसंगीं हर्षाचें उधाण आलेलें असतें. कांठावरचे प्रेक्षकजनहि आरडून ओरडून त्यांच्या हर्षाची दिढीदुपटी करतात.

हा नौकोत्सव एका प्राचीन रूढीचें स्मारक म्हणून सर्वत्र केला जातो. या सर्व उत्सवांत आरन्मुळा या गांवचा उत्सव सर्वांत मुख्य असतो. पंपा नदी ही केरळाची गंगा आहे. आरन्मुळा हें गांव तिच्या तीरावर वसलें आहे. इथें पार्थसारथीचें सुंदर मंदिर आहे. तिथून पुढें कोस दीड कोस पंपानदी सरळ रेषेंत वाहते. त्यामुळें इथल्या नौकाविहाराला एक विशेष गंमत येते. इथला नौकोत्सव केवळ मनोविनोदनासाठीं नसतो. त्याच्यामागें धार्मिक श्रद्धा आहे. तो केल्यानें पार्थसारथी प्रसन्न होतो, असें ते समजतात. हा पार्थसारथी म्हणजे श्रीकृष्ण तिथे कसा आला, ती कथाहि श्रवणीय आहे—

भारतीय युद्धानंतर कृष्ण आणि बलराम हे दोघेहि तीर्थयात्रा करायला निघाले. अनेक तीर्थक्षेत्रें भ्रमत ते पंपा नदीवर आले. दिवस होते पाव-

साळ्याचे. पंपा नदीचें पात्र भरून ओसंडत होतें. सखल भागांत सर्वत्र पाणीच पाणी झालें होतें. त्यांतच मधें जमिनीचा एक लहानसा तुकडा उंचावला होता आणि तो तेवढा कोरडा होता. बलराम तिथवर गेला. त्यानें त्या कोरड्या भूमीवर आपला डेरा लावला. कृष्ण थोडा मागें राहिला होता. त्यानें येऊन पाहिलें, तर दादाची स्वारी उंच जागीं आसनस्थ झालेली. कृष्णहि कांहीं कमी ठकडा नव्हता. त्यानें आपल्या दादाची गंमत करायचें ठरवलें. त्यानें पंपेच्या पसरलेल्या पाण्यांत त्याहूनहि एक उंच जागा निर्माण केली आणि तिथें आपला मुक्काम ठोकला. अर्थात् दोघांहि भावांनीं तो विषय थट्टेवारी नेल्यामुळें त्यांच्यांत संघर्ष निर्माण झाला नाहीं.

ज्या ठिकाणीं श्रीकृष्णाची बैसका मांडली होती, त्याच जागीं पुढें तिथल्या लोकांनीं पार्थसारथीचें मंदिर बांधलें. तिथून चार हात खालीं बलरामाचेंहि एक मंदिर निर्माण केलें.

आरन्मुळा गांवीं नौकोत्सव होतो तो याच पार्थसारथीच्या प्रीत्यर्थ. ओणम्‌च्या दिवसापासून पुढें पांच दिवस हा उत्सव चालतो. शेवटच्या दिवशीं देवाची महापूजा असते. आल्यागेल्याला महाप्रसादहि मिळतो. त्याला लागणारी शिधासामग्री काट्टूर मठांतून आणतात. हा मठ तिथून पांच कोसांवर आहे. त्यासाठीं एक खास नौका बाहेर काढतात. या नावेचा विशेष हा, कीं ती एकाच ओंडक्याची बनवलेली आहे. तिला कुठेंहि जोड-काम नाहीं. सुमारें अडीचशें वर्षांपूर्वीं बनवलेली ही नाव आजहि व्यवस्थित काम देते. तिचें टोंक उंच आहे आणि त्याला पक्ष्याची चोंच बसवली आहे. हजारों शेर धान्य या होडींत सामावतें आणि कित्येक माणसेंहि बसूं शकतात. आदल्या रात्रीं तिच्यांत शिधासामग्री भरून घेतात आणि दुसऱ्या दिवशीं पंचपंच उषःकालीं ती हांकारतात. किनाऱ्यावरच्या प्रत्येक गांवांतून या देव-नौकेला सामोरी जाण्यासाठीं एकेक होडी निघते. अशा अनेक होड्या त्या नौकामिरवणुकींत भाग घेतात आणि मग तूं पुढें, का मी पुढें अशी त्यांच्यांत होड लागते. मिरवणुकीच्या या नावा विशेष प्रकारें बनवलेल्या असतात. पंचवीस-तीस हात एवढी प्रत्येकीची लांबी असते. तिचा अग्रभाग चिंचोळा असतो आणि तो तीन-चार हात तिरपा उंच केलेला असतो. चौवीस ते छत्तीस इतकीं वल्हीं लयीच्या ठेक्यांत त्या नौकेला पुढें रेटीत असतात.

अशा प्रकारें वाजत गाजत ही देवनौका आरन्मुळाच्या बंदराला येऊन लागते. या नौकाविहारासाठीं मलयाळम् भाषेंत निरनिराळ्या कवींनीं शेंकडों गीतें रचलेलीं आहेत. त्यांना वंचिप्पाट्टु असें म्हणतात. मागें साहित्याच्या प्रकरणांत ज्या रामपुरत्तु वारियर या कवीची कथा सांगितली, त्याचें ' कुचेलवृत्तम् ' हें सर्वप्रसिद्ध वंचिप्पाट्टु आहे.

तिरु आतिरा

ओणम् जसा स्त्रीपुरुषांचा संमिश्र उत्सव, तसा खास स्त्रियांचा एक सण केरळांत आहे. त्याला म्हणतात, ' तिरु आतिरा. ' आतिरा म्हणजे आर्द्रा नक्षत्र. पौष मासांतल्या आर्द्रा नक्षत्रावर हा सण साजरा होतो. ओणम् हें वैष्णव पर्व तर तिरु आतिरा हें शैव पर्व आहे. उमा भगवती ही या पर्वाची देवता होय ! पार्वतीच्या कठोर तपस्येनें शिवशंकर प्रसन्न झाला आणि या आर्द्रा नक्षत्रावर त्यानें अवतार घेऊन तिचें पाणिग्रहण केलें, अशी केरळांत या व्रताची कथा सांगतात. महाराष्ट्रांत भाद्रपद शुद्ध तृतीयेस येणाऱ्या हरितालिकाप्रमाणेंच केरळी स्त्रियांचें हें सौभाग्यवर्धन व्रत आहे.

त्याचा मुख्य दिवस आर्द्रा नक्षत्राचा असला तरी त्या आधीं दहा दिवस बायका नदीवर किंवा एखाद्या जलाशयावर जाऊन प्रातःस्नान करतात. स्नान करतांना गाणीं म्हणतात आणि आपल्या सकंकण हातांनीं पाणी वर उडवतात. हें या व्रताचें अनिवार्य अंग आहे. मुख्य दिवसाच्या आदल्या रात्रीं शिवाचें दर्शन घेऊन जागरण करणें, हाहि या व्रताचाच भाग आहे. बायका नाचून-गाऊन ती रात्र घालवतात. मुली झोंपाळ्यावर बसून गाणीं गातात. त्या रात्रीं सुवासिनी स्त्रीनें ' पातिराप्पुवु ' नांवाचें फूल वेणींत माळलेंच पाहिजे आणि एकशेंएक विड्याचीं पानें खाल्लींच पाहिजेत, असा या व्रताचा नियम आहे. कारण पार्वतीनें तसें केलें होतें.

उत्सवाच्या मुख्य दिवसापूर्वीं दहा दिवस रोज रात्रौ केरळी महिला जें नृत्य करतात त्याला ' तिरु आतिरा कळि ' म्हणायचें. या नृत्याचीं तसेंच सकाळीं स्नानाला जातांना म्हणायचीं अनेक लोकगीतें केरळांत प्रचलित आहेत. त्यांतलें एक गीत असें आहे—

" धनुमासत्तिल तिरु आतिरा
भगवान्टे तिरुनाळल्लो

भगवति तिरुनोयम्ब
उण्णरुते उरङ्ङरुते
आटणमपोल पाटणमपोल
तुटिक्कणमपोल कुळिक्कणमपोल "

' पौष मासांतला तिरु आतिरा हा शिवाचा जन्मदिन आहे. हें भगवतीचें महाव्रत आहे. म्हणून सर्व जणी उपास करा, नाचा, गा. सकाळीं उठून पाण्यांत बुडी मारा आणि पाणी वर उडवा.'

या व्रताच्या नेमधर्मांत पुरुषांनीं लुडबुड करायची नसते. त्यांनीं फक्त बायकांच्या पूजेसाठीं आणि उपवासासाठीं फुलें आणि फळें आणून द्यायचीं. तिथल्या मातृसत्ताक कुटुंबपद्धतींतल्या स्त्रियांचें पतीकडे एवढेंच मागणें असतें, कीं त्यानें तिरुआतिराच्या व्रतासाठीं आवश्यक ती सामग्री स्वतःच्या पैशानें विकत घेऊन तिला द्यावी. एवढेंहि जो करणार नाहीं, तो पुरुष त्या बायकांच्या लेखीं नामर्द ठरला तर नवल नाहीं.

## विषु उत्सव

महाराष्ट्रांत फटाक्यांचे आवाज सुरू झाले कीं, दिवाळी आली असें समजावें. दक्षिण कोंकणांत फटाक्यांच्या माळांनीं स्वागत होतें, तें गणपतिबाप्पाचें. केरळांत फटाके उडूं लागले कीं, समजावें ' विषु 'चा उत्सव प्राप्त झाला. विषु म्हणजे केरळांतला वर्षपाडवा होय! हा एप्रिलच्या चौदा किंवा पंधरा तारखेस येतो. याला ' मुलांचा सण ' असेंहि समजतात. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं मिष्टान्न भोजन केल्यानें वर्षभर तें आपल्याला मिळतें आणि त्या दिवशीं आनंदोत्सव केल्यास पुढचें समग्र वर्षहि आनंदांत जातें, असा आपल्या महाराष्ट्रांतला संकेत आहे. विषु सणाविषयीं केरळी जनताहि हीच भावना बाळगते. त्याच भावनेला अनुसरून केरळी लोक त्या दिवशीं ' कणी 'चें दर्शन घेतात.

विषुच्या आदल्या रात्रीं काकडी, आंबे, फळभाज्या इत्यादि वस्तु तंडुलराशीवर सजवून मांडल्या जातात. त्यांतच सोन्या-चांदीचे अलंकारहि आणून

ठेवतात. या सर्वांवर कोरांटीच्या फुलांचे तुरे ठायीं ठायीं खेंचून त्याची शोभा वाढवतात. त्याला लागून राम-कृष्णांचीं चित्रें उभीं करतात. नारळाच्या



विषु–कणीचें दर्शन

दोन अर्धुकांत दोन दिवे लावून ठेवतात. या संभृत संभाराला नांव आहे 'विषु-कणि.' विषुच्या दिवशीं प्रातःकाळीं उठून सर्व प्रथम या विषुकणीचें दर्शन घेतात आणि मग तो दिवस आनंदांत घालवतात.

कांहीं भाविक लोक या दिवसासाठीं गुरुवायूर, वैकम, इत्यादि क्षेत्रांत जाऊन आदल्या रात्रीं मंदिराजवळच मुक्काम करतात. विषुच्या दिवशीं सुप्रभातीं उठायच्या आंतच स्वतःचे डोळे बांधून घेतात. मग तशा स्थितींत आंधळ्या कोशिंबिरीप्रमाणें चांचपडत मंदिराच्या गाभाऱ्यांपर्यंत जातात. मग डोळे सोडून पहिलें दर्शन देवाचें घेतात. या 'मंगलायतनम् हरिः' च्या प्रथम दर्शनानें वर्षभर आपण मंगलच पाहूं आणि मंगलच अनुभवूं, असें त्यांना वाटतें.

### काळापूट्टु

भारतांतल्या कित्येक मोठ्या शहरांतून घोड्यांच्या शर्यती चालतात हें सर्वांना माहीत आहे. हजारों लोक भुतानें झपाटल्यागत त्या शर्यतींच्या

आवाराकडे दरवर्षी धावत असतात. गणिती अन् ज्योतिषी आडाखे बांधून कोणता घोडा पहिला येईल तें मनाशीं ठरविणें आणि त्यावर पैसे लावणें हें त्या रेसशौकिनांचें लाडकें व्यसन. रुपयाचे दहा रुपये झाले कीं हसायचें, अन् मूळ रुपयाच अदृश्य झाला, कीं क्षणभर खट्टू होऊन पुन्हा इरेस पडायचें, हा त्यांचा स्वभावधर्म बनतो. रेसमध्यें पैसे मिळवून नशीब काढणारे भाग्यवान् हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच. बाकीचे बहुतेक खिसा रिकामा करूनच परत येतात. असा तो राजेशाही अन् राजमान्य जुगार आहे.

पण केरळांतले लोक अभिमानानें सांगत असतात, कीं ' आमच्या राज्यांत घोड्यांच्या शर्यतीचा जुगार नाहीं. ' तिथलाहि शेतकरी समाज दरवर्षी एक शर्यत खेळतो; पण ती बैल पळविण्याची. तिचें नांव आहे ' काळापूट्टु. ' काळा म्हणजे बैल आणि पूट्टु जोतणें.

फसल संपल्यानंतर उन्हाळ्याच्या दिवसांत ' काळापूट्टु ' हा खेळ होतो. शेत हेंच या खेळाचें खुलें मैदान असतें. कमींतकमी एका एकराचा तरी कुणगा या खेळासाठीं लागतो. त्याच्यांत पाऊलभर पाणीहि अवश्य असावें लागतें. ही या शर्यतीची पूर्वतयारी.

एखाद्या गांवीं काळापूट्टूचें आयोजन झालें, कीं सगळीकडे चैतन्य भरतें आणि उत्साहाचे वारे वाहूं लागतात. गांवचा मुखंड शेतकरी आसपासच्या किसानांना शर्यतीसाठीं ' आवतणं ' धाडतो आणि मग त्या त्या गांवांतहि उत्साह संचरतो. दहा-दहा, बारा-बारा कोसांवरचे शेतकरी आपापल्या खिलाडी बैलजोड्या घेऊन निमंत्रणाच्या जागीं दाखल होतात. प्रेक्षकांनाहि वाटतें, कीं आज आपल्या डोळ्यांचें पारणें फिटणार. सकाळ झाली, कीं शेताच्या बांधाबांधावरून मुंग्यांसारखी माणसांची रीघ लागते. सगळ्यांचीं पावलें शर्यतीच्या मैदानाकडे पडूं लागतात. सारें मैदान माणसांनीं कसें गज-बजून जातें. त्यांतच तमाशेवालेहि आपापले फड घेऊन तिथें दाखल होतात.

शर्यत सुरू करण्यापूर्वीं सगळ्या बैलांना शेताच्या बांधावर आणून हारीनें उभे करतात. त्यांचीं तीं ' दुलदुल ' करणारीं वशिंडें, त्यांच्या गळ्याखालची ती मस्त पोळी, भरदार आंगठण, टिचकी मारली तर रक्त उसळेल असें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे

अनुक्रम ... ... वि: १३७.......
क्रमांक ........... नों: दि: ..........

नितळ पुष्ट अंग, शिंगांचे ते कमी-अधिक रुंदीचे बांक, रुंद टणक कपाळ, हें सगळें पाहून त्या किसान मंडळीचा अंतर्यामी सुखावून जातो.



काळापूद्दु शर्यत

कोणती बैलजोडी पहिली येईल, कोणत्या जोडीला पहिलें बक्षीस मिळेल किंवा निदान मिळावें, याविषयीं प्रेक्षकांचे आपापसांत तर्कवितर्क चालू होतात.

मग बैलांना जवळ करून त्यांच्या मानेवर जूं ठेवतात. नांगराच्या जागीं एक लोढण्यासारखें लांब लांकूड बांधतात. बैलजोडीचा मालक किंवा त्याचा गुमास्ता त्या लांकडावर उभा राहतो, आपला तोल संभाळण्यासाठीं जुंवाला बांधलेली एक दोरी हातांत धरतो अन् जरूर तो इषारा मिळतांच बैलजोडीला फटकारतो. त्यासरशीं बैल धावूं लागतात. त्यांना पळवणाऱ्यां-पैकीं कित्येक असेहि बहाद्दर असतात, कीं बैल श्यामकर्ण वारूच्या वेगानें

धा. ११४२४

पळत असतात आणि हे त्यांचे (चाबूकस्वार) दोरी न धरतां हात सोडून त्या लोढण्यावर उभे असतात. जरा दुर्लक्ष झाल्यास, जरा तोल गेल्यास बत्तीशी पाडणारी कसरत असते ती. हें कसब साध्य करण्यासाठीं त्यांना वर्ष वर्ष अभ्यास करावा लागतो. त्यांची ती 'तोलसिद्धि' पाहून तुकोबाच्या शब्दांत म्हणावेंसें वाटतें कीं—

" असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे "

मग प्रेक्षक मंडळी हर्षभरानें टाळ्या पिटतात. आरडून-ओरडून त्या पळत्या प्रदर्शनाला प्रोत्साहन देतात. त्या बैलांनाहि आधींपासून सवय करविलेली असते. त्यामुळें ते असे कांहीं पळतात, कीं नजर ठरूं नये. शर्यतीचें वर्तुळ पुरें झालें कीं ती बैलजोडी विसांवते. मग तिच्या पाठोपाठ दुसरी रंगणांत उतरते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिवसभर ही शर्यत चालू राहते. एकेका जोडीला चार-पांच वेळां तरी पळवतातच. मग पंच निर्णय देतात. विजयी मालकांना बक्षिसें, इनामें मिळतात. बक्षीस देतांना केवळ बैलांचा पळण्याचा वेगच पहात नाहींत; तर त्यांचें ठाणमाण, त्यांचें आरोग्य अन् सौंदर्य आणि त्यांची पळण्यांतली लय, या गोष्टीहि विचारांत घेतात. ती विजयी बैलजोडी मालक जर विकणार असला, तर गिऱ्हाईकहि तिथें तयार असतें. काळापूट्टूचे कित्येक सुखवस्तु शौकीन, मालकानें उच्चारलेला दाम मोजून ती बैलजोडी खरेदी करतात.

शेतीला अत्यावश्यक असलेल्या बैलांची निपज चांगली व्हावी, त्यांचें योग्य संगोपनहि व्हावें, हा या शर्यतींतला मूळ उद्देश! पण आजमितीस कित्येक रगेल आणि रंगेल किसान केवळ या शर्यतींसाठीं म्हणून बैल तयार करतात. काळापूट्टु हा केरळांतला बराच प्राचीन असा खेळ आहे. जुन्या लोकगीतांतूनहि याचे उल्लेख आढळतात. केरळांतल्या ग्रामीण जनतेचें मनोरंजन आणि त्यांच्या पशुधनाची अभिवृद्धि या दोन गोष्टी काळापुट्टु हा खेळ शतकानुशतकें करीत आला आहे हें निःसंशय!

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि: ..........
नों: दि: ..................

REFBK 0011424

REFBK-0011424